१९३७-२०२६ वर्ष ९०

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड रविवार । दि. २१ जून २०२६ । अंक १५ । पृष्ठे १० । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## पेणमध्ये दमदार बरसला

**पेण :** कित्येक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर पेण शहर आणि परिसरात पावसाने दमदार हजेरी लावत नागरिकांना मोठा दिलासा दिला. गेल्या काही दिवसांपासून असह्य उकाड्याने त्रस्त झालेल्या पेणकरांसाठी शनिवारी दुपारचा पाऊस दिलासादायक ठरला. अर्धा ते पाऊण तास कोसळलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या नागरिकांची अखेर प्रतीक्षा संपली असून पहिल्याच दमदार सरींनी शहरातील तापमानात घट झाली. उष्णतेने होरपळलेल्या नागरिकांना दिलासा मिळाला, तर परिसरातील •➤ पान २ वर

## चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने वाळवटीतील वीजप्रश्न सुटला!

सविस्तर वृत्त पान ३ वर




# स्मार्ट मीटरची सक्ती नको!

**।। शेकापचा महावितरणला इशारा ।। तालुका चिटणीस सुरेश घरत आक्रमक**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेदरम्यान सर्वसामान्य ग्राहकांवर सक्ती केली जात असून, विरोध करणाऱ्यांना शासकीय कामात अडथळा आणल्याचे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याचा गंभीर आरोप शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी महावितरणवर केला आहे. अलिबाग तालुक्यातील वरसोली आदिवासीवाडीत शनिवारी (दि.२०) सकाळी घडलेल्या प्रकारामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेवर संताप व्यक्त करत सुरेश घरत यांनी स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी, अन्यथा न्यायालयात धाव घेण्यात येईल, असा इशारा महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.

महावितरण कंपनीकडून शहरी भागासह ग्रामीण भागात स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून शनिवारी सकाळी वरसोली आदिवासीवाडीत महावितरणचे कर्मचारी स्मार्ट मीटर बसविण्यासाठी दाखल झाले होते. मात्र, याबाबत स्थानिक नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कर्मचारी मीटर बसविण्याचे काम करीत असताना काही आदिवासी ग्रामस्थ व महिलांनी याबाबत विचारणा केली. त्यावेळी शासकीय कामात अडथळा आणल्यास तक्रार दाखल करण्यात येईल, असे सांगण्यात आल्याने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला.

हे प्रकरण पुढे अलिबाग पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले. घटनेची माहिती मिळताच अलिबागच्या प्रभारी नगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्यात बैठक •➤ पान २ वर



> **“स्मार्ट मीटर बसविण्याबाबत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची सक्ती करू नये. सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार थांबला पाहिजे. स्मार्ट मीटरबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम असून, वीज बिले भरमसाठ येत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे महावितरणच्या या भूमिकेविरोधात न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसामान्यांच्या हक्कासाठी याचिका दाखल करण्यात येणार आहे.**
>
> **– सुरेश घरत,**
> **तालुका चिटणीस, शेकाप”**

## शेतकरी विधवांसाठी शासकीय पडीक जमीन

**■ राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या बचत गटांना शासकीय पडीक जमीन कसण्यासाठी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याची घोषणा केली.राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत महिला बचत गटांना नाममात्र एक रुपया दराने शासकीय जमीन उपलब्ध करून दिली जाणार आहे. चारा लागवडीसाठी तीन वर्षे, तर बांबू लागवडीसाठी दहा वर्षे जमीन वापरण्याची परवानगी असेल.

याशिवाय महिला बचत गट आणि महिला •➤ पान २ वर

## आरडीसीसी बँक

सहप्रवास प्रगतीचा

ISO 9001-2008 BANK

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजना सन २०२६

### जाहीर आवाहन

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजना सन २०२६' अंतर्गत पात्र संस्था व खात्याची तपासणी शासकीय लेखापरीक्षकांकडून करण्यात आली असून सदर खाती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असून पात्र सभासदांपैकी जे सभासद मयत असून त्यांनी वारस नेमलेले नाहीत अशा सभासदांनी त्वरीत वारस नेमून तशी माहिती व आधारकार्ड नसलेल्या पात्र सभासदांनी आधारकार्ड घेऊन आपल्या संस्थेशी अथवा नजीकच्या शाखेत संपर्क साधावा. व या योजनेच्या निकषानुसार शासनाकडून मिळणाऱ्या कर्जमुक्ती रक्कमेचा लाभ घ्यावा.

या योजनेंतर्गत प्रोत्साहनपर लाभ मिळणेसाठी पात्र शेतकरी सभासदांनी सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षापैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात तसेच सन २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षात अल्पमुदत पीक कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाची ३० जून पूर्वी परतफेड करणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने सन २०२५-२६ सालातील खरीप पीक कर्जाची दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी भरणा केलेला नाही अशा पात्र सभासदांना रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत आवाहन करण्यात येते की, त्यांनी सन २०२५-२६ सालात खरीप कर्ज घेतले असल्यास योजनेस पात्र होणेस त्यांच्याकडील पीक कर्जाची परतफेड दिनांक ३० जून २०२६ पूर्वी भरणा करुन शासनाच्या योजनेंतर्गत मिळणाऱ्या प्रोत्साहनपर रक्कमेचा लाभ घेण्यात यावा.

**श्री. मंदार मनोहर वर्तक**
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग

**श्री. तनवीर पाटील**
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था अलिबाग-रायगड

## पुराव्यांअभावी सर्व आरोपी निर्दोष

**पवनराजे निंबाळकर हत्याकांडाचा २० वर्षांनंतर निकाल**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

धाराशिवचे विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांचे वडील पवनराजे निंबाळकर व त्यांच्या चालकाच्या २० वर्षांपूर्वीच्या हत्या प्रकरणाचा बहुप्रतिक्षित निकाल विशेष सीबीआय न्यायालयाने शनिवारी दिला. न्यायालयाने या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि राज्याचे माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह अन्य आरोपींची निर्दोष सुटका केली आहे. माफीच्या साक्षीदार पारसमल जैन याची साक्ष विश्वासार्ह नाही असे म्हणत न्यायालयाने पुराव्यांअभावी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यामुळे खासदार ओमराजे निंबाळकर यांना मोठा झटका बसला आहे. ३ जून २००६ रोजी मुंबईवरून धाराशिवला जात असताना नवी मुंबईच्या कळंबोलीत राजकीय वादातून पवनराजे निंबाळकर यांची गोळ्या झाडून हत्या •➤ पान २ वर



## आज नीट यूजी पुनर्परीक्षा

**मुंबई :** राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) वतीने आज नीट यूजी २०२६ पुनर्परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. ३ मे रोजी नीट यूजी परीक्षेचा पेपर फुटल्याचा प्रकार समोर आल्यानंतर ही परीक्षा रद्द करण्यात आली होती. आता ही परीक्षा रविवार, दि. २१ जून रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत होणार असून, •➤ पान २ वर



# विंधन विहीर पुनर्भरणाचा प्रभावी उपाय

## ‘कोरड्या’ बोरवेल पुन्हा होणार ‘सजल’

| धम्मशील सावंत |
| पाली/बेणसे |

**जून महिना अर्धा संपत आला तरी मान्सूनने अपेक्षित दमदार हजेरी लावलेली नसल्याने रायगड जिल्ह्यात भूजल पातळी चिंताजनकरीत्या खालावली आहे. वाढत्या उष्णतेमुळे आणि पावसाच्या दिरंगाईमुळे पिण्याचे पाणी, शेती आणि दैनंदिन वापरासाठी भूजलावरचा ताण प्रचंड वाढला असून, अनेक भागांतील विंधन विहिरी (बोरवेल) कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत ‘विंधन विहीर पुनर्भरण’ हा शास्त्रशुद्ध आणि दीर्घकालीन उपाय म्हणून पुढे येत आहे.**

रायगडातील अनेक गावांमध्ये नवीन बोरवेल खोदण्याची स्पर्धा सुरू असताना आधीपासून अस्तित्वात असलेल्या अनेक कुपनलिकांनी तळ गाठला आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला असून, भूजल साठा वाढविण्यासाठी नागरिकांनी पुनर्भरणाच्या उपायांकडे वळण्यास सुरुवात केली आहे.

पाणीटंचाईचे गांभीर्य ओळखून अनेक जागरूक नागरिक, शेतकरी, फार्महाऊसधारक आणि सामाजिक संस्था आता पुढे सरसावल्या आहेत. विविध भागांत विंधन विहिरींचे पुनर्भरण करण्यासाठी विशेष मोहीम राबविली जात असून, अनेक ठिकाणी प्रत्यक्ष कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या कामाचे कौतुक होत आहे.

> “आपण जमिनीतून जेवढे पाणी घेतो, तेवढे किंवा त्यापेक्षा अधिक पाणी पुन्हा भूगर्भात मुरविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. शास्त्रशुद्ध पद्धतीने विंधन विहीर पुनर्भरण केल्यास कोरड्या पडलेल्या बोरवेलना नवसंजीवनी मिळते. यासोबतच परिसरातील विहिरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन भूजल साठा मजबूत होतो. त्यामुळे सध्या पुनर्भरणासाठी नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे.”
> – अमित निंबाळकर, विंधन विहीर पुनर्भरण तज्ज्ञ, पाली





### भूजल संवर्धनाची काळाची गरज

तज्ज्ञांच्या मते, केवळ नवीन बोरवेल खोदून पाणीटंचाईचा प्रश्न सुटणार नाही. उलट, भूजलाचा वाढता उपसा भविष्यातील संकट अधिक तीव्र करू शकतो. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पुनर्भरण करणे ही काळाची गरज बनली आहे. मान्सून अनिश्चित असताना आणि हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्र होत असताना जलसंधारण आणि भूजल संवर्धनाचे उपाय प्रत्येक गावाने आणि प्रत्येक नागरिकाने अंगीकारणे आवश्यक असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

### काय आहे विंधन विहीर पुनर्भरण?

विंधन विहीर पुनर्भरण म्हणजे पावसाचे वाहून जाणारे पाणी गाळून थेट भूगर्भातील जलस्तरात पोहोचविण्याची प्रक्रिया. यासाठी बोरवेलच्या मुख्य पाईपभोवती विशेष आकाराचा खड्डा तयार करून त्यात दगड, खडी, वाळू आणि कोळशाचे विविध थर तयार केले जातात. या नैसर्गिक फिल्टरमधून पावसाचे पाणी झिरपत भूगर्भात पोहोचते आणि जलसाठ्याची भरपाई होते. या प्रक्रियेमुळे केवळ संबंधित बोरवेललाच नव्हे, तर आसपासच्या विहिरी आणि जलस्रोतांनाही मोठा फायदा होतो. भूजल पातळी वाढण्यास मदत होत असल्याने दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी हा उपाय अत्यंत उपयुक्त मानला जात आहे.

# कशेडी घाटात खैरतस्करांना बेड्या

## पिकअपसह एक लाखांचा मुद्देमाल हस्तगत



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

| पोलादपूर | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूरजवळील कशेडी घाटात खैर लाकडांची वाहतूक करणारे पिकअप वाहन भरदुपारी गुंगारा देत निसटून जाताना पाठलाग करत पकडण्यात वन विभागाला यश आले आहे. या कारवाईत अंदाजे एक लाख रुपयांची खैराची लाकडे आणि सुमारे नऊ लाख रुपये किमतीचे वाहन जप्त करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील खैनी आणि कातनिर्मिती कारखान्याचे राज्यस्तरीय कनेक्शन या कारवाईतदेखील उघड झाले आहे.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारच्या सुमारास कशेडी घाटातील वन विभागाच्या तपासणी नाक्यावर पांढऱ्या रंगाचे पिकअप वाहन (क्र.एमएच-०८ एपी ६७९४) थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, चालकाने वाहन न थांबवता वेगाने पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वन विभागाच्या पथकाने पाठलाग करून वाहन ताब्यात घेतले. तपासणीदरम्यान वाहनामध्ये खैराची लाकडे आढळून आली. प्राथमिक चौकशीत ही लाकडे पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील वेल्हे परिसरातून रत्नागिरी जिल्ह्याकडे नेली जात असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी शुभम मोरे (रा. घोडेगाव, ता. चिपळूण) आणि अजित मोरे (रा. जेजुरी, पुणे) यांच्याविरोधात वन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे.

रोहा येथील उपवनसंरक्षक डॉ. शैलेंद्रकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक आशुतोष शेडगे, महाडचे वनक्षेत्रपाल आशिष पाटील तसेच वनपाल तेजस नरे, आदेश जाधव, संदीप उतेकर आणि सचिन मेने यांनी ही कारवाई केली.

# पाली नगरपंचायत पोटनिवडणूक महायुतीत बिघाडी

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |




- **प्रभाग १३ मध्ये शेकाप उमेदवाराला भाजप-राष्ट्रवादीचा जाहीर पाठिंबा**
- **शिवसेना उमेदवाराची एकाकी लढत**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली नगरपंचायतीमधील रिक्त असलेल्या प्रभाग क्रमांक १३ च्या पोटनिवडणुकीमुळे स्थानिक राजकारण कमालीचे तापले आहे. या पोटनिवडणुकीत धक्कादायक राजकीय घडामोडी समोर आल्या असून, राज्यात एकत्र सत्तेत असलेल्या महायुतीत स्थानिक पातळीवर फूट पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. प्रभाग क्रमांक १३ मध्ये शिवसेना (शिंदे) एकटे पडली आहे. कारण शेकापच्या उमेदवाराला थेट भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने पाठिंबा दिला आहे.

प्रभाग क्रमांक १३ च्या पोटनिवडणुकीसाठी शिवसेना शिंदे पक्षाकडून स्वप्नाली जाधव या रिंगणात आहेत. मात्र, महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) पक्षाने शिवसेना (शिंदे) उमेदवाराला पाठिंबा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या दोन्ही पक्षांनी शेतकरी कामगार पक्षाचे (शेकाप) उमेदवार सुधीर साखरले यांना आपला जाहीर पाठिंबा घोषित केला आहे. भाजपचे सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांनी गुरुवारी (ता १८) काढलेल्या एका जाहीर आवाहनाद्वारे सुधीर साखरले यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे यांनी देखील या पोटनिवडणुकीत शेकाप उमेदवाराला पाठिंबा दिल्याचे सांगितले आहे.

याबाबत भाजप सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांनी सांगितले की, स्थानिक पातळीवरच्या निवडणुकांमध्ये स्थानिक समीकरणे आणि विकास महत्त्वाचा असतो.

तालुकास्तरीय कोर कमिटीच्या निर्णयानुसार आणि सर्व पदाधिकाऱ्यांच्या एकमताने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकीकडे प्रभाग १३ मध्ये राजकीय संघर्ष पेटला असताना, प्रभाग क्रमांक १४ मधून सुनंदा पाटील या बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष प्रभाग १३ मधील चुरशीच्या लढतीकडे लागले आहे.

# विमानतळाला गळती

| पनवेल | प्रतिनिधी |

सुमारे १९ हजार कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पावसाळ्यापूर्वीच पाण्याच्या गळतीची घटना समोर आल्याने विमानतळाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विमानतळ सुरू होऊन अवघे सहा महिने झाले असताना ही घटना घडल्याने प्रवासी आणि नागरिकांमध्येही आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये विमानातून टर्मिनलपर्यंत सामान पोहोचविणाऱ्या बॅगेज बेल्ट परिसरात छतामधून पाणी गळत असल्याचे दिसून येत आहे. हा व्हिडीओ मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाल्यानंतर विमानतळ प्रशासनावर टीकेची झोड उठली असून, एवढ्या मोठ्या खर्चाच्या प्रकल्पात अशा प्रकारच्या त्रुटी कशा राहिल्या, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना विमानतळ संचालन कंपनीने सांगितले की, ही गळती बांधकामातील दोषामुळे नसून, वातानुकूलन (एसी) यंत्रणेत झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे झाली होती.

# पोलीस ठाण्याच्या आवारात वृक्षारोपण

**पनवेल** : पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या माध्यमातून ग्रीन पोलीस स्टेशन उपक्रमांतर्गत परिसरात वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात करण्यात आले.मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्य पोलीस दलामध्ये पर्यावरण संवर्धनास चालना देणे, हरित उपक्रमाची प्रभावी अमंलबजावणी तसेच ‘‘ग्रीन पोलीस स्टेशन‘‘ ही संकल्पना राज्यभर राबविण्यात यावी, या उददेशाने नवी मुंबई आयुक्तालयातील पनवेल तालुका पोलीस ठाणे ठाण्याच्या आवारात प्रकारतील झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्यासह अन्य उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वर्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक मनिष रामनिरंजन झुनझुनवाला व संतोष रामनिरंजन झुनझुनवाला यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| ८ | १ | ०.०४.०० | ०.०३ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २१/०६/२०२६

**ॲड. सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड- ४१०२०१



## खरेदीदारांस सावधान नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशील साईनाथ अशोक म्हात्रे, रा. किहिम कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे मालकी हक्काची, वहिवाटीची, ताबे, कब्जाची मिळकत मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथे आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १ | २६१ | ०-०५-५९<br>०-०२-२२<br>०-०७-७१ | १.३० |

वरील मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा सामाईक अविभक्त हिस्सा आहे. सदरची मिळकत मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथे महसुल दप्तरी नोंदलेली मिळकत आहे.

वरील वर्णनाचे गट नं. २६१ मौजे कामथ-किहिम, ता.अलिबाग, जि. रायगड या मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. आमचे अशिल साईनाथ अशोक म्हात्रे व अन्य सह-हिस्सेदार शैलेश दुर्लभदास संघवी, विलास म्हात्रे, उल्हास म्हात्रे यांचे वारस सुहास म्हात्रे तसेच भारती अनंत म्हात्रे यांचेमध्ये आजपर्यंत वरील मिळकत व अन्य मौजे कामथ किहिम येथील मिळकती संदर्भात सरस-निरस निर्तूटकपणे वाटप झालेले नाही.

वरील वर्णनाची मिळकत गट नंबर २६१ ही मिळकत महसुल खात्याच्या चुकीमुळे गट नंबर २६४ मौजे कामथ-किहिम या मिळकतीमध्ये क्षेत्र विलीन झालेले आहे. आमचे अशिलांच्या म्हणजेच साईनाथ अशोक म्हात्रे व इतर यांच्या नावाचा गट नंबर २६१ चा स्वतंत्र सातबारा उतारा आजही महसुल दप्तरी आहे.

वरील गट नंबर २६४ मौजे कामथ-किहिम, तालुका अलिबाग या मिळकतीचा विक्री व्यवहार मौजे गट नंबर २६४ च्या दप्तरी नांव असणारे व्यक्ती म्हणजेच सुमन सुर्यकांत राऊत, विश्वजीत विनायक काठे, भक्ती चारुदत्त चोगले, मयुरेश सुबोध काठे इत्यादी व अन्य करीत आहेत असे आमचे अशिलांना खात्रीशीर सुत्रांकडून समजलेले आहे. वरील गट नंबर २६४ मौजे कामथ-किहिम या मिळकतीचा विक्री व्यवहार झाल्यास आमचे अशिलांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणार आहे व आमचे अशिलांचे त्या मिळकतीतील कायदेशीर हक्कांपासून वंचित रहावे लागणार आहे.

आमचे अशिलांचे वरील मिळकतीत असलेले कायदेशीर हक्क डावलून गट नं.२६४ च्या दप्तरी नांवे असणाऱ्या व्यक्ती म्हणजेच सुमन सुर्यकांत राऊत, विश्वजीत विनायक काठे, भक्ती चारुदत्त चोगले, मयुरेश सुबोध काठे इत्यादी व अन्य सदर मिळकतीचा विक्री व्यवहार करीत आहेत. त्यामुळे वरील जमीन मिळकत नविन खरेदीदारांने खरेदी केल्यास ते खरेदीदार प्रामाणिक व्यवहारामध्ये आमचे खरेदीदार राहणार नाहीत. तसेच, या अशिलांना त्यांचे गट नंबर २६१ मध्ये असलेल्या कायदेशीर हक्क, हितसंबंधांपासून वंचित रहावे लागणार आहे तसेच आमचे अशिलांचे वरील गट नं.२६१ मध्ये असलेले हक्क हितसंबंध डावलून असा जर कोणताही व्यवहार केल्यास तो व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी तसेच आमचे अशिल हे वरील मिळकती संदर्भात पुढील काळात वाटपाचा दावा दाखल करणार आहेत.

आमचे अशिलांचे वरील मिळकत गट क्र.२६१ मध्ये असलेले कायदेशीर अविभक्त हिस्सा व हितसंबंधांबाबत व गट नं.२६४ ची असलेली वस्तुस्थिती सदर तमाम जनतेला माहित व्हावी व त्यांची फसवणूक होऊ नये याकरिता सदरची नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २०.६.२०२६

सही/-
**ॲड. अजय उपाध्ये.**
श्रीनिल सोसायटी, तळमजला,
श्री गणपतीचे देवळाजवळ,
ब्राह्मण आळी, अलिबाग रायगड.
९८५०५७०९७७


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## पाहिजेत

महाराष्ट्र शिक्षण संस्था पेण या संस्थेच्या सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज पेण या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत विना अनुदानित तत्वावर सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षक म्हणून खालील शैक्षणिक अर्हतेच्या उमेदवारांच्या जागा भरावयाच्या आहेत.

✲ माध्यमिक विभाग इयत्ता ५ वी ते १० वी साठी
१. एच. एस. सी. डी. एड.-(०२ जागा)
२. संस्कृत - बी. ए. बी. एड.- (०१ जागा)
३. मराठी - बी. ए. बी. एड - (०१ जागा)
४. इतिहास बी. ए. बी. एड- (०१ जागा)
✲ कनिष्ठ महाविद्यालय इयत्ता ११ वी १२वी साठी
१. एस. पी. - एम. कॉम. बी. एड. (०१ जागा)
२. मराठी- एम. ए. बी. एड.- (०१- जागा)
(शिकविण्याचा अनुभव आवश्यक)
संस्थेच्या कार्यालयीन कामकाजासाठी
१. शिपाई - इयत्ता १० वी पर्यंत - (१ जागा)

या अर्हतेच्या उमेदवारांनी शनिवार दि. २७/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज पेण येथील कार्यालयात सर्व मूळ कागदपत्र व प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह स्वःखर्चाने उपस्थित राहावे.

आपला विश्वासू
सही/-
**अध्यक्ष**
**महाराष्ट्र शिक्षण संस्था पेण**



## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे सामाईक मालक श्री.आत्माराम शंकर वाव्हळ यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे भालिवडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७/१ एकुण ०.४१.०० पोट खराबा ०.००.२० गुंठे असे एकुण क्षेत्र ०.४१.२० पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे ०.२०.०० जागा विकत घेणार आहेत तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २१/०६/२०२६

**ॲड नयन सुभाष भोईर**
पत्ता मु.भालिवडी पो. गौळवाडी,
ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९७६५३७५६६९



## जाहीर नोटीसला उत्तर

ॲड. संजीव अनिल घरत, मु. खंडाळे यांनी सोमवार दि. १५/०६/२०२६ रोजीच्या दै. कृषिवल या वर्तमानपत्रामध्ये पान नं. ७ वर श्री. दिपम जयंतीभाई पटेल यांच्या मालकीच्या मौजे बामणसुरे, ता. अलिबाग येथील गट नं. ३२, ३३, ३४ या मिळकती त्यांचे अशिल विकत घेत असल्याबाबत मालकांबरोबर बोलणी करत असल्याची जाहीर नोटीस दिली आहे. त्या नोटीसला आमचे अशिल श्री. विकास अनंत विचारे रा. आगरसुरे यांची हरकत आहे. आमचे अशिल श्री. विकास अनंत विचारे व त्यांचे सहहिस्सेदार यांच्या मालकीची मौजे बामणसुरे ता. अलिबाग येथे भूमापन क्र. ३१/१ अशी मिळकत असून ती गट नं. ३२ ला लागून आहे. ॲड. संजीव अनिल घरत यांच्या नोटीसमध्ये गट नं. ३१/१ या मिळकती मधून ६० मीटर रूंद व ४०० मीटर लांब असा वहीवाटीचा रस्ता असल्याबाबत व त्या रस्त्याबाबत कोणाची हरकत असल्यास त्या व्यक्तीने आपली हरकत त्यांचेकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात नोंदवावी असे लिहीले आहे. आमचे अशिल व त्यांचे सह हिस्सेदारांनी कधीही त्यांच्या मिळकतीमधून ६० मी. रुंद व ४०० मी. लांब किंवा ६० मी. रूंद व ४० मी. लांब असा वहीवाटीचा रस्ता कधीही दिपम जयंतीभाई पटेल यांना दिला नव्हता व नाही. तसेच आमचे अशिलांचे मालकीचे जागेत एवढ्या लांबी रूंदीचा रस्ताही नाही. त्यामुळे दिपम जयंतीभाई पटेल यांचेकडे त्याबाबत कोणते कागदपत्र असतील तर ते त्यांनी आमचे अशिलास किंवा आम्हास दाखवावेत. अन्यथा ॲड. संजीव अनिल घरत यांचे अशिलांनी सदरचा व्यवहार करू नये हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
ता. २०/०६/२०२६

सही/-
**ॲड. शिरीष प.लेले**
अलिबाग


पान १ वरून

## स्मार्ट मीटरची सक्ती नको!

आयोजित करण्यात आली. पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांच्या दालनात झालेल्या बैठकीला शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत, अलिबाग नगरपरिषदेचे पाणी सभापती अनिल चोपडा, शोधन ठाकरे तसेच महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता तायडे व इतर अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी कोणतीही जनजागृती अथवा सूचना दिली जात नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच शासकीय कामात अडथळा आणल्याची कारवाई करण्याची भाषा वापरून सर्वसामान्य नागरिकांना धमकावले जात असल्याचा आरोप करण्यात आला. महावितरणच्या मनमानी कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

स्मार्ट मीटरचे फायदे आणि तोटे याबाबत महावितरणकडून प्रभावी जनजागृती केली जात नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी स्मार्ट मीटरमुळे वीज बिले वाढत असल्याच्या तक्रारी समोर येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांच्या घरी स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती केली जात असून, अधिकारी व कर्मचारी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून नागरिकांना वेठीस धरत असल्याचा आरोप ॲड. मानसी म्हात्रे आणि सुरेश घरत यांनी बैठकीत केला.

स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबविण्याची मागणी करत अन्यथा न्यायालयीन लढा उभारण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावर पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत महावितरण कंपनीने स्मार्ट मीटरबाबत व्यापक जनजागृती करावी, नागरिकांमधील भीती आणि संभ्रम दूर करावा, असे निर्देश दिले. वृत्तपत्रे, ग्रामपंचायत बैठका आणि स्थानिक संवादाच्या माध्यमातून माहिती देण्यात यावी, जेणेकरून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## पेणमध्ये दमदार बरसला

वातावरणही प्रसन्न झाले. या पावसामुळे शेतकरी वर्गामध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीच्या कामांना गती मिळण्याची आशा निर्माण झाल्याने बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. पावसामुळे जमिनीला ओलावा मिळाल्याने आगामी कृषी हंगामाबाबत सकारात्मक चित्र निर्माण झाले आहे.

मात्र, हा पाऊस पुढेही सातत्याने बरसेल का, याबाबत शेतकऱ्यांच्या मनात अजूनही साशंकता कायम आहे. पेरणी आणि शेतीच्या पुढील कामांसाठी नियमित व समाधानकारक पावसाची आवश्यकता असल्याने बळीराजाचे लक्ष आता आकाशाकडे लागले आहे. पहिल्या दमदार पावसाने पेणकरांना दिलासा मिळाला असला, तरी खरी गरज सातत्यपूर्ण पावसाची असल्याची भावना नागरिक आणि शेतकरी व्यक्त करत आहेत.

## पुराव्यांअभावी सर्व आरोपी निर्दोष

करण्यात आली होती. गोळीबारात पवनराजेंचा चालक समद काझी याचा देखील मृत्यू झाला होता. विशेष न्यायालयामध्ये जवळपास २० वर्षे हा खटला चालला. गेल्यावेळी मुख्य शूटर पिंटू चौधरी (पिंटू सिंह) याला प्रत्यक्ष कोर्टात हजर न केल्याने विशेष न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलत निकालासाठी आणखी काही दिवसांची गरज असल्याचे न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी म्हटले आणि सुनावणी २० जूनपर्यंत तहकूब केली होती.

दरम्यान, हे प्रकरण प्रथम नवी मुंबई पोलिसांकडे होते. मात्र तपासाच्या प्रगतीबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर निंबाळकर यांच्या पत्नीच्या मागणीनुसार याचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला. सीबीआयने माजी गृहमंत्री आणि माजी खासदार पद्मसिंह पाटील यांच्यावर राजकीय आणि व्यावसायिक वैरातून हत्या घडवून आणल्याचा आरोप ठेवला होता.

‘‘सुमारे २० वर्षे चाललेल्या या खटल्यात १२८ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचाही समावेश होता. हत्येची सुपारी स्वीकारल्याचा आरोप असलेला पारसमल जैन नंतर माफीचा साक्षीदार झाला. या खटल्यावर शनिवारी निकाल देण्यात आला. या सुनावणीवेळी ८६ वर्षांचे पद्मसिंह पाटील हे देखील उपस्थित होते.

हल्ल्यात वापरलेल्या गाडीचे तपशील जुळत नाहीत, तसेच मयत व्यक्तीचे सीडीआर आणि इतरांचे सीडीआरही जुळत नाहीत असे न्यायालयाने म्हटले. एवढेच नाही तर माफीच्या साक्षीदाराच्या जबानीतही प्रचंड तफावत आहे, असे म्हणत न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

## आज नीट यूजी पुनर्परीक्षा

विद्यार्थ्यांना सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेदरम्यान एखाद्या विद्यार्थ्याची बायोमेट्रिक पडताळणी तांत्रिक कारणांमुळे अयशस्वी ठरली तरी त्याला परीक्षा देण्यापासून रोखले जाणार नाही. वैध ओळखपत्रांच्या आधारे हस्तपडताळणी करून प्रवेश दिला जाणार आहे. परीक्षा केंद्रांवर पिण्याचे पाणी, वीज, पंखे, वैद्यकीय सुविधा आणि अतिरिक्त बायोमेट्रिक यंत्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्र, मूळ ओळखपत्र आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणावेत, असे आवाहन एनटीएकडून करण्यात आले आहे. मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅल्क्युलेटर व अन्य इलेक्ट्रॉनिक वस्तूंना परीक्षा केंद्रात बंदी घालण्यात आली आहे.

## शेतकरी विधवांसाठी शासकीय पडीक जमीन

सेवा सहकारी संस्थांना प्रत्येकी अडीच एकर जमीन पाच वर्षांच्या भाडेतत्त्वावर देण्यात येणार असून, एक लाख रुपयांचे अनुदानही दिले जाणार आहे. या निर्णयामुळे महिलांना गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून पडीक शासकीय जमिनींचा उत्पादक वापर होणार आहे.

## नि|व|ड|क



### उरणकरांची तहान वाढली

**उरण :** महिनाभर पावसाने पाठ फिरवल्याने उरण शहरासमोरील पाणीटंचाईचे संकट अधिकच गडद झाले आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील जलसाठा धोकादायकरीत्या खालावून अनेक ठिकाणी तळ गाठल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठा जास्तीत जास्त काळ टिकवून ठेवण्यासाठी उरण नगरपालिका प्रशासनाने आठवड्यातील तीन दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. नगरपालिकेने जारी केलेल्या सूचनेनुसार, प्रत्येक मंगळवार, शुक्रवार आणि रविवार या दिवशी शहरातील सर्व भागांमध्ये पाणीपुरवठा बंद राहणार आहे. उर्वरित दिवसांमध्येही नागरिकांनी पाण्याचा अत्यंत जपून आणि काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यंदा मान्सूनचे आगमन झाल्यानंतरही अपेक्षित पाऊस न झाल्याने धरणांमध्ये नव्याने पाणीसाठा निर्माण होऊ शकलेला नाही. परिणामी शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला असून उपलब्ध जलसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यावर निर्बंध लावण्याशिवाय प्रशासनासमोर पर्याय उरलेला नसल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, उरण शहरातील नागरिकांमध्ये आणखी एक गंभीर चर्चा रंगू लागली आहे. नगरपालिकेकडे पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणांची कोट्यवधी रुपयांची थकबाकी असल्याने गेल्या काही महिन्यांपासून पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अनेक भागांतील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. मात्र, याबाबत अधिकृत स्तरावर कोणतीही स्पष्ट भूमिका समोर आलेली नाही.

### म्हात्रे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**उरण :** जेएनपीटी बंदरातून होणारी अवैध ई-सिगारेट, अमली पदार्थ व इतर प्रतिबंधित वस्तूंची तस्करी रोखून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा दि. २५ जुलै रोजी जेएनपीटी बंदरावर आमरण उपोषण करू. असा इशारा जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष समाधान म्हात्रे यांनी पत्रव्यवहाराद्वारे प्रशासनाला दिला आहे. या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून निवेदनसुद्धा दिले आहे. समाधान म्हात्रे यांनी दिलेल्या निवेदनात, रायगड जिल्हा तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अमली पदार्थांचे सेवन, खरेदी-विक्री, रेव्ह पार्टी आणि विविध प्रकारच्या व्यसनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्यामुळे युवक, विद्यार्थी आणि नव्या पिढीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून समाजासमोर गंभीर सामाजिक व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अलीकडेच जेएनपीटी येथे फर्निचरच्या नावाखाली आयात करण्यात आलेल्या कंटेनरमधून तब्बल ९२.८० कोटी रुपये किंमतीच्या सुमारे १.१६ लाख प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक सिगारेट (व्हेप्स) जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई महसूल गुप्तचर संचालनालय व सीमाशुल्क विभागाने केली असल्याचे वृत्तात नमूद आहे. फर्निचर असल्याचे घोषित केलेल्या मालामध्ये ई-सिगारेट लपवून तस्करी करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे उघड झाले आहे. ही घटना अत्यंत गंभीर असून बंदरातून अवैध माल देशात कसा प्रवेश करतो, याबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर तस्करीचा प्रयत्न होत असताना संबंधित व्यापारी, आयातदार, क्लिअरिंग एजंट, बंदरातील अधिकारी व इतर संबंधित घटकांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच अशा मालाला परवानगी देणारे किंवा दुर्लक्ष करणारे अधिकारी यांचीही जबाबदारी निश्चित करून त्यांच्या संपत्तीची व आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात यावी. तस्करी करणाऱ्या संबंधितांवर त्वरित कठोर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा समाधान म्हात्रे यांनी प्रशासनाला दिला आहे.





### खालापूर पोलिसांची दमदार कारवाई

रसायनी : खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पोलीस आणि वाहतूक पोलिसांनी विना हेल्मेट दुचाकी स्वार यांच्यावर दंडात्मक कारवाई करून दंड वसूल केल्याने दुचाकीस्वार यांना घाम फुटला आहे. दरम्यान, चार दिवसांत तीन दुचाकीस्वार हे हेल्मेट न घातल्याने जीवाला मुकले आहेत. त्यामुळे रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक आंचल दलाल यांनी रस्ता सुरक्षा आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस प्रशासन व वाहतूक पोलीस यांना विना हेल्मेट वाहन चालवणाऱ्यांवर कडक दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या धडक कारवाईत १०३ दुचाकीस्वारांवर गुन्हा दाखल करून १ लाख ३ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. या कारवाईचे कौतुक आणि समाधान व्यक्त होत आहे. हेल्मेट न वापरल्याने दुचाकी अपघातात डोक्याला गंभीर दुखापत होण्याचा धोका ७४ टक्केपर्यंत वाढतो आणि मृत्यू ओढवण्याची शक्यता सहा पटीने अधिक असते. अपघाताच्या वेळी हेल्मेट थेट डोक्यावर होणारा आघात शोषून घेते, त्यामुळे डोक्याची कवटी फुटणे आणि मेंदूला होणारे प्राणघातक नुकसान टाळता येऊ शकते. यावेळी खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक राजेंद्र आरोळे, पोलीस किरण शेळके, जयेश कुथे, अजित सुपेकर, शनिराजे हारजे, कोमल ओंबळे, मनीषा केंद्रे आदीनी यांनी कारवाई केली आहे.

### रेल्वेच्या धडकेत अज्ञाताचा मृत्यू

**पनवेल :** तालुक्यातील मोठे भिंगार गावाजवळ एका अनोळखी व्यक्तीलाला तेथून जाणाऱ्या रेल्वेची धडक बसून दुदैवी घटना घडली. या दुर्घटनेत त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत. ही अनोळखी व्यक्तीचे अंदाजे वय ३५ आहे. धावत्या रेल्वेची धडक बसल्याने या व्यक्तीच्या शरिराची दोन तुकडे होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोउपनि सरदार वसेकर यांच्याशी संपर्क साधावा.

# वाळवटीमधील विजेचा प्रश्न सुटला

## चित्रलेखा पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**| मुरुड | प्रतिनिधी |**



कमी दाबाच्या विज पुरवठ्यामुळे मुरुड तालुक्यातील वाळवटी येथील नागरिक त्रस्त झाले होते. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने ही समस्या तातडीने सोडविण्यात आली. चित्रलेखा पाटील यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून वाळवटी गावांतील नागरिकांसाठी नवीन विद्यूत रोहित्र बसविण्यात आले. चित्रलेखा पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे कमी दाबाच्या वीज समस्येचा कायम स्वरुपी निपटारा झाला असून, गावांतील नागरिकांसह महिला वर्गाकडून आभार व्यक्त करण्यात आले.

मुरुड तालुक्यातील वाळवटी गावामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून कमी दाबाच्या वीजपुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. अपुऱ्या विद्युत दाबामुळे ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. घरगुती वापरातील विद्युत उपकरणे वारंवार बंद पडत होती. त्याचा आर्थिक फटका नागरिकांना बसत होता. विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या समस्येची तीव्रता अधिक जाणवत होती. ग्रामस्थांनी ही समस्या शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. जनतेच्या प्रश्नांबाबत सदैव संवेदनशील असलेल्या चित्रलेखा पाटील यांनी या प्रश्नाची तात्काळ दखल घेत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. महावितरण अधिकाऱ्यांकडे वाळवटी येथील नागरिकांच्या व्यथा प्रभावीपणे मांडल्या. या समस्येवर त्वरित आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश मिळाले. मूरूड तालुक्यातील मोहल्ला येथे नवीन विद्युत रोहित्र बसविण्यात आले. परिणामी गावातील कमी दाबाच्या वीजपुरवठ्याची समस्या मोठ्या प्रमाणात दूर झाली असून, नागरिकांना आता सुरळीत वीजपुरवठा मिळू लागला आहे. या कामामुळे वाळवटी गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांनी चित्रलेखा पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत. चित्रलेखा पाटील यांनी आमची समस्या स्वतःची समजून शासन व प्रशासन दरबारी प्रभावी पाठपुरावा केला. त्यामुळे आज आमच्या गावाला दिलासा मिळाला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.




# जिल्हा कारागृहात विधी साक्षरता कार्यक्रम

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे जिल्हा अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड व जिल्हा कारागृह अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमधील जिल्हा कारागृहात बंद्यासाठी विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश रेवती एम. कंट यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी रेवती एम. कंटे यांनी, मोलाचे मार्गदर्शन करताना कायदेविषयक जागरूकता वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कायदेशीर सहाय्य संरक्षण वकील प्रणालीचे सहाय्यक ॲड. पियुष गडे यांनी अंमली पदार्थांच्या व्यसनाचे दुष्परिणाम, निर्मूलन, जनजागृती, शिक्षण, प्रतिबंध आणि पुनर्वसन उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. ॲड. निलोफर शेख यांनी, प्ली बार्गेनिंग या विषयावर सविस्तर माहिती दिली. तसेच, कारागृहे, पोलीस ठाणे व इतर संबंधित ठिकाणी उपलब्ध असलेल्या मोफत विधी सहाय्य सुविधा, नालसा स्पृहा योजना २०२५ आणि सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयांविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# खोदकामांमुळे रस्त्यांची दुरवस्था

**| खांदा वसाहत | प्रतिनिधी |**

नवीन पनवेल परिसरातील विविध सेक्टरमध्ये गॅस पाइपलाइन टाकण्याच्या कामासाठी अनेक अंतर्गत रस्ते खोदण्यात आले होते. संबंधित काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची दुरुस्ती करण्याऐवजी केवळ माती टाकून खड्डे बुजवण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्या अनेक ठिकाणी रस्ते उखडलेल्या अवस्थेत असून ठिकठिकाणी खड्डे आणि उंच-सखल भाग निर्माण झाले आहेत. त्याचा सर्वाधिक फटका दुचाकी वाहनचालकांना बसत असून, वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक ठिकाणी वाहन घसरून किरकोळ अपघात होण्याच्या घटनाही घडत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.





शेकापच्या प्रगती शिंगरुत यांची कामार्ले उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी कामार्ले ग्रामपंचायत मधील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेकापकडून लेखन स्पर्धेचे आयोजन

## चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सन्मान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना अलिबाग तर्फे सोमवारी (दि.१५) राज्यस्तरीय खुली लेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून अनेक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये अमर म्हात्रे, साहिल चौलकर आणि राजश्री कंबार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकवला. या स्पर्धेचे विषय हे सध्याच्या वास्तविक परिस्थितीवर आधारित होते. त्यामध्ये ''विकासाच्या गप्पा आणि बेरोजगार युवकांची वास्तवता'', ''स्पर्धा परीक्षा, पेपर फुटी आणि उद्ध्वस्त होणारे करिअर'', ''तरुणाई रस्त्यावर आणि सत्ताधारी जाहिरातीत'', आणि ''शेती, उद्योग आणि ढासळती ग्रामीण अर्थव्यवस्था'', असे चिंतनशील विषय होते. या सर्व विषयाला अनुसरून अनेक स्पर्धकांनी आपल्या लिखाणामधून वैचारिक प्रबोधन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांना शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते प्रथम क्रमांकास २ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास दिड हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १ हजार रुपये रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष विक्रांत वार्डे, नागावचे माजी सरपंच नंदू मयेकर यांच्यासह सुरेश खोत, प्रमोद घासे, प्रा. निशिकांत कोळसे, लेखन स्पर्धेचे समन्वयक प्रा. मिलिंद घाडगे आदी उपस्थित होते.

### दंगा काबू योजनेची रंगीत तालीम

**पनवेल :** तालुका पोलिसांच्या माध्यमातून डेरवली गाव येथे दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. या दंगा काबू योजनेच्या रंगीत तालीममध्ये वपोनि गजानन घाडगे, पो.नि.कांबळे यांच्यासह ०३ सपोनी/पोउपनि, २२ पोलीस अंमलदार पीटर मोबाईल, पीटर मोबाईल ३, तसेच पनवेल उपजिल्हा रुग्णालयातील १ रुग्णवाहिका १ व २ डॉक्टर स्टाफसह उपस्थित होते. तसेच, यावेळी दंगा काबू योजनेतील सर्व अधिकारी व अंमलदार यांना कवायतीचे प्रशिक्षण देण्यात आले. उपस्थितीत अधिकारी व अंमलदार यांना दंगली मध्ये घ्यावयाच्या दक्षतेबाबत आवश्यक त्या सूचना वपोनि गजानन घाडगे यांनी दिल्या.

# विवेक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

शेकापचे माजी आमदार विवेकानंद पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उरण तालुक्यातील पिरकोन येथील राजिप प्राथमिक शाळेत शेकाप तालुका चिटणीस रवी घरत यांच्या सौजन्याने शुक्रवारी (दि.१९) शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचायत गावंड, महिला आघाडी अध्यक्षा समता गावंड, महिला प्रतिनिधी बेबी गावंड, पिरकोन ग्रामपंचायत सदस्य तथा शाळा व्यवस्थापन कमिटी सदस्य निखिल गावंड, शाळा व्यवस्थापन कमिटीच्या रेशमा गावंड, सुप्रिया गावंड, श्रद्धा पाटील यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



# सततच्या कारवाईने दारू माफिया धास्तावले

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्यातील गावठी दारू विरोधातील मोहीम नागोठणे पोलिसांनी अधिकाधिक तीव्र केली आहे. शुक्रवारी (दि.१९) सकाळी नागोठणे-रोहा मार्गालगतच्या चेराठी व काळकाई या आदिवासी वाड्यांतील जंगल परिसरात सुमारे २५ किलोमीटर आत जाऊन पोलिसांनी दोन ठिकाणी धडक कारवाई केली. दरम्यान, नागोठणे पोलिसांच्या सततच्या कारवाईमुळे नागोठणे हद्दीतील जंगल परिसरात गावठी दारूची निर्मिती करणारे दारू माफिया चांगलेच धास्तावले आहेत. या दोन गुन्ह्यात एकूण १ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला आहे. पहिल्या ठिकाणी एकूण २० लिटर तयार गावठी दारू व १ हजार लिटर गूळ मिश्रित रसायन असे एकूण किंमत रुपये ५२ हजार, तर दुसऱ्या ठिकाणी एकूण २५ लिटर तयार गावठी दारू व १४०० लिटर गूळ मिश्रित रसायन असा एकूण किंमत रुपये ७२ हजार एवढ्या किंमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

# रेवदंडा बायपास रस्त्यावर डंपिंग ग्राऊंड

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा बायपास रस्त्यावर अनाधिकृत डंपिंग ग्राऊंड निर्माण झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे त्याचा प्रवासी व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.पावसाळा तोंडावर आला असताना संबंधित प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून हा कचरा हटवावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

रेवदंडा बायपास परिसरात काही नागरिकांकडून कचरा टाकण्यात येत असल्याने तेथे अनधिकृत डंपिंग ग्राउंड तयार झाले आहे. याठिकाणी कचऱ्याचा ढीग दिवसेंदिवस वाढत असून, संपूर्ण परिसर दुर्गंधीयुक्त बनला आहे. तसेच, या कचऱ्यामुळे भटक्या कुत्र्यांचे टोळके परिसरात कायम वावरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. या बायपास मार्गावरून मुरूड, रोहा तसेच अलिबाग तालुक्याकडे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. पर्यटकांची वाहनेही या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे गावाच्या प्रवेशद्वारावरच निर्माण झालेले हे अनधिकृत डंपिंग ग्राऊंड रेवदंडाच्या स्वच्छ व सुंदर प्रतिमेला गालबोट लावत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिकांच्या मते, काही काळ ग्रामपंचायतीची घंटागाडी सेवा बंद राहिल्यामुळे नागरिकांनी या ठिकाणी कचरा टाकण्यास सुरुवात केली. तसेच, घंटागाडीच्या वेळांचे योग्य नियोजन नसल्याने अनेकांना नियमित सेवा उपलब्ध होत नसल्याची तक्रारही करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबरोबरच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याची गरज व्यक्त होत आहे. पावसाळ्यात कचऱ्यामुळे दुर्गंधी आणि आरोग्यविषयक समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून अनधिकृत डंपिंग ग्राऊंड हटवावे, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.



**हजारो एकर वन जमिनीचा वापर | प्रस्तावित प्रकल्प पर्यावरणाच्या मुळावर**

# कर्जत तालुका येणार भूकंपाच्या छायेत

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात हजारो एकर वन जमिनीवर टोरंट कंपनी जलविद्युत प्रकल्प साकारत आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी वन जमिनीवर बुलडोझर फिरवला जाणार असून, तालुक्यात पर्यावरणाचा ऱ्हास करण्यास कारणीभूत ठरणार आहे. दरम्यान, तालुक्यात पाच धरणे बांधली जात असून, कर्जत तालुका भविष्यात भूकंप प्रवण तालुका बनणार असल्याचे बोलले जात आहे.



कर्जत तालुक्याच्या दक्षिण दिशेला उल्हास नदीवर सिडको कडून कोंढाणे धरण, पूर्व भागात पोटल पाली आणि कोतवाल खलाटी भागात टोरंट प्रकल्प, भिवपुरी भागात पेज नदीवर टाटा प्रकल्प, बोरगाव येथील पोश्री नदीवर पोशीर धरण आणि चिल्हार नदीवर शिलार येथे शिलार धरण होणार आहे. या पाचही धरणांमुळे कर्जत तालुक्यातील नद्या पावसाळ्यात देखील कोरड्या राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, ही धरणे बांधली जात असताना अब्जवधी लिटर पाण्याचा साठा होणार आहे. त्या पाण्याच्या साठ्यामुळे कर्जत तालुक्याला दररोज भूकंपाचे हादरे बसण्यास सुरुवात होणार आहे. कर्जत तालुक्यात सध्या गरज नसतानाही पाच धरणे बांधली जाणार असल्याने कर्जतकर भुकंपाच्या छायेखाली येणार आहेत.

तसेच, ही धरणे बांधली जात असताना त्याचा तेथील जमिनीवर परिणाम होणार आहे. प्रकल्पासाठी शेत जमीन घेतली जाईल. त्यामुळे शेती क्षेत्र कमी होणार आहे. त्याचबरोबर प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जातील. झाडतोडीमुळे जंगलातील प्राणी, पक्षी व कीटकांचे अधिवास नष्ट होतील. जैवविविधता कमी होईल; काही प्रजातींचे लुप्त होण्याचा धोका आहे. मोठ्या प्रमाणात फॉरेस्टची जमिन देखील संपादन होणार आहे. दरम्यान, प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागेल, त्यामुळे शेतकऱ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागू शकतो. तसेच, प्रकल्पातील मशीन व वाहतूकामुळे धूळ, कार्बन डायऑक्साईड व इतर प्रदूषक वायू हवेत मिसळतील. त्यामुळे स्थानिक लोकांमध्ये श्वसनाचे आजार, दम आणि त्वचेचे आजार वाढू शकतात. प्रदुषित हवा झाडे व पिकांवरही परिणाम करेल.

### प्रकल्पाविरोधात आंदोलनाची शक्यता

येथील झाडे तोडल्यामुळे हवामान उष्ण होणे, मातीची ओलसरता कमी होईल व पावसाळ्यात भूस्खलन व मातीची धूप होईल. पक्षी व कीटक कमी होऊन परागीकरण आणि फळ उत्पादनावर परिणाम होईल. तसेच, मानवी आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कर्जत तालुक्याचा ऱ्हास करणारी प्रकल्प सरकारने रद्द करावेत. यासाठी मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## निवडक



### स्मार्टमीटर विरोधात निवेदन

**म्हसळा :** रेवली, बनोटी आणि गणेशनगर गावातील ग्रामस्थांनी उपअभियंता मेंदडी वीज वितरण कार्यालयात निवेदन देऊन स्मार्ट मीटरची जबरदस्ती न करण्याचे आवाहन केले आहे. स्मार्ट मीटर आणि प्रीपेड मीटरला सक्त विरोध करीत रेवली, बनोटी आणि गणेशनगर ग्रामस्थानी मेंदडी वीजवितरण कार्यालयावर धडक दिली. कोणत्याही वीज ग्राहकावर स्मार्ट आणि प्रीपेड बसविण्यास जबरदस्ती केल्यास तीव्र जन आंदोलन छेडण्याचा इशाराही याप्रसंगी देण्यात आला. यावेळी कोणता मीटर वापरायचा याचे कायदेशीर अधिकार ग्राहकाचे असल्याचे लक्ष वेधण्यात आले. त्वरित हा प्रकार थांबला नाही तर संघर्ष समिती मार्फत मोठ्या प्रमाणात मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी संघर्ष समिती अध्यक्ष समीर काळोखे, उपाध्यक्ष संतोष पाटील, शाहिद उकये, सुमित सावंत, रेवली ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष अनिल टिंगरे, रमेश डोळकर, रेवली सरपंच देवजी गाणेकर, दिनेश कांबळे, गणेश नगर, एकनाथ गाणेकर, नागेश माळी, निळकंठ गाणेकर, हेमंत कांबळे, बाळाराम पाटील, यशवंत कांबळे, पोलीस पाटील, अनंत पाटील व रमेश खोत आदी मान्यवर उपस्थित होते.



### सुधागडातील आरोग्य उपकेंद्रांची पाहणी

**पाली :** सुधागड तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी जि.प. सदस्य शर्मिला बोडके व चंद्रकांत वारगुडे यांनी सिद्धेश्वर, आतोणे व नाडसुर या गावातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला शुक्रवारी (दि.१९) भेट दिली. त्याचबरोर येथील आरोग्य सुविधांची देखील सविस्तर पाहणी केली. पावसाळ्याच्या काळात साथीचे आजार, ताप, सर्दी, डेंग्यू, मलेरिया इत्यादीं आजारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन आरोग्य उपकेंद्रात आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय साहित्य, तसेच विविध उपचार सुविधांची उपलब्धता तपासण्यात आली. आरोग्य उपकेंद्रातील डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून रुग्णसेवेदरम्यान येणाऱ्या अडचणी, विविध प्रलंबित प्रश्नांची माहिती घेण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवेसाठी कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. औषधसाठा, स्वच्छता, रुग्णांच्या उपचाराची गुणवत्ता आणि आपत्कालीन सेवांची उपलब्धता याबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.



### पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन

**खांदा वसाहत :** साईनगर परिसरातील नागरिकांच्या मागणीला प्रतिसाद देत आणि स्थानिकांच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या नवीन साईनगर पोलीस मदत केंद्राचे उदघाटन शुक्रवारी (दि.१९) उत्साहात पार पडले. या मदत केंद्राचे उद्घाटन पनवेल परिमंडळ-३ च्या पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. साईनगर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्याबरोबरच नागरिकांना तातडीची पोलीस मदत उपलब्ध व्हावी या उद्देशाने हे मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे. उद्घाटन प्रसंगी स्थानिक लोकप्रतिनिधी लतीफ शेख यांच्यासह साईनगर परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत परिसरातील सुरक्षिततेसाठी हे मदत केंद्र महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रम शांततापूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिली.

### अतिदुर्गम भागातील मुलगी झाली वकील

**म्हसळा :** तालुक्यातील अतिदुर्गम साळविंडे ताडाचीवाडी येथील समाजसेवक अनिल काप यांची कन्या सानिका काप हिने एल.एल. बी



पदवी ही मानाची पदवी प्राप्त केली आहे. वकील होणे हे सोपे काम नाही. त्यासाठी अनेक वर्षांची मेहनत, संयम आणि समर्पण आवश्यक असते. आज स्वतःच्या कष्टांच्या बळावर सानिकाचे हे स्वप्न पूर्ण झाले आहे. तिच्या या यशामध्ये तिचे आईवडील, कुटुंबीय, नातेवाईक व ग्रामस्थ यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन लाभले. सानिकाचे प्राथमिक शिक्षण पार्ले टिळक विद्यालय व साठे कॉलेज सायन्समध्ये पदवी पर्यंत शिक्षण झाले आहे. आता तिने मुंबई विद्यापीठातून वकीलचे शिक्षण पूर्ण करून मानाची पदवी मिळवली आहे. सानिका सध्या मॅट मधून एम.बी. ए.चे पुढील शिक्षण घेत आहे. भविष्याात एल.एल.एम. करण्याचे मानस आहे.

### चौक येथील कारखान्याला भीषण आग

**रसायनी :** जुना मुंबई-पुणे रस्त्यावर चौक हद्दीत प्लास्टिक वस्तू बनविणाऱ्या कारखान्याला आग लागून मोठी वित्त हानी झाली आहे. याठिकाणी प्लास्टिक खेळणी, प्लास्टिक वस्तू आणि फायबर वस्तू बनविणारा कारखाना आहे. या कारखाना शेजारी मोठ्या प्रमाणात कचरा होता, त्याला लावलेली आग या भीषण आगील कारणीभूत असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. कारखान्यात असणारे केमिकलने पेट घेतल्याने परिसरात उग्र वासाचा त्रास जाणवत असून, धुराचे लोट दूर पर्यंत पसरले होते. घटनास्थळी औद्योगिक विकास महामंडळांचे दोन अग्निशमन दल दाखल झाले होते. त्यापूर्वी ग्रामस्थ ही आग विझविण्याचा प्रयत्न करीत होते. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक सचिन पवार व चौक प्रभारी विशाल पवार हे दाखल होऊन आत असलेले साहित्य, केमिकलचे डबे, तयार झालेला माल बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर या आगीवर नियंत्रण मिळविता आले.

# यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस

■ एल-निनोचा शेतीवर परिणाम
■ शेतीमध्ये बदल करण्याचा तज्ज्ञांचा महत्त्वाचा सल्ला

| नेरळ | प्रतिनिधी |

भारतीय हवामान विभागाने यंदाच्या खरीप हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचा अंदाज जाहीर केला आहे. यंदा एल-निनो परिस्थितीमुळे महाराष्ट्रात सरासरीपेक्षा १६.४४ टक्के कमी पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषिविद्या विभागाच्यावतीने हवामानावर आधारित पूर्व-हंगाम सल्ला (मिशन मौसम-३) जारी करण्यात आला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी आपल्या पारंपरिक शेतीमध्ये बदल करण्याची सूचना केली आहे.

कृषी विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, कर्जत तालुक्याचा खरीप हंगामातील सरासरी पाऊस सुमारे ३२७५ मिमी इतका आहे. मात्र, यावर्षी ऐतिहासिक पर्जन्यमानाच्या विश्लेषणाचा आधार घेतला असता यापूर्वी जेव्हा जेव्हा कमी पावसाची वर्षे आली, तेव्हा तालुक्यात सुमारे २७३६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच सरासरीच्या तुलनेत



यंदा १६.४४ टक्के कमी पाऊस पडण्याचा थेट धोका निर्माण झाला आहे. एल-निनोमुळे शेतीसमोर उभी ठाकणारी मुख्य आव्हाने उभी राहिली आहेत. याबाबत प्रकल्प प्रमुख डॉ. वैभव राजेमहाडीक, विभाग प्रमुख डॉ. अशोककुमार चव्हाण आणि यंग प्रोफेशनलचे सचिन गुरव यांनी शेतकऱ्यांना हवामानातील या संभाव्य धोक्यांची माहिती दिली आहे. मान्सूनला होणार विलंब पाहता यंदा मान्सूनचे आगमन लांबणीवर पडले आहे. त्यामुळे यंदा दीर्घकालीन पावसाचा खंड राहणार असून, पाऊस सुरू झाल्यानंतरही त्यात मोठा खंड पडू शकतो, अशी भीती शास्त्रज्ञ व्यक्त करीत आहेत. पावसाच्या लपंडावामुळे पावसाअभावी पिकांच्या उगवण अवस्थेत आणि वाढीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यांवर जमिनीतील ओलावा संपून पिके सुकण्याचा धोका वाढेल. या हवामानजन्य उत्पादन जोखमीपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी शेतकऱ्यांनी आतापासूनच पीक पद्धतीत बदल करणे आणि कृषी निविष्ठांचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे, असा सल्ला जज्ज्ञांनी दिला आहे.

### शेतकऱ्यांना महत्त्वाच्या सुचना

जास्त पाणी लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र घटवा, अशी महत्वाची सूचना शास्त्रज्ञांकडून करण्यात आली आहे. कर्जत तालुक्यामध्ये भात हे मुख्य पीक असून, ते पावसातील कमतरता आणि दीर्घ कोरड्या कालावधीस सर्वाधिक संवेदनशील आहे. विशेषतः तालुक्यातील वरकस (हलक्या) जमिनी आणि ज्या भागात जमिनीतील ओलावा टिकून राहण्याची क्षमता कमी आहे. त्यामुळे भात खाचरांमध्ये पाण्याची पातळी नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे यावेळी रत्नागिरी-७३, कर्जत-१८४, रत्नागिरी-२४, कर्जत-३, कर्जत-४ आणि कर्जत-७ या वाणांची शिफरस करण्यात आली आहे. त्याचबरोबर वरी, नागली, नाचणी तूर व चवळी अशी पीके घेण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

## रोहा नगरपरिषदेकडून पाणीपट्टीमध्ये वाढ

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा-अष्टमी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेवर वाढत्या खर्चाचा ताण पडत असून, नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा सुरू ठेवण्यासाठी अनेक वर्षांनंतर पाणीपट्टीमध्ये वाढ करण्यात आल्याची माहिती नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी पत्रकार परिषदेत दिली. नागरिकांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासनाने सुचविलेल्या दरापेक्षा कमी दर निश्चित करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

नगर परिषदेच्या आकडेवारीनुसार सन २०२५-२६ मध्ये पाणीपट्टीतून सुमारे १ कोटी ३६ लाख ४९ हजार ६७६ रुपये



उत्पन्न मिळाले असून, पाणीपुरवठा विभागाचा अपेक्षित खर्च ३ कोटी २ लाख ७५ हजार रुपये इतका आहे. त्यामुळे पाणीपुरवठा योजना मोठ्या प्रमाणात तोट्यात चालत असल्याचे स्पष्ट होत आहे. एल निनोच्या परिणामामुळे पावसाचे प्रमाण घटल्याने भविष्यात पाण्याची उपलब्धता आणि व्यवस्थापन हे मोठे आव्हान ठरणार आहे. दुसरीकडे वीजबिलात झालेली वाढ, कर्मचाऱ्यांच्या वेतनातील वाढ, कच्च्या पाण्याच्या देयकांमध्ये झालेली वाढ, महागाई आणि पाणीपुरवठा यंत्रणेच्या देखभाल-दुरुस्तीवरील वाढता खर्च यामुळे पाणीपट्टी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे नगराध्यक्षा शेडगे यांनी सांगितले. शासनाच्या नियमानुसार पाणीपट्टीमध्ये वार्षिक ३,६०० रुपयांपर्यंत वाढ अपेक्षित होती. मात्र सर्वसामान्य नागरिकांचा विचार करून नगरपरिषदेने ही वाढ कमी करत २,८०० रुपये इतकी ठेवली असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पत्रकार परिषदेला उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, पाणीपुरवठा सभापती महेंद्र दिवेकर, मुख्याधिकारी अजय एडके, पर्यटन व नियोजन सभापती महेश कोलाटकर, शिक्षण सभापती रविंद्र चाळके, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगरसेवक अजित मोरे, प्रशांत कडू, पूर्वा मोहिते, नीता हजारे, फराह पानसरे तसेच नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचे परीक्षेत घवघवीत यश

| नागोठणे | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे यंदा घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत नागोठण्याजवळील वेलशेत येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एस.एस.ओ.एस.पी डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून, ९४.७१ टक्के गुण मिळवून कॉम्प्यूटर विभागाची श्रावणी बामणे ही महाविद्यालयातून प्रथम आली आहे. यावेळी महाविद्यालयाचा प्रथम वर्षाचा एकूण निकाल ७६.२५ टक्के इतका लागला आहे. त्यामध्ये इलेक्ट्रिकल विभागाचा निकाल १०० टक्के, सिव्हिल विभागाचा ७६.४७ टक्के, मेकनिकल विभागाचा ९७.६० टक्के, कॉम्प्यूटर विभागाचा १०० टक्के तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागाचा १०० टक्के इतका निकाल लागला आहे. यावेळी इलेक्ट्रिकल विभागातून प्रियांका चिकटे ८८.७२ टक्के, सिव्हिल विभागातून विनोद पाटील ८४.११ टक्के, मेकनिकल विभागातून कुमार मोकल ८३.७९ टक्के, कॉम्प्यूटर विभागातून श्रावणी बामणे ९४.४१ टक्के, तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागातून अनुष्का लोखंडे ९०.७१ टक्के यांनी प्रथम क्रमांक मिळविला.




## मैत्री ग्रुप तर्फे स्वच्छता मोहीम

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यातील मालाठे येथे असलेल्या द्रोणागिरी देवस्थान परिसरामध्ये मैत्री ग्रुप तर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. एप्रिल महिन्यात भरत असलेल्या यात्रेसाठी मोठ्या प्रमाणावर भाविक याठिकाणी दाखल होत असतात. येथील परिसराचे पावित्र्य जपले जावे, तसेच हा परिसर कायम स्वच्छ रहावा या उद्देशाने मालाठे येथील मैत्री ग्रुप तर्फे याठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी द्रोणागिरी देवस्थान, धुळ्यावरचा माल येथे फलक लावून पद्मावती आई गाभारा व परिसर, श्री द्रोणागिरी विनोबा देवाचा गाभारा व परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी मैत्री ग्रुप मालाठे अध्यक्ष प्रणित ठमके, रोहित गायकर, मंगेश माने, भरत गायकर, सुहास गायकर, रोहित माने, नरेश ठमके व ज्ञानेश्वर महाडिक आदी उपस्थित होते.

## मीनाक्षी गोसावी यांचे निधन

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धानकान्हे येथील मीनाक्षी मंगेश गोसावी (४५) यांचे शुक्रवारी (दि.१२) निधन झाले. मिनाक्षी गोसावी यांचे अत्यंत अल्पवयातील निधनाबद्दल समस्त गोसावी परिवारासह धानकान्हे गावावर शोककळा पसरली असून, सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चत पती, एक मुलगा, एक मुलगी, जावई असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी रविवारी (दि.२१), तर अंतिम धार्मिकविधी बुधवारी (दि.२४) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## लेडीज बारविरोधात मनसेचा एल्गार

| पनवेल | ग्रामीण प्रतिनिधी |

जिल्ह्यात सुरू असलेल्या लेडीज बार आणि ऑर्केस्ट्रा बारविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. हे बार कायमस्वरूपी बंद करण्याच्या मागणीसाठी दि.१९ जुलैपासून पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मनसेचे पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले यांनी केली. या संदर्भात शनिवारी (दि.२०) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.



या पत्रकार परिषदेत बोलताना चिले यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत, ''छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड जिल्ह्यात महिलांना बारमध्ये नाचवण्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. लेडीज बारच्या आड अनेक अनैतिक आणि बेकायदेशीर धंदे सुरू असून, प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे,'' असा आरोप केला. तसेच, लेडीज बार आणि ऑर्केस्ट्रा बारमध्ये शासकीय नियमांचे खुलेआम उल्लंघन होत असून, अनेक ठिकाणी गैरकृत्यांना प्रोत्साहन मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. पनवेलसह पुणे, पिंपरी-चिंचवड आणि इतर भागांतील नागरिक या बारमध्ये येत असल्याने अनेक तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. मनसेच्या या आक्रमक भूमिकेमुळे जिल्ह्यातील लेडीज बारचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सन्मान

| नेरळ | प्रतिनिधी |

राज्य सरकारच्या कृषी विभागाच्यावतीने देण्यात येणारे शेतीनिष्ठ शेतकरी आणि कृषी भूषण शेतकरी पुरस्कार जाहीर झाले आहेत. यावेळी हा पुरस्कार कर्जत तालुक्यातील वदप येथील विनय वेखंडे आणि पेण तालुक्यातील मसदबेडी येथील हरिश्चंद्र पाटील यांना जाहीर झाला आहे. कृषी दिनी या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक कृषी पुरस्काराची नुकतीच घोषणा झाली आहे. सन २०२३-२४ मधील शेतीनिष्ठ शेतकरी आणि कृषी भूषण शेतकरी यांची घोषणा



कृषी विभागाच्यावतीने करण्यात आली आहे.कृषी विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारात २०२३च्या पुरस्कारामध्ये कर्जत तालुक्यातील वदप गावातील शेतकरी विनय मारुती वेखंडे यांचे नाव जाहीर झाले आहे. वेखंडे यांच्या कडे दुबार शेती केली जात असून, खरीप हंगामात भाताचे विक्रमी उत्पादन घेतले जात असते. राज्य सरकारच्या भात पीक स्पर्धेत वेखंडे यांनी यापूर्वी हेक्टरी सर्वाधिक भाताचे उत्पादन करून पुरस्कार मिळवला आहे. तर, रब्बी हंगामात राजनाला कालव्याच्या पाण्यावर कडधान्य तसेच भाजीपाला शेती करीत असतात. शेतीमधून पिकणाऱ्या पिकावर वेगवेगळ्या प्रक्रिया करून शेती करण्याचे त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे वेखंडे यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, तालुका कृषी अधिकारी दिनेशकुमार कोळी यांनी ही माहिती दिली आहे.

## काशिनाथ सोनावणे यांचे निधन

| वावोशी | प्रतिनिधी |

ज्येष्ठ बौद्धाचार्य, श्रामणेर तथा जिल्ह्याचे प्रथम केंद्रीय शिक्षक काशिनाथ सोनावणे यांचे दि.१५ जून रोजी निधन



झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन स्नुषा व नातवंडे असा परिवार आहे. सोनावणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुण्यानुमोदन व श्रद्धांजली सभेचे आयोजन शनिवारी (दि.२७) सकाळी ११.०० वाजता खालापूर येथील नावंढे येथे करण्यात आले आहे.



## गोवे शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप

| कोलाड | प्रतिनिधी |

गोवे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच नितीन जाधव यांच्या तर्फे शुक्रवारी (दि.१९) येथील रा.जि.प. शाळेतील व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, खाऊ, तसेच शाळेला सिलिंग फॅनचे वाटप करण्यात आले. त्यानंतर इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी गोवे ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र पवार, निशा जवके, रंजीता जाधव, गोवे गावकमेटी अध्यक्ष राजेश शिर्के, पोलीस पाटील, सुरेश जाधव, रामचंद्र कापसे, महेंद्र जाधव, भरत जाधव, सत्कार कापसे, कुमार शिर्के, नामदेव जाधव उपस्थित होते.

प्रशासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय | विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य

# उष्माघाताच्या धोक्यामुळे शाळा सकाळी

| माणगाव | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या तीव्रतेमुळे आणि उष्माघाताचा धोका लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याचे आदेश जारी केले आहेत. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला




जात असून, पालकांमधूनही त्याचे स्वागत होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून रायगड जिल्ह्यात उष्णता आणि दमट हवामानाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. हवामान विभागानेही दुपारच्या वेळेत उष्णतेचा त्रास वाढण्याची शक्यता व्यक्त केली असून, काही भागांत वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचाही अंदाज वर्तविला आहे. मात्र, दुपारच्या वेळेतील कडक ऊन आणि दमट वातावरणामुळे लहान विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता प्रशासनाने गांभीर्याने घेतली आहे. प्राथमिक शाळांमध्ये शिकणारी मुले ही वयाने लहान असल्याने त्यांना उष्णतेचा त्रास अधिक होऊ शकतो. उष्माघात, चक्कर येणे, थकवा, निर्जलीकरण यांसारख्या समस्या उद्भवू नयेत यासाठी शाळांचे वेळापत्रक सकाळच्या सत्रात ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता हेच प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे, शालेय शिक्षण विभागाने यापूर्वी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून हे आदेश लागू करण्यात आले आहेत. संबंधित सर्व शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांना या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### विद्यार्थ्यांना दिलासा

सध्या उन्हाळ्याच्या झळा आणि बदलत्या हवामानामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात होती. अशा परिस्थितीत प्रशासनाने वेळेवर घेतलेल्या या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. शाळांमध्ये सकाळच्या वेळेत शिक्षण सुरू राहिल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळणार असून, त्याचबरोबर त्यांच्या आरोग्याचे संरक्षणही होणार आहे.जिल्हा प्रशासनाच्या या संवेदनशील आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य दिले गेल्याची भावना पालक, शिक्षक आणि नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी घेतलेले हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह ठरत आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२१ जून

१) श्री.शंकर रामचंद्र जोशी चेंढरे-अलिबाग दि.२१-६-१९५४

२)संजय शशिकांत धारिया अलिबाग दि.२१-६-१९६४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**श्री. संजय रमेश गोळे, वाढदिवस अलिबाग**

## विशाल रांजाणे एलएलबी उत्तीर्ण

**। माथेरान। प्रतिनिधी।**



माथेरानचा विशाल रांजाणे यांनी नुकताच एलएलबी परीक्षेत उत्तीर्ण होऊन माथेरानच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. जिद्द आणि चिकाटी अंगीकृत असणारे विशाल यांनी अपार मेहनत घेऊन एलएलबी परीक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या पालकांच्या कष्टाचे चीज केले आहे.त्यांच्यावर समाज माध्यमांतुन अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# योगसाधना हीच निरोगी जीवनाची गुरुकिल्ली



**रणवीर राजपूत**

योगविद्या ही भारताने जगाला दिलेली मोठी देणगी आहे. भारतीय योगसाधनेला सुमारे पाच हजार वर्षाची वैभवशाली परंपरा आहे. योग हा प्राचीन भारताचा अनमोल ठेवा आहे. शरीर व मन यांच्यातील आंतरिक नात्याला योगाभ्यासात अनन्यसाधारण महत्व आहे.

मानवी जीवनात मानसिक संतुलन, समग्रता, आत्मशांती, शारीरिक स्वास्थ्य लाभणे, ही योगाभ्यासाची मुख्य उद्दिष्टे आहेत. योग हा मूळ संस्कृत शब्द असून, त्याचा अर्थ जोडणे वा जुळविणे असा होतो. योग विद्येतून शरीर व मन या दोन घटकांना एका धाग्यात ओवून त्यांच्यात मेळ घातला जातो. थोडक्यात योग मार्गाचा अवलंब केल्याने निरोगी आरोग्य लाभून निरामय जीवनाची दृष्टी लाभते, हे त्रिकाल सत्य आहे.

सध्याच्या धावत्या जगात माणसात ताणतणाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच आधुनिक विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवाच्या जीवनशैलीत (लाईफस्टाईल) आमूलाग्र बदल होताहेत. त्यामुळे काही प्रमाणात युवकांमध्ये चंगळवाद वाढीस लागला आहे.जेवणाच्या ताटात चौरस आहाराची जागा आता पिझ्झा, बर्गर, चायनीज फूडने घेतली असल्याचे सर्वत्र आढळते. त्यात स्पर्धात्मक युगाची भर पडली आहे. परिणामी युवकांच्या स्वास्थ्यावर याचे विपरित परिणाम होत असल्याचे प्रकर्षाने दिसते. अशा ताणतणावाच्या कारणांमुळे भारत ही आता जगाची मधुमेहाची राजधानी झाली आहे.

आजच्या युवा पिढीच्या आहारामधील जंक फूडचे वाढते प्रमाण बघता, मधुमेहासह रक्तदाब, लठ्ठपणा, ॲसिडीटी हे विकार जडत चालले आहेत. हे सर्व घालविण्यासाठी योग साधना करणे ही काळाची गरज आहे. स्पर्धेच्या युगात युवा वर्गात नोकरी, व्यवसायसंदर्भात मोठा ताणतणाव असतो. या पार्श्वभूमीवर मानवी जीवनातून ताणतणावाच्या गोष्टी कायमच्या हटविण्यासाठी योगसाधनेची कास धरणे आवश्यक आहे.कारण त्यातून मन स्थिर तर, शरीर चपळ व सुदृढ होण्यास बळ मिळत आहे.

भारत हा साऱ्या जगात युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. केवळ भारताच्या युवा पिढीचेच नव्हे तर अन्य वयोगटातील व्यक्तींचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य निरोगी व सुदृढ रहावे, या प्रांजळ उद्देशाने, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.२७ सप्टेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत योगाभ्यासाचा प्रस्ताव मांडत त्याचे महत्त्व अन् उपयुक्तता विशद केली. योगाभ्यासामुळे मानवाच्या जीवनात लक्षणीय परिणाम होऊन त्यात आमूलाग्र परिवर्तन होते, हे जगाच्या प्रतिनिधींना त्यांनी पटवून दिले. त्याची परिणिती म्हणजे त्यांच्या प्रस्तावास व्यापक प्रमाणात प्रतिसाद मिळून सुमारे १७० देशांनी त्यास मान्यता दिली. अंततः २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यास संयुक्त राष्ट्रसंघाने मंजुरी दिली, ही गोष्ट भारताच्या दृष्टीने मोठ्या सन्मानाची आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जनतेला आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. चला तर, योगाभ्यासाचा अंगिकार करूया अन् आपले मन व शरीर सुदृढ व निरोगी बनवूया !

# कर्जतच्या बाजारात जांभळाचा महापूर

**● आदिवासी बांधवांना रोजगाराचे साधन**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आरोग्यवर्धक असलेले जांभूळ या फळाचे पीक कर्जत तालुक्यात अमाप येऊ लागले. कर्जतमध्ये हा व्यवसाय करणारे आदिवासी झाडावर चढून जांभळे काढून त्यांची विक्री करण्याची मेहनत घेऊन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. कर्जत शहरात श्री कपालेश्वर मंदिर येथे असंख्य आदिवासी महिला जांभळे विकण्यासाठी येत असतात.

काळीभोर आणि निलेशार जांभूळ खरेदी करण्यासाठी पुणे आणि कल्याण येथून घाऊक विक्रेते येत असतात. दररोज किमान ५०० किलो जांभळे यांची विक्री होत असल्याचे बोलले जात आहे. प्रामुख्याने तालुक्यातील वासरे परिसर,जामरुख परिसर, तसेच राजनाला परिसरात मोठ्या प्रमाणात जांभळांच्या झाडांची लागवड काही वर्षापूर्वी प्रयत्नपूर्वक करण्यात आली होती.त्यात प्रामुख्याने वजनाला जास्त भरणारी आणि चवदार अशी गर्वी आणि अन्य प्रकारच्या झाडांची लागवड झाली होती. त्यातही भेंडी जांभूळ, गोलटा, खट्टामिट्ठा आणि कोयना या जातीची आरोग्यास अनुकूल आणि आरोग्यवर्धक समजली जाणारी अशी जांभळे यांची झाडे लावली गेली होती. त्या झाडांवरील जांभळे काढून त्यांची कर्जतच्या स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणात विक्री मे महिन्यात होत असते.

आदिवासी लोकांना त्यातून रोजगार मिळत असतो. परंतु, आदिवासी कुटुंबातील महिलांना मात्र सकाळी झाडावरुन काढलेली जाभळांची पाटी घेऊन कर्जतच्या बाजारात यावे लागते. या आदिवासी लोकांनी व्यवसाय करण्यासाठी जांभळांना भरलेले संपूर्ण झाड खरेदी केलेले असते. त्यावेळी त्या झाडावरून दिवसाआड चांगली तयार झालेली जांभळे काढण्यात येतात, आणि दुसऱ्या दिवशी विक्रीसाठी बाजारात आणली जातात. या कालावधीत आपण विकत घेतलेल्या झाडावरील जांभळे अन्य कोणी काढून घेत नाही ना? यावर देखील आदिवासी लोकांना नजर ठेवावी लागते. तर दुसरीकडे ते सम्पूर्ण झाड फळ काढण्यासाठी विकत घेतलेले असल्याने चांगला भाव मिळावा म्हणून दलाल लोक आणि खरेदीसाठी आलेल्या महिला यांच्याशी घासाघीस करीत अधिक भाव पदरात पाडून घ्यायचा प्रयत्न करीत आहेत. वट पौर्णिमेसाठी महिलांना पूजेसाठी जांभळाचे फळ आवश्यक असल्याने त्यासाठी देखील काही आदिवासी लोक झाडे निश्चित करून ठेवत असतात. मात्र, हा सिझनेबल व्यवसाय अनेकांचा उदरनिर्वाह चालविणारा असल्याने आणि जांभळं ही आरोग्यास गुणकारी असल्याने ती खावी अशीच वाटत असतात,त्यामुळे या व्यवसायाला मरण नाही.



### हाऊसमध्ये जाणीवपूर्वक लागवड

दमा आणि हृदयाचे त्रास असलेल्या व्यक्तींना जांभळाचे फळ गुणकारी असते हे विज्ञानाने सिद्ध केले असल्याने गेल्या काही वर्षात फार्म हाऊसमध्ये देखील जाणीवपूर्वक आणि व्यवसाय लक्षात घेऊन जांभळाची झाडे लावली गेली आहेत. त्यातही प्रामुख्याने डहाणू भागातील जांभळे या झाडांची लागवड कर्जतच्या फार्महाऊसवर केलेली दिसून येत आहे.

## गोपीनाथ सोनावणे यांना पितृशोक



पाली/बेणस : जिल्ह्यातील आंबेडकरी व बहुजन समाजातील लढवय्ये नेते, गोपीनाथ सोनावणे यांचे वडील काशिनाथ रामभाऊ सोनावणे यांचे निधन (दि.१५) जून रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, १ मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या स्मरणार्थ पुण्यानुमोदन व श्रद्धांजली सभा शनिवार, २७ जून रोजी सकाळी ११ वाजता, रा. नावंडे ता. खालापूर, येथे आयोजित करण्यात आली आहे. विविध स्तरांतून दिवंगत काशिनाथ सोनावणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांची नजर पुन्हा आभाळाकडे

**काही दिवसांपासून ढगाळ वातावरण**

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

पावसाळ्याची चाहूल लागताच रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा आभाळाकडे लागल्या आहेत. मे महिन्याच्या कडक उन्हात आणि वाढत्या तापमानात शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनीची मशागत पूर्ण केली असून, अनेक ठिकाणी नांगरणी, वखरणी तसेच पेरणीपूर्व तयारीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत.

मात्र, आता सर्वांचे लक्ष मान्सूनच्या आगमनाकडे लागले असून, वेळेवर आणि समाधानकारक पाऊस पडणे हीच शेतकऱ्यांची प्रमुख अपेक्षा बनली आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, रोहा, माणगाव, तळा, श्रीवर्धन आणि महाड तालुक्यांतील शेतकरी सध्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक ठिकाणी भातशेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने पावसाच्या प्रत्येक सरीकडे शेतकऱ्यांचे बारकाईने लक्ष लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी समाधानकारक पाऊस अद्याप झालेला नाही. त्यामुळे शेतकरी वर्गात उत्सुकतेसोबतच काहीशी चिंता देखील आहे. पावसाचे आगमन झाल्यानंतर शेतांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या बळीराजाच्या घामाच्या प्रत्येक थेंबातून अन्नधान्याची निर्मिती होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीला निसर्गाची साथ मिळणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांचे आर्थिक गणित मान्सूनवरच अवलंबून असल्याने यंदाचा पाऊस चांगला व्हावा, अशी प्रार्थना ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे. विशेषतः भातखाचरांसाठी प्रसिद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यात मान्सूनचे महत्त्व अधिक आहे. वेळेवर पाऊस पडल्यास भात लागवडीला गती मिळेल, शेतमजुरांना रोजगार उपलब्ध होईल तसेच ग्रामीण अर्थचक्राला चालना मिळेल. उलट पाऊस लांबल्यास शेतीची कामे विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २१ ते २७ जून २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### दुसऱ्यांना मदत करा

**मेष :** हा साप्ताह मेषराशीधारकांना थोडा निवांतपणाचा जाणार आहे. दुसऱ्यांना मदत करण्याची संधी सोडू नका. यामुळे तुमचा भविष्यात फायदा होऊ शकेल. आपल्या जोडीदाराला मदत करावी लागेल, त्यामुळे घरातील वातावरण चांगले ठेवता येईल. मित्रपरिवारा सोबत गाठभेट झाल्याने जुन्या आठवणीना उजाळा मिळेल. आपल्या कामात बदल करण्याचे विचार डोक्यात चालू असतील तर त्याला सध्याच्या स्थितीमध्ये हवा देऊ नका वातवरण चांगले नाही त्यामुळे नुकासन होऊ शकते. शांतपणे विचारपूर्वक घेतलेले निर्णय हे आपल्याला भविष्यासाठी उपयोगी पडणार आहेत. विशेषता भावनेच्या भरात घेतलेल्या निर्णया बाबत चूक होण्याची शक्यता राहील. मनस्थिती चांगली ठेवण्यासाठी विचारापासून लांब राहा. उद्योगधंद्यात हळूहळू कामांना गती प्राप्त होईल. नोकरदारांनी मात्र, थोडी सावध भूमिका घेण्याची गरज आहे. आपल्या आजूबाजूला लक्ष ठेऊन काम करावे. **महिलांना** : महिलावर्गाने तब्बेतीची विशेष काळजी घ्यावी. जागरण व अतिताण धोकादायक ठरू शकतो. **शुभ दिनांक** : २३,२४.

### ज्येष्ठ व्यक्तींची काळजी घ्या

**वृषभ** : हा साप्ताह वृषभराशीसाठी कटकटी निर्माण करणारा ठरू शकतो. कामाचा ताण, स्वरूप बदलणार आहे. मात्र, त्याकडे संधी म्हणून पाहिलेत तर योग्यवेळी त्याचे पडसाद आपल्याला मिळणार आहेत. पैसे मिळवण्यात अडचणी येतील त्यामुळे निराश होऊ नका. थोडा संयम या कलावधीत गरजेचा आहे हळूहळू वातवरण सुधारत जाईल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींची काळजी घेण्याची गरज आहे. त्याच्या नियमित ओषध उपचाराकडे दुर्लक्ष करू नका. या राशीच्या व्यक्तींनी आपला प्रवास सावधान पूर्वक करावा प्रवासाला निघताना नियोजण करणे आवश्यक आहे त्यामुळे आपला होणारा त्रास वाचू शकेल, वहान चालवणाऱ्यांनी वाहनाच्या वेगा बाबत पूर्ण सावधानता पाळावी. आपली महत्वाची कागदपत्रे गहाळ होणार नाहीत याची काळजी घ्या. व्यापारीवर्गाने जास्त गुंतवणूक करण्याच्या भानगडीत पडू नका. घरात आपण शांत राहाण योग्य होईल नाहीतर कारण नसताना वातवरण बिघडेल, त्याच्या परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. **महिलांना** : महिलावर्गाचा हा कालवधी सणसमारंभात व्यस्त होणार आहे. घरात नवीन वस्तूची खरेदी करताना लक्षपूर्वक घ्या, फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. **शुभ दिनांक** : २१,२४.

### अतिविचार करू नका

मिथुन : हा साप्ताह मिथुनराशीसाठी अडचणीचा ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येक पाउल सावधानपूर्वक उचलण्याची गरज आहे. ताक देखील फुकून पिण्याचा कालावधी आहे. कोणतीही गोष्ट घाईत करू नका, तसेच गरज नसणाऱ्या गोष्टीचा अतिविचार करू नका. आपले विरोधक आपल्यावर कुरघोडी करू शकतात. कामावर थोडा तणाव अनुभवाल आर्थिक अडचण दूर करण्यासाठी बुधवारी मोनपाळणे फायद्याचे ठरेल. कोणतही महत्वाचे काम योग्य सल्ल्याशिवाय करू नका. थोडे थांबा वाट पाहा मार्ग मिळेल. राजकारणी व्यक्तींनी या कालावधीत सावध राहावे आपल्यावर आरोप होऊ शकतात. आपल्या मनमोकळ्या स्वभावाला थोडा मुरड घालण्याचे मानसिक पथ्य आपल्याला या वेळी फायदा देणारे ठरू शकते. आपल्याकडे असलेल्या दूरदृष्टीचा योग्य उपयोग करून घ्या. व्यसनापासून जितके दूर राहाता येईल तितके दूर राहणे आवश्यक आहे. आता जे श्रम कराल त्याचा फायदा नतर आपल्याला होणार आहे. **महिलांना** : महिलावर्गाने या कालवधीत शाकाहारी होणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. घरात एकादी गोड बातमी मिळण्याचा संभव आहे. सकाळी मुंग्यांना थोडी साखर घालावी. **शुभ दिनांक** : २५,२६.

### नकारात्मक विचारांपासून दूर रहा

**कर्क :** हा साप्ताह कर्कराशीसाठी अडचणी दूरकरणारा असेल. जी कामे अडकली असतील तिला चालना देण्यास हरकत नाही ती योग्य मार्गाने होऊ शकतात. जमिनीच्या व्यवहारात काम करणाऱ्या व्यक्तींना फायदा संभवतो, आपला भावनेच्या भरात वहात जाणारा स्वभावावर नियत्रंण मिळवू शकल. कोणतेही कठीण काम या सप्ताहात पूर्ण करू शकाल. शत्रूने आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला तरी या कालावधीत आपल्या हितचिंतकांमुळे आपल्याला साह्य मिळणार आहे. कोणतीही गोष्ट मनावर घेत बसू नका. नकारात्मक विचारांपासून दूर राहणे आपल्या हिताचे आहे. घरातील कामासाठी थोडा अधिक वेळ देणे आपल्यासाठी चांगले ठरेल. आपल्याला कार्यात यश मिळण्याचा मार्गमोकळा असल्यामुळे नव्या कार्याला सुरवात करण्यास हरकत नाही. कामामधून आपल्या कार्याला वाव देणाऱ्या घटना घडणार आहेत अशावेळी पाठ फिरवू नका. सभोवताली आनंदी वातारण राहील. प्रवासाचा बेत सध्या टाळा. **महिलांना** : कोणाचेही बोलणे मनाला लाऊन घेऊ नका, त्यात आपली शक्ती वाया जाते हे लक्षात ठेवा. आपल्या कामात गुंतून राहा. **शुभ दिनांक** : २१,२७.

### वादविवादापासून लांब रहा

**सिंह :** हा साप्ताह सिंहराशीसाठी धनाचा मार्ग मोकळा करणारी असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण होणार आहे. आता केलेली बचतच पुढे उपयोगी पडू शकते. त्याबरोबर हा कालावधी थोड गंभीरतेने घेण्याचा सुद्धा आहे. कोणतीही गोष्ट हलक्याफुलक्यारीतीने घेऊ नका. दुसऱ्यांनच्या कामाकडे यावेळी लक्ष न देता स्वतःच्या कामाकडे लक्ष देण हे आपल्याला हितकारक आहे. उगाचच दुसऱ्याच्या भानगडीत नाक घुसवून आपण अडचणीत येऊ नका. आपले दुख कोणाला न सांगता मनात दाबून ठेवणे हे तब्बेतीच्या दृष्टीने त्रासदायक ठरू शकते. नोकरदारवर्गाला मनाजोगत्या बदलीसाठी वरिष्ठांना बोलण्यास हरकत नाही. मात्र, कामावर वादविवादापासून लांब रहाणे चांगले होईल. व्यापारी वर्गाने एकद्या नवीन व्यवहारात भाग घेण्यास हरकत नाही. साठवणुकीच्या भानगडीत मात्र पडू नये. **महिलांना** : महिलावर्गाने आपण भले आपले काम भले अस धोरण ठेवणे फायद्याचे राहील, नवीन कपडा, दागिने याची खरेदी संभवते. **शुभ दिनांक** : २२,२४.

### अनोळखी व्यक्तींशी व्यवहार टाळा

**कन्या :** हा साप्ताह कन्याराशीसाठी सावधानता बाळगणारा असणार आहे. कोणत्याही वादविवादा पासून लांब राहा, विशेषता तरुणांनी या कालावधीत मोबाईल, इंटरनेट ही गोष्ट पूर्ण सावधानतेनेच वापराव्यात ज्यांना शक्य असेल त्यांनी या पासूनलांब राहणे चांगले ठरेल. कोणताही पैशाचा व्यवहार करताना लक्षपूर्वक करा. महत्वाची कागदपत्रे कितीही जवळची व्यक्ती असली तरी पूर्ण वाचूनच त्यावर सही करावी. अनोळखी व्यक्तींशी व्यवहार टाळणे योग्य होऊ शकते पण त्यात हि व्यवहार आवश्यक असेल तर तो हा कालावधी संपल्यानंतर करणे उत्तम राहील. नोकदार व्यवसाइकानी सध्या कोणताही मोठा बदल करू नका, लवकरच परिस्थितीत सामान्य होणार आहे थोडा संयम गरजेचा राहील. मानसिक आरोग्य हीच शारीरिक आरोग्याची गुरुकिल्ली आहे हे विसरू नका. मानसन्मान मिळण्याची संधी आहे त्यांनी प्रयत्न करण्यास हरकत नाही. कुंडलीत राजयोग असेल तर हा कालावधी राजकारण्यासाठी चांगली बातमी देणारा ठरू शकतो. **महिलांना** : महिलावर्गाने या कलावधीत कर्ज, उधारी या भानगडीत पडू नये. घरात स्वयंपाक करताना योग्य काळजी घ्या. **शुभ दिनांक** : २१,२४.

### नवीन आर्थिक स्तोत्र मिळतील

**तुळ** : हा साप्ताह तुलराशीसाठी शुभयोग घेऊन आलेला आहे. जे काही कराल त्यात यश सहज मिळू शकेल असा कालावधी असला तरीपण डोक्यात हवा जाऊन देऊ नका. आपल्याला एखादे नवीन आर्थिक स्तोत्रही मिळण्याचा संभव आहे. मात्र, अशावेळी आपली सदविवेकबुद्धी जागृत ठेवणे महत्वाचे ठरेल. एखादा जवळचा मित्र आपल्या शब्दामुळे दूर जाणार नाही याची काळजी घ्या. कालावधी चांगला आहे या कालावधीत आपण चांगल्या योजना कार्यन्वित करू शकाल. आता केलेले सामाजिक काम आपल्याला भविष्यात उपयोगी पडणार आहे. नोकदारवर्गाला आपल्या कामामुळे प्रशंसा अनुभवण्यास मिळेल. वरिष्ठ खुश असतील तेव्हा आपल्या पदोन्नतीचा प्रस्ताव त्यांना देण्यास हरकत नाही. मुलांचे अभ्यासात मन लागणार कलावधी आहे, त्यांनी भविष्याच्या दृष्टीकोनातून हालचाल करण्यास हरकत नाही. स्पर्धा परीक्षाच्या दृष्टीकोनातून आपली तयारी करा यश मिळेल. **महिलांना** : महिलांच्या हातात पैसा खेळता राहणार आहे. एखादे धार्मिककार्याची तयारी कराल. **शुभ दिनांक** : २५,२६.

### घरात शुभकार्य होण्याची शक्यता

**वृश्चिक :** हा साप्ताह वृश्चिकराशीसाठी खूपच आशादायक जाणार आहे. एखादे नवीन उत्पन्नाचे साधन आपल्याला गवसणार आहे. फक्त घाई करू नका, अति घाई संकटात नेई हे लक्षात ठेवा. एखादी चांगली सुरुवात आपल्याला लाभ देणारी ठरू शकेल. आपण कार्यरत असलेल्या कार्यक्षेत्रातही वाढ होणार असल्यने, त्याचा फायदा आपल्याला मिळेल. आपल्या सर्वश्रेष्ठ कार्याची सुरुवातही असू शकते. बेरोजगारांनी नोकरीसाठी प्रयत्न करण्यास हरकत नाही. मोठा सन्मान प्राप्त होण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल सुरू होईल. आत्मविश्वास वाढणाऱ्या घटना घडतील. घरात शुभकार्य करण्याच्या दृष्टीने तयारी कराल. लहान मोठे खर्च होतील पण पैशाचा मार्ग हि आपल्याकडे वळणार असल्याने त्या खर्चाची गणिते जुळतील. आपली कोणतीही मेहनत वाया जाणार नाही. विद्यार्थीवर्गाने थोडी अधिक मेहनत घेण्याची आवश्यकता आहे. **महिलांना** : महिलावर्गाने आपल्या तोंडावर नियंत्रण ठेवणे हितकारक आहे, नाही तर या गोष्टी भांडणाला कारणीभूत होऊन यशाच्या मार्गात अडथला येऊ शकतो. **शुभ दिनांक** : २४,२७.

### पैशाचे योग्य नियोजन करा

**धनु :** हा साप्ताह धनुराशीसाठी अनावश्यक खर्च वाढवणारा असू शकतो, त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे हिताचे आहे. तरीही हा कलावधी आपल्यासाठी लाभदायक ठरणार आहे. आपल्याकडे येणाऱ्या पैशात वाढ संभवते आहे. नवीन व्यवसाय चालू करण्यास हरकत नाही. वहान, जागा खरेदीची इच्छा पुणे करण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल चालू होईल. आपण बऱ्याच दिवसाची एखादी अपूर्ण इच्छा पूर्ण करू शकाल. कामगारवर्गाच्या कामात सुधारणा झाल्याने या क्षेत्रात आपले वलय वाढेल. घरातील ज्येष्ठ व्यक्ती विषयी चिंता वाढेल. थोड त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. वेळेवर औषध उपचार केल्यास आजारपण लांब ठेवता येईल. चैनीवर खर्च करू नका, आपल्याकडे आलेल्या पैशाचे योग्य नियोजन आवकश्यक आहे. घरघुती आर्थिक प्रश्नमार्गी लागू शकतील. **महिलांना** : महिलावर्गाने जास्त ताण न घेता घरातील वातावरण हलक फुलक करण्याचा प्रयत्न करा. नोकरदार स्त्रियांना कामात बदल करण्याचे मनात असेल तर येणारा कालावधी मंदीचा असल्याने जोखीम घेऊ नका. नंतर संधी मिळणार आहे फक्त थोडा संयम ठेवा. **शुभ दिनांक** : २१,२ ५.

### धन लाभ होण्याची शक्यता

**मकर** : हा साप्ताह मकरराशीसाठी भौतिक सुख सुविधांचा लाभ देणारा आहे. आपले विरोधक हि विचारात पडतील असे कार्य आपल्याकडून घडणार आहे. आपले कौतुक होण्याचा कालावधी आहे. आपल्या नातेवाईकांचे आपल्याला साह्य मिळेल. नवीन जागा घेण्या बाबत हालचाल करण्यास हरकत नाही त्याला चांगले रूप देऊ शकाल. फक्त देईल हरी खाटल्यावरी असे धोरण टाळा. ससर्गजन्य आजारापासून काळजी घेण्याची गरज आहे. थोड तापासारखे वाटेल घाबरून जाऊ नका, हे व्हायरल असणार आहे. जेवणखान वेळेवर करत जा. विद्यार्थीवर्गाचे मन पुन्हा अभ्यासाकडे वळेल. व्यवसायीकांनी नवीन प्रस्ताव स्वीकारण्यास हरकत नाही. आठडवड्याच्या शेवटी धन लाभ संभवतो आहे फक्त लॉटरी, सट्टा हा मार्ग मात्र टाळा. घरात खास मेजवानी चा बेत केला जाईल. अडकलेले काममार्गी लागेल. **महिलांना** : आपण भले की आपले काम भले असे धोरण आपल्याला हितकारक ठरणार आहे. घरात अचानक आलेल्या पाहुण्यांन मुले आपली धावपळ होणार आहे, मात्र अतिथि देवभव प्रमाणे आपल्याला आशीर्वाद मिळणार आहेत. **शुभ दिनांक** : २३,२४.

### नवीन वस्तूची खरेदी कराल

**कुंभ** : या साप्ताहात आपण एकट राहणे पसंद करणार आहात. आपण एकट राहून स्वतः बद्दल केलेला विचार आपल्या प्रगतीसाठी उपयोगी पडणार आहे. एकट राहण्याने आपल्याला आंतरिक बल ही मिळणार आहे. ताजे तवाने होऊन आपण पुन्हा कामाला लागू शकाल. आपल्या सुदैवाने हा साप्ताह कुंभराशीसाठी ढगाळवातावरण बदलवणारा ठरणार आहे. फक्त निराश असाल तर त्या अस्वस्थेतून बाहेर पडा यश आपल्या जवळ आहे. आपल्या मार्गातील अडचणी दूर होतील. आपल्या प्रयत्नांना विरोधकहि अडवू शकणार नाहीत. आपण निर्णय घेऊ शकाल त्या निर्णयाचे पडसाद सकारत्मक असतील. मन प्रसन्न करणाऱ्या घटना घडतील. महत्वाच्या नवीन वस्तूची खरेदी कराल. कामात थोडे कमी जास्त होऊ शकते त्यामुळे महेनतीला प्राधान्य ध्या. आपल्या श्रमाचे चीज होणार आहे. **महिलांना** : आपल्या संबधीतामध्ये लढाई, झगडा होऊ शकतो त्यामुळे आपला व्यवहार सरळसोट ठेबा. संसारिक आयुष्यात थोडा अशांतपणा जाणवला तरी नवीन सप्ताहात आपल्याला दिलासा मिळणार आहे. **शुभ दिनांक** :२५,२६.

### कामांचा ओघ वाढेल

**मीन :** हा साप्ताह मीनराशीसाठी कामाचा ओघ वाढवणारा आहे. घेतलेले कार्य पूर्ण करू शकाल. या कालावधीत आपले एखादे खास काम होणार आहे. आपल्या सुखसुविधानमध्ये वाढ होईल. मित्रामध्ये सोलोखा वाढेल. घरातील वातवरण आनंदी राहील. आपलेले अडकलेले पैसे मिळण्यासाठी या कलावधीत विशेष प्रयत्न करा यश मिळेल. कर्ज घेण्यापासून जामीन राहण्यापासून लांब राहा. विद्यार्थीवर्गाने जास्त मेहनत घेण्याची गरज आहे. मेहनतीमुळे आपल्यात ऊर्जा वाढणार आहे तिचा योग्य वापर करा. अविवाहितांसाठी एखादा चांगला प्रस्ताव येईल तो विचारपूर्वक स्वीकारण्यास हरकत नाही. तरूणांनी तब्बेतीची काळजी घ्यावी. चरबी वाढणारे पदार्थ घाऊ नये. नोकरीत आनंद मिळेल, प्रवासात काळजी घेण्याची गरज आहे. तसेच दुकानदारांनी साठेबाजीच्या भानगडीपासून लांब राहबे. **महिलांना** : लांबच्या प्रवासाचा बेत केला जाईल. त्या संदर्भात नियोजन केले जाईल. मुली, मुलांना चांगले स्थळ येणार आहे. महिलांनी आपले मन वाचनात रमवावे, सप्ताहाच्या शेवटी दिलासा देणाऱ्या घटना घडणार आहेत. **शुभ दिनांक** : २१,२६.

# टोरंटसाठी झाडांच्या मुळाशी घाव

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील पालीतर्फे कोतवाल खलाटी ग्रामस्थांचा विरोध असताना देखील पाली साई डोंगर येथे टोरंट कंपनीकडून येथील जमिनीवर अतिक्रमण कायम ठेवले आहे. वन विभागाने आपली जमीन धरणे बांधण्यास देण्याचा निर्णय घेतला असल्याने त्या जमिनी वर असलेली २०० वर्षे जुनी झाडे तोडण्यास सुरुवात झाली आहे. दरम्यान जंगलातील झाडे तोडण्यास स्थानिक पर्यावरणप्रेमींनी विरोध केला असून तेथील जंगलात लावलेल्या आगी बद्दल देखील संताप व्यक्त केला आहे.

## जाहीर नोटीस

दि.१९/०६/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक कृष्णा हरी तांडेल यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे आर) | आकार |
|---|---|---|---|
| कासु ता.पेण | १०/४ | ०-२४-८० पो.ख ०-००-२० एकूण क्षेत्र ०-२५-०० | ३.१९ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रतिभा राजेंद्र पुजारी २) रुपाली समीर सानप ३) सुजाता जयसिंगराव पाटील यांच्या कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | १८७५/२ | ०-२५-२० जिरायत ०-००-०० पो.ख. ०-२५-२० एकुण | ४.७२ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्मान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक : २०/०६/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सचिन दत्तात्रेय बोडस २) सुहास सुधाकर आंबेकर ३) पद्मनाम श्रीकृष्ण गोखले यांचे कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | १८७१ | ०-०८-३० जिरायत ०-००-८० पो.ख. ०-०९-१० एकुण | १.५६ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक : २०/०६/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा.क्र.९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४८/१ | एकूण क्षेत्र १-२४-०० हे.आर पैकी विक्री क्षेत्र ०.२४.०० हे.आर | ६.०० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-२१/०६/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री गणेश धोंडू भवारे, श्री. सुधाकर धोंडू भवारे, श्री. जगदिश धोंडू भवारे, श्री. चेतन धोंडू भवारे, सौ. रेश्मा रविंद्र पाटील रा. दहिवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे - मालेगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ५७ | १/ब | ०-५०-६० | ७-६२ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २१/०६/२०२६

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.
ब्राम्हण आळी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८५०८००८१३

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनची मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक शहजीदा रमेश कुंदनमल, यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत हि पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ४१७ | ०-४०-४० पोटखराबा ०-०२-३० एकूण ०-४२-७० | ०.८२ |

या मिळकतींपैकी ०-१५-०० हे. आर क्षेत्राची मिळकत

अलिबाग,
दि. १८/०६/२०२६

**ॲड.महेश सुहास म्हात्रे**
बी.ए.एलएल.बी.
कार्यालय : ऋतुराज प्लाझा, फ्लॅट क्र.१,
तळमजला, शिवाजी चौक, गावडे ऑप्टिक्सजवळ,
अलिबाग, रायगड ४०२ २०१.
संपर्क क्रमांक :०९८५००४२२३४/७७४१०३२२३४
E-mail ID: maheshmhatreoffice7@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत श्री.राजेश मारूती भोईर, रा.आस्था आलव्हिओ, फ्लॅट नं.१६०३, प्लॉट नं.२०, सेक्टर ३८, सी वुडस, नवी मुंबई ठाणे - ४००७०६ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरीवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ५५ | २७ | ०-३३-०० | ०=२० |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.२०/६/२०२६

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस,एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं.४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराडपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ६०, क्षेत्र ०-६९-७० हे. आर, पो. ख. ०-०५-३० हे. आर. एकूण क्षेत्र ०-७५-०० हे. आर., आकार १६.२० रू.पैसे पैकी क्षेत्र ०-४०-६० हे.आर. आकार ९.४४ रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नरेश जनार्दन करमेळे रा.मु.झिराडपाडा, पो. झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २०/०६/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

दिनांक : २१ जुन २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-नालधे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| चार्लस डेनिस फेररा उर्फ परेरा | ५ | १ | १-१६-० | ० | ४६ |
| | यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-४०-० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक:-२१/०६/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) पद्मनाम श्रीकृष्ण गोखले २) मंदार श्रीकांत हाळवे ३) सुहास सुधाकर आंबेकर यांच्याकडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | १८७४ | ०-२७-२० जिरायत ०-००-०० पो.ख. ०-२७-२० एकुण | ४.७६ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक : २०/०६/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक लिहून देणार गोविंद गजानन खाडे यांच्या हिश्याचे क्षेत्र मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :**
**मौने नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ६४ | ०-६८-०० पैकी लिहून देणार गोविंद गजानन खाडे यांच्या अविभाज्य हिश्याचे क्षेत्र | ०-१३ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून(८) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि.२१/०६/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय-कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल
अन्नपूर्णा जांभुळपाडा तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन-४१०२०५
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रतिभा राजेंद्र पुजारी २) रुपाली समीर सानप ३) सुजाता जयसिंगराव पाटील यांच्या कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | १८७६ | ०-३७-३० जिरायत ०-००-०० पो.ख. ०-३७-३० एकुण | ६.९४ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक : २०/०६/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा.क्र.९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बलिवरे ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३०/७ | एकूण क्षेत्र १-८७-०० हे.आर पैकी ऋषिकेश वसंत पाटील याचे खाते क्र.६०२ ज्याचे विक्री क्षेत्र ०.२०.०० हे आर | ०.२३ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :-२१/०६/२०२६

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटिस

सर्व जनतेस कळविण्यास येते की आमचे आशिलांनी मौजे मांडला, ता. मुरुड, येथील खालील वर्णनाची जमीन व घर मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक स्मिता सतिष कोरगावकर यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवून तसा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**जमीन व घर मिळकतीचे वर्णन**

**मौजे मांडला, ता. मुरुड, भूमापन क्रमांक व उपविभाग ३२, क्षेत्र जिरायत ०-२७-८०, वरकस ०-०१-८०, पो.ख.०-०३-४० एकूण क्षेत्र ०-३३-०० (हे.आर.), आकार रु.७.६६ तसेच सदर मिळकतीवर असलेले ग्रुप ग्रामपंचायत घर मिळकत क्र.७७१, क्षेत्र ४०० चौ. फुट हा या नोटिसचा विषय आहे.**

तरी वर वर्णन केलेली जमीन व घर मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची वहिवाटीची निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकत संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २१.०६.२०२६

**ॲड. मिलिंद चव्हाण**
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम. पुनम दामोदर नागोठकर, रा. फणसाड रोड, मारूती आळी, मांडला, ता.मुरूड, जि.रायगड यांसकडुन कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे आणि तसा दिनांक ०६/०९/२०२५ रोजी साठेकरार स्वाक्षरीत करण्यात आला आहे. असे असतांना सदर मिळकतीचा व्यवहार मिळकतीचे मालक आमचे अशिलांस अंधारात ठेवुन अन्य त्रयस्थ इसमांबरोबर करत असल्याची जाहीर नोटीस दिनांक १८/०६/२०२६ रोजी दैनिक कृषिवल मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सदर दिनांक १८/०६/२०२६ रोजीच्या जाहीर नोटीसला आमचे अशिलांमार्फत हरकत घेण्यात आली आहे. सदर मिळकतीचे खरेदी विक्रीचा साठेकरार विद्यमान मालकांनी आमचे अशिलांसोबत केला आहे व सदरचा साठेकरार अद्यापही रद्द झालेला नाही. त्यामुळे सदर मिळकतचा व्यवहार विद्यमान मालक करत असल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. याकरीता सदर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे.) | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| मांडला, ता.मुरूड | ८७ | ०-४५-०० पो.ख.०-०४-८० एकुण ०-४९-८० | ११.३१ | पुनम दामोदर नागोठकर |

वर नमुद मिळकती संदर्भात विद्यमान मालकांसोबत कोणताही व्यवहार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे व त्याबाबत आमचे अशिल योग्य तो दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक २०/०६/२०२६
मोबा. नं. ९८२२०१७१६१

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ४ व ५ ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर, ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय** आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२**
- **घरकामासाठी कायमस्वरूपी राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹ १५,०००/– राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फैमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555**
- **आर्किटेक्चर आणि इन्टेरियर डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क – 9762777975**
- **वाडगाव फाटा येथे कॉटेज सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क – 9822938444**
- **नामांकित कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजे, अनुभवी परवाना धारक मासिक वेतन अनुभवानुसार मो.९०११०२६२६३.**
- **अलिबाग–मुरूड रोडटच चौल–सागमळा (पिराचे देऊळ) येथे ८ गुंठा (१०.१०/७/१२) बागायत वाडी व उत्तम घर (क्लिअर टायटल) विकणे आहे. धंद्यासाठी सुद्धा उत्तम जागा आहे. संपर्क–घोसाळकर– ९८१९७७११११**
- **रखवालदार/सफाईकामगार पाहिजे संपर्क–८७८८०२१५१०**
- **ड्रायव्हर पाहिजे संपर्क – ९४२२६९४२०३**

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : खर्चाचे प्रसंग वाढणार आहेत. नव्या योजना तुर्तास नको. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी.
- **वृषभ** : अचानक धनलाभाचे योग आहेत. पत-प्रतिष्ठा वाढण्यास मदत होईल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : कौटुंबिक प्रश्नात तडजोड करावी. प्रवासाचे बेत लांबणीवर टाकावेत. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **कर्क** : महत्त्वाच्या भेटी होतील. बेरोजगारांना चांगल्या संधी लाभतील. प्रयत्नातील सातत्य कायम ठेवावं.
- **सिंह** : व्यवहाराबाबत चोख रहावं. गुंतवणूक विचारानं करावी. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या** : स्थावर प्रश्न आणखी बिकट होतील. विश्वासू व्यक्तिंचा सल्ला घ्यावा. प्रवासात नुकसान संभवतं.
- **तूळ** : कार्याचा उत्तम प्रभाव राहील. व्यवसायात नव्या संधींचा लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृश्चिक** : मनाजोग्या घटना घडतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. अनपेक्षित भेटीने समाधानी व्हाल.
- **धनु** : कार्यक्षेत्रात अनुकूलता राहील. नव्या योजना मार्गी लागतील. आर्थिक बाबतीत विचारानं रहावं.
- **मकर** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. अंगच्या गुणांचा विकास होईल. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : कामाचा ताण वाढेल. नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकाराव्या. वैवाहिक सौख्य वृध्दींगत होईल.
- **मीन** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. अडचणी दूर होतील.

हेल्थ टॉक

## असा कमी करा ताण

सततची धावपळ, दगदग यामुळे आपल्याला त्रास होत असतो. ज्यादा कामांचा खूप ताणही येतो. काही वेळा इतकं काम असतं की आपल्याला निवांत क्षणही मिळत नाहीत. अशा परिस्थितीत ताण आला की खूप अस्वस्थ वाटू लागतो. मात्र काही सोप्या उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो.

* ताण आल्यानंतर शरीरात कॉर्टिसोल हार्मोन्सची निर्मिती होते आणि हृदयाची धडधड वाढते. श्वासांचा वेगही वाढतो. या ताणाला प्रतिसाद म्हणून शरीर थरथरू लागतं. सततच्या ताणामुळे काही विकारही जडू शकतात.

* दीर्घ श्वसन हा ताण कमी करण्याचा रामबाण उपाय आहे. दीर्घ श्वसनाबद्दल नेहमीच बोललं जातं. योग्य पद्धतीने दीर्घ श्वसन केलं तर ताण झपाट्याने कमी होतो. श्वसनाच्या व्यायामामुळे तुम्हाला निवांत वाटतं. वर्तमानावर लक्ष केंद्रित करता येतं. **(क्रमश:)**

## २१ जून

दिन विशेष

१९८४ : प्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेते अरुण सरनाईक यांचं निधन.

१९९१ : भारताचे नववे पंतप्रधान म्हणून पी.व्ही.नरसिंह राव यांनी सूत्रे हाती घेतली.

२०१५ : क्रेडिट आणि डेबिट कार्डचा वापर करून व्यवहार करणाऱ्यांना कर सवलतीचा प्रस्ताव.

२०१७ : देश तसेच जगभर आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह.

स्मार्ट टॉक

## डाउनलोड करा लाईट व्हर्जन

* यू ट्यूबनेही लाईट व्हर्जन सादर केलं आहे. यू ट्यूब गो हे ॲप तुमच्या फोनमधली फक्त ७.५ एमबी जागा व्यापतं. त्यामुळे हे ॲप डाउनलोड करायला हरकत नाही.

* गुगल आपल्या फोनमध्ये असायलाच हवं. गुगलचं मूळ ॲप जवळपास ४४ एमबी जागा व्यापतं. त्यामुळे गुगल गो हे ॲप डाउनलोड करता येईल.

* ट्विटरचा वापर करत असाल तर त्याचंही लाईट व्हर्जन डाउनलोड करून घेता येईल. मूळ ट्विटर ॲप ३० ते ४० एमबीचं आहे तर ट्विटर लाईट ५ एमबीपेक्षाही कमी जागा व्यापतं.

### पंचांग

**रविवार, २१ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ शु. ७, चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : पू. फाल्गुनी, योग : सिद्धी, सूर्योदय ६.०४ सूर्यास्त ७.१७

### फॉरवर्ड्स

**तू अपना क़द भीं खों देगा सफ़ाई क़ी धूप में...**

**हर सायें क़ो ख़ुद पऱ मेहरबान मत क़िया क़र...!**

आरोग्यमंत्र

## समानता,मानसिक आरोग्य

आपल्याला समाजात कशी वागणूक मिळते याचा थेट संबंध मानसिक आरोग्याशी असतो. सर्व क्षमतांनी परिपूर्ण असल्या तरी महिलांना कायमच दुय्यम दर्जा मिळत आलेला आहे. समाजातील या विदारक सत्याबाबत संशोधन केलं असता लक्षात आलेली बाब म्हणजे वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत मुलं स्त्री-पुरुष भेदभावापासून दूर असतात; मात्र नंतर मुली स्वतःला मुलांपेक्षा दुबळं समजू लागतात. त्यांना आपली बुद्धिमत्ता



कमी आहे असं वाटू लागतं. मात्र या वयापासूनच मुलींवर सामाजिक दृष्टिकोनाचा परिणाम होऊ लागतो आणि हा न्यूनगंड निर्माण होतो. याचा परिणाम मोठेपणी अनेक आव्हानात्मक कामं टाळणं, नैराश्यग्रस्त बनणं आणि काही आजारांच्या आहारी जाणं यामध्ये होऊ शकतो. महिलांना सतत दुय्यम लेखण्याच्या वृत्तीमुळे आणि त्यांच्या बुद्धिमत्तेला कमी लेखण्यामुळे मोठी बुद्धिमत्ता वाया जात असून त्यामुळेच यशस्वी महिलांचं प्रमाण कमी असल्याचा निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे. मात्र केवळ महिलांच्या सामाजिक वावरावरच नाही; तर त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावरही हा परिणाम दिसून येतो. शिवाय त्यामुळे महिलांमध्ये आजार निर्माण होतात. जगभरातील सुमारे निम्म्या लोकसंख्येच्या आरोग्यावरचा खर्च केवळ सामाजिक भेदभावामुळे वाढत आहे. त्यामुळे पूर्वीचे गैरसमज दूर करून या संशोधनावरुन बोध घेत स्त्री-पुरुष समानता बाळगणं ही आता आरोग्य आणि आर्थिक क्षेत्राचीही गरज असल्याचं स्पष्ट झालं आहे.

### वेगळ्या वाटा

जगभरात भ्रमंती करण्यासोबतच विविध ठिकाणच्या संस्कृतींची ओळख करून घेणं मर्चंट नेव्हीतल्या करीअरमुळे शक्य होतं. मर्चंट नेव्ही हा करीअरचा धाडसी पर्याय आहे. यात तुम्हाला वर्षातले सहा महिने बोटीवर रहावं लागतं. म्हणजे एवढा काळ तुम्ही समुद्रात असता. म्हणूनच उत्तम आणि धाडसी करीअरच्या विचारात असाल तर मर्चंट नेव्हीचा मार्ग तुम्ही निवडू शकता.

मर्चंट नेव्हीमध्ये डेक कॅडेट किंवा नॅव्हिगेटिंग अधिकारी म्हणून तुम्ही काम करू शकता. हे अधिकारी बोट, इंधनाची टाकी, कार्गो यांच्या देखरेखीची जबाबदारी पार पाडतात. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## ...असे वापरा निवेदनकौशल्य

माणसाचा आवाज हा त्याच्या कमाईचं साधन होऊ शकतो. त्यामुळे तुम्हालाही आवाजाची दैवी देणगी मिळाली असेल तर या पर्यायाचा विचार करण्यास हरकत नाही. निवेदनासाठी असलेला



आवाज वेगळा असतो. गायकाप्रमाणेच निवेदकाचा आवाजसुद्धा कमावलेलाच असतो. त्याला श्वासावर नियंत्रण ठेवावं लागतं, उच्चार स्पष्ट करावे लागतात, आवाजात वैविध्य आणावं लागतं. या साऱ्या गोष्टी गायकांप्रमाणेच कराव्या लागतात. परंतु गायक आणि निवेदक यांच्यामध्ये एक फरक आहे. तो म्हणजे निवेदकाला सर्व क्षेत्रातील उत्तम ज्ञान असावं लागतं आणि तो हजरजबाबी असावा लागतो. निमशहरी अथवा ग्रामीण भागात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी निवेदकांची गरज भासत असते. त्या-त्या पातळीवर अतिशय रोचकपणे कार्यक्रमांचं निवेदन करून काही जण बऱ्यापैकी कमाई करतात. कार्यक्रमाचं स्वरूप व्यापक तेवढं निवेदकांचं मानधन अधिक असतं. अशा स्थितीत या निवेदकांच्या कामामध्ये अधिक नेमकेपणा आणता आला तर त्यातूनच रेडिओ जॉकी आणि छोट्या-मोठ्या कार्यक्रमात भाषणं करणारे वक्तेसुद्धा निर्माण होऊ शकतात. अर्थात, यासाठी भाषेचा चांगला अभ्यासही करावा लागतो.

खेचाखेची

### पैसा

माणसाच्या आयुष्यात पैसाच सर्व काही नाही.

.

.

.

.

विसा आणि मास्टर कार्ड आहेत ना!

### वेगळं काही

मध्य प्रदेशातल्या शहापूरमधल्या चुडियां गावात रहाणारे रामकिशन यादव आपल्या बागेतले आंबे विकत नाहीत तर सर्वसामान्यांना मोफत वाटतात. त्यांच्या बागेत आंबा पार्टीचं आयोजनही केलं जातं. आपल्या आजोबांना दिलेलं वचन पाळण्यासाठी रामकिशन लोकांना मोफत आंबे वाटतात. रामकिशन यांची तीन एकरची आंब्याची बाग आहे. या जागेत आंब्याची १५० झाडं आहेत. दशहरा, लंगडा, चौसा, केसर असे विविध प्रजातीच्या आंब्याची ही झाडं आहेत. कोणी आंबे मागायला आलं तर त्याला नकार देऊ नकोस, असं त्यांच्या आजोबांनी सांगितलं होतं. रामकिशन यांनीही त्यांना हे वचन दिलं होतं. त्यामुळे ते आंबे विकत नाहीत.

## पर्याय भजी, बटाटेवड्यांना...

रुचिरा

पाऊस सुरू झाला नसला तरी पावसाळी वातावरण अनुभवायला मिळत आहे. अशा कुंद वातावरणात गरमागरम भजी खावीशी वाटतात. पण नेहमी भज्यांचा तोच तोच प्रकार खाऊन कंटाळा आला असेल तर कॉर्न चीज बॉल्स ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य (सारणासाठी)** : एक वाटी मोजरेला चीज, पाव वाटी वाफवलेले



स्वीट कॉर्न, उकडून मॅश केलेले दोन बटाटे, एक चमचा आरारुट, अर्धा चमचा चाट मसाला, काळी मिरी पावडर, चवीपुरतं मीठ इत्यादी. (कोटिंगसाठी साहित्य): अर्धी वाटी आरारुट, तीन चमचे मैदापेस्ट, एक वाटी ब्रेडचा चुरा, तळण्यासाठी तेल इत्यादी.

**कृती-** सारणासाठी जमवलेलं साहित्य एकत्र करावं आणि एकजीव करुन गोळा तयार करुन घ्यावा. आता त्याचे छोटे छोटे गोळे करुन घ्यावेत. त्यानंतर एक एक गोळा आरारुटमध्ये घोळवून घ्यावा. हा गोळा आधी मैद्याच्या पेस्टमध्ये बुडवावा आणि ब्रेडच्या चुऱ्याने कोटिंग करावं. अशा प्रकारे सर्व गोळे बनवून अर्धा तास फ्रीजमध्ये ठेवावेत. कढईत तेल गरम करून घ्यावं. त्यात हे चीज बॉल्स मंद आचेवर तळून घ्यावे. सॉससोबत सर्व्ह करावेत.

## सुडोकू ११९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | | | | |
| | १ | २ | ९ | | ४ | | ३ | |
| | | ६ | १ | ३ | ७ | | ९ | |
| १ | | | ३ | | | ९ | | |
| | | | ५ | ७ | ८ | | | |
| | | ७ | | | ९ | | | ४ |
| | ३ | | ६ | ८ | ५ | ४ | | |
| | ७ | | ४ | | ३ | २ | १ | |
| | | | | | | | | ६ |


**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ८ | ६ | २ | ९ | १ | ७ | ३ | ४ |
| २ | १ | ७ | ८ | ४ | ३ | ९ | ५ | ६ |
| ३ | ४ | ९ | ७ | ५ | ६ | १ | ८ | २ |
| १ | ९ | ३ | ५ | ६ | ८ | ४ | २ | ७ |
| ४ | ७ | २ | ३ | १ | ९ | ५ | ६ | ८ |
| ६ | ५ | ८ | ४ | ७ | २ | ३ | ९ | १ |
| ९ | २ | ४ | १ | ८ | ५ | ६ | ७ | ३ |
| ८ | ६ | १ | ९ | ३ | ७ | २ | ४ | ५ |
| ७ | ३ | ५ | ६ | २ | ४ | ८ | १ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ११९



**आडवे शब्द :-**
१) चंद्रावर गेलेला पहिल्या अंतराळवीराचे नाव
५) पुष्कळ ८) खाजणारा
९) आकाशाला भेदणारे
१२) प्रत्येक दिवशी
१४) मान,सन्मान १७) सोंगटी
१८) चिखल
१९) उत्सव
२०) मडके
२२) अंकुर
२३) दुर्दशा
२५) दरिद्री,गरजू लोक
२७) चाटण्याचे औषध
२८) पाण्याचा बारीक प्रवाह,पात्याची तीक्ष्णता
२९) काढलेली सुट्टी
३०) गोमाता
३१) आभारदर्शक शब्द
३२) अहंकार
३३) डोंगराचा उभा भाग
३५) अपशकुन करणे
३७) सूर्याचे एक नाव
३८) सवयीचे होणे
४०) जिवाविषयी अती प्रीती असणे ४४) ढीग
४६) पत,ओंजळ,साक्ष
४७) मान्यतेचा शब्द
४८) एक पांढरा शुभ्र प्राणी
४९) आग्रा येथील संगमरवरी वास्तू
५१) आश्रय
५३) पर्ण
५४) नीटनेटके,ठाकठीक
५६) अंगातील ज्वर
५८) माफ
६०) चौकशी
६२) मालक
६३) वर्ष, साल
६४) प्रतिष्ठा
६५) एक तार वाद्य
६७) यश देणारे
७०) जाजम
७१) विश्व,दुनिया
७३) मऊ
७४) गणेशाचे एक नाव
७५) कपडे बदलणे
७७) अथवा,किंवा
७८) मातापिता

**उभे शब्द :-**
१) शनीचा खडा
२) संकट
३) भक्कम,मजबूत (इं.)
४) आकाश
५) खटला दाखल करणारा
६) नशा आणणारा,मदकारी
७) पंख
८) कंड
१०) खून करणे,जीवे मारणे (वा.प्र)
११) भित्रा
१३) रडणे,विलाप
१५) कामाची दाटी
१६) शेळी
१८) बोटांसह तळहात
१९) सती गेलेल्या स्त्रीच्या चितेभोवती पहारा करणे
२१) जाणे-येणे,वहिवाट
२३) अनुमती
२४) उर्ध्व दिशा
२६) दुर्लक्ष, क्षमा
२८) गहू,तांदूळ,डाळ इ प्रकार
३१) कथिंबीरीचे बी
३३) चंद्राकृती गोड पदार्थ
३४) केर
३६) सिंह
३७) विपत्तीची कहाणी
३९) अर्धी ओंजळ
४१) उसनवार
४२) तहानलेला ( हिं.)
४२) वाटेल तसे पसरलेले (सामान)
४५) समर्थन करण्याजोगे
४९) वडील
५०) वेल
५२) असुर,दानव
५५) स्थैर्य
५७) पळून जाणे ५९) मनुष्य ६१) प्राचीन
६४) देशाचा एक मोठा भाग
६५) कमळ ६६) चांदी
६८) द्वेष,मत्सर (फारसी)
६९) एक खाद्यतेल
७०) एक वाद्य
७२) नड,आवश्यकता
७६) फळांचा राजा

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कोकणच्या मातीतील एक अजरामर महागाथा

## ‘हळदणकर ते वाईरकर’ आणि जागृत श्रद्धेचे अधिष्ठान श्री शेंगाडा देव

कोकणच्या हिरव्यागार डोंगररांगा, अथांग निळाशार सागर, नारळी-पोफळीच्या बागा आणि पिढ्यान्‌पिढ्या जपलेल्या संस्कृतीच्या सावलीत अनेक इतिहास दडलेले आहेत. हे इतिहास केवळ तारखा आणि घटनांचे नसतात, तर ते असतात माणसांच्या संघर्षांचे, श्रद्धेचे, त्यागाचे आणि अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी दिलेल्या मूक लढ्याचे. मालवण तालुक्यातील कट्टा, वायरी, मसूरे आणि पेंडूर या परिसरात आजही अशाच एका अजरामर इतिहासाच्या पाऊलखुणा जिवंत आहेत. हा इतिहास आहे गोव्याच्या पावन भूमीतून उगम पावलेल्या आणि कोकणच्या कुशीत नवजीवन मिळवलेल्या हळदणकर आणि वाईरकर कुटुंबाचा; आणि या कुटुंबाच्या श्रद्धेचा शाश्वत केंद्रबिंदू असलेल्या श्री शेंगाडा देवाचा.

कट्टा बाजारपेठेतील समादेवी मंदिराजवळून पेंडूर-काळसे मार्गाने पुढे गेल्यावर, वाईरकरवाडीच्या वळणावर सुमारे एक किलोमीटर अंतरावर निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले श्री शेंगाडा देवस्थान भक्तांचे लक्ष वेधून घेते. हे केवळ एक मंदिर नाही; तर अनेक पिढ्यांच्या श्रद्धा, अनुभव, लोकविश्वास आणि कौटुंबिक ऐक्याचे जिवंत प्रतिक आहे. वाईरकरवाडीतील प्रत्येक घरासाठी, विशेषतः तरुणाईसाठी, शेंगाडा देव म्हणजे ‘‘जीव की प्राण’’ आहे. संकटसमयी धीर देणारा, कष्टाला यश देणारा आणि अडचणीच्या काळात मानसिक बळ देणारा हा देव त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.

गोव्याच्या इतिहासात पोर्तुगीज सत्तेच्या काळात धार्मिक आणि सांस्कृतिक छळाची अनेक पाने नोंदली गेली आहेत. आपल्या देवदेवतांचे रक्षण करण्यासाठी, आपली संस्कृती जपण्यासाठी आणि पूर्वजांच्या परंपरा वाचवण्यासाठी अनेक हिंदू कुटुंबांनी स्थलांतराचा मार्ग स्वीकारला. अशाच एका वेदनादायी पण अभिमानास्पद प्रवासाची सुरुवात झाली गोव्यातील हळदोणे या गावातून. आपल्या कुलदैवताची मूर्ती, संस्कारांची शिदोरी आणि भविष्यातील अनिश्चिततेची चिंता मनात घेऊन हे कुटुंब एका काळोख्या रात्री गोव्याच्या मातीतून बाहेर पडले. त्यांच्या पावलांना दिशा होती स्वत्व टिकवण्याची आणि श्रद्धा जपण्याची.




दीर्घ प्रवासानंतर हे कुटुंब मालवण परिसरातील वायरी या भागात स्थिरावले. सुरुवातीला त्यांना ‘‘हळदोणे गावचे हळदणकर’’ म्हणून ओळखले जाई. परंतु काळाच्या ओघात त्यांनी स्थानिक भूमीत कष्टाचे बी पेरले, नातेसंबंध जोपासले आणि समाजात मानाचे स्थान प्राप्त केले. कोकणातील परंपरेनुसार, गावाशी एकरूप झालेल्या कुटुंबांची ओळख त्या गावाच्या नावाने निर्माण होत असे. म्हणूनच वायरी गावाशी अतूट नाते जुळलेल्या या कुटुंबाला स्थानिक समाजाने ‘‘वायरीचे’’ किंवा ‘‘वाईरकर’’ म्हणून संबोधण्यास सुरुवात केली. हळूहळू हेच नाव व्यवहारात, सरकारी नोंदींमध्ये आणि पुढील पिढ्यांच्या ओळखीत कायमचे रुजले.

काळ पुढे सरकत गेला आणि कुटुंबाचा विस्तार झाला. काही शाखा मसूरे, कट्टा आणि पेंडूर येथे स्थायिक झाल्या. त्यातील काहींनी आपल्या मूळ उगमाची आठवण जपण्यासाठी हळदणकर हे आडनाव कायम ठेवले, तर काहींनी वाईरकर ही ओळख अभिमानाने स्वीकारली. आडनावे वेगळी झाली, वास्तव्य वेगळे झाले, परंतु रक्तातील नातेसंबंध, एकच गोत्र, एकच कुलदैवत आणि समान कुळाचार यांनी या दोन्ही कुटुंबांना आजही एका अदृश्य धाग्याने जोडून ठेवले आहे. त्यांच्या इतिहासात स्थलांतर आहे, पण विस्मरण नाही; बदल आहे, पण मुळांपासून तुटणे नाही.



या इतिहासाला जितकी सांस्कृतिक खोली आहे, तितकीच आध्यात्मिक उंची आहे ती श्री शेंगाडा देवाच्या लोकश्रद्धेत. कोकणातील अनेक जागृत देवस्थानांप्रमाणेच शेंगाडा देवाच्या उत्पत्तीची कोणतीही अधिकृत लिखित नोंद उपलब्ध नाही. परंतु लोकमानसाच्या स्मृतीत जपली गेलेली आख्यायिका आजही तेवढ्याच श्रद्धेने सांगितली जाते.

पूर्वी हा संपूर्ण परिसर घनदाट जंगलांनी व्यापलेला होता. वस्ती कमी, रस्ते निर्मनुष्य आणि निसर्गाचे साम्राज्य सर्वत्र पसरलेले होते. अशाच काळात वाईरकरवाडीतील एक साधा, निरागस गुराखी आपली गुरे चारण्यासाठी या रानात येत असे. एका दिवशी त्याला जंगलातील एका शांत स्थळी एक विलक्षण स्वयंभू पाषाण दिसला. त्या काळ्या धोंड्यात त्याला अनाकलनीय तेज जाणवले. त्या दिवसापासून तो रोज त्या ठिकाणी जाऊन मनोभावे प्रार्थना करू लागला. कोणत्याही विधी-विधानांशिवाय, केवळ श्रद्धेच्या बळावर तो आपल्या शिदोरीतील पाण्याचा घोट त्या पाषाणावर अर्पण करत असे.

देवाला भावाची भूक असते, असे म्हटले जाते. त्या निष्पाप भक्तीने प्रसन्न होऊन एका रात्री देवाने त्या गुराख्याला स्वप्नात दृष्टांत दिला. ‘‘मी या भूमीचे आणि येथील जनतेचे रक्षण करण्यासाठी येथे प्रकट झालो आहे,’’ असा संदेश त्याला मिळाला. दुसऱ्या दिवशी ही गोष्ट गावभर पसरली आणि ग्रामस्थांनी त्या जागेला पवित्र मानून देवासाठी एक साधे स्थान उभारले. कालांतराने त्याच ठिकाणी आजचे भव्य आणि श्रद्धेने नटलेले देवस्थान उभे राहिले.

**श्री. धनंजय शेटये**

‘‘शेंगाडा’’ या नावामागेही लोकपरंपरेत दोन सुंदर आख्यायिका सांगितल्या जातात. काहींच्या मते, देवाचे मूळ स्थान शिंगासारख्या वक्राकार नैसर्गिक रचनेत होते. कोकणी बोलीत अशा आकाराला ‘‘शेंगाड’’ म्हणत असत आणि त्यावरूनच देवाला ‘‘शेंगाडा देव’’ हे नाव प्राप्त झाले. दुसऱ्या आख्यायिकेनुसार, परिसरातील शेतकरी आपले पहिले पीक, विशेषतः भुईमुगाच्या शेंगा, देवाला अर्पण करीत असत. शेंगांच्या या भक्तिपूर्ण अर्पणामुळे देवाला प्रेमाने ‘‘शेंगाडोबा’’ म्हणण्याची प्रथा सुरू झाली.

वाईरकरवाडीतील ज्येष्ठ मंडळी आजही एक विलक्षण लोकविश्वास सांगतात. पूर्वी रात्रीच्या वेळी गावावर संकट आले, चोऱ्यांचा धोका निर्माण झाला किंवा हिंस्र पशूंची भीती निर्माण झाली की, अनेकांनी गावाच्या वेशीवरून फिरणारी एक शुभ्रवस्त्रधारी, उंच आणि तेजस्वी आकृती पाहिल्याचा दावा केला आहे. हातात काठी घेऊन ती आकृती संपूर्ण परिसरावर नजर ठेवत असे. ग्रामस्थांच्या श्रद्धेनुसार ती कोणतीही सामान्य व्यक्ती नव्हती, तर स्वतः शेंगाडा देव भक्तांच्या रक्षणासाठी पहारा देत असत.




एकेकाळी वाईरकर बंधूंच्या मालकीच्या जवळपास शहाण्णव एकर सुपीक शेतीचा विस्तार या परिसरात होता. पाण्याने समृद्ध, हिरवाईने नटलेला आणि श्रमाच्या सुवासाने भरलेला हा प्रदेश त्यांच्या कष्टाचे केंद्र होता. लोकमान्यतेनुसार या शेतीचे, पशुधनाचे आणि संपूर्ण वस्तीचे रक्षण करण्यासाठीच शेंगाडा देवाने येथे अधिष्ठान घेतले. म्हणूनच आजही या मार्गाने जाणारा प्रत्येक वाटसरू मनोमन देवाचे नाव घेतो आणि सुरक्षिततेची अनुभूती घेतो.

विशेष म्हणजे, शेंगाडा देवाच्या क्षेत्रात शांतता, स्वच्छता आणि परस्पर प्रेम यांना सर्वोच्च स्थान दिले जाते. वाईरकर बंधूंच्या घराघरांत देवाबद्दल अपार श्रद्धा असून, आपापसातील ऐक्य, स्नेहभाव आणि सामंजस्य टिकवून ठेवण्याची प्रेरणा त्यांना या देवस्थानातून मिळते. शेंगाडा देव हा केवळ श्रद्धेचा विषय नाही, तर तो आत्मविश्वास, बंधुभाव, निर्भयता आणि सामाजिक ऐक्याचा सजीव संदेश आहे.

आज आधुनिकतेच्या युगात काळ बदलला आहे. रात्रीच्या अंधारात ती दैवी आकृती प्रत्यक्ष दिसत नसली, तरी श्रद्धेचा दिवा तितक्याच तेजाने प्रज्वलित आहे. संकटाच्या वेळी देवाचा कौल घेतला जातो, सण-उत्सवात देवाचे स्मरण केले जाते आणि नव्या पिढीला या देवस्थानाच्या कथा अभिमानाने सांगितल्या जातात. कारण हा केवळ एका कुटुंबाचा इतिहास नाही, ही केवळ एका देवस्थानाची कथा नाहीहा कोकणच्या संस्कृतीचा श्वास आहे, पूर्वजांच्या संघर्षाचा गौरव आहे आणि श्रद्धेच्या अखंड परंपरेचे जिवंत स्मारक आहे.

हळदणकर ते वाईरकर हा प्रवास म्हणजे माती बदलली तरी संस्कार बदलत नाहीत याचा पुरावा; आणि श्री शेंगाडा देव म्हणजे श्रद्धा, संरक्षण आणि ऐक्य यांचे कोकणच्या भूमीत सदैव तेजाने प्रज्वलित राहिलेले दैवत!

**

---

# देवभूमी देवालय

**सफर**
**वर्षा कुवळेकर**
८७६६५६९१३६

चंदिगढच्या रणरणत्या उन्हातून कधी एकदा बाहेर पडू असे झाले होते. यंदा उन्हाळा कोकण काय आणि पंजाब काय सगळीकडेच दाहक झालाय. आपण हिमाचल मध्ये निघालोय म्हणजे निदान हे आठ-नऊ दिवस तरी थंड हवेत आनंदात घालवू हा ही एक महत्त्वाचा मुद्दा होताच.

सौरभ म्हणाला, ‘‘जरा धीर धरा. हिमाचल मध्ये शिरलो की हवा पूर्ण बदलेल, खूष व्हाल.’’ खरंच दोनतीन तासांच्या प्रवासानंतर गाडी हिमाचल मध्ये शिरली आणि उन्हाची काहिली निमाली. सगळे वातावरणच बदलू लागले. पर्वतराजी दिसू लागली. वृक्ष बदलले. सुरूची घनदाट जंगलं बघण्याची गंमत कळू लागली. तिर्थन नदीचे पात्र आणि त्यातील खळाळता प्रवाह सतत आमच्या बरोबर असू लागला. आधी शिवालिक पर्वतरांगांमधून प्रवास चालला होता. मोठमोठे पर्वत, त्यातून काढलेले अरुंद रस्ते. पर्वतांचे मोठाले कडे पाहूनच धडकी भरावी. दुसऱ्या बाजूला खोल खोल, थांग न लागणारी दरी. शिवालिक पर्वतराजी संपून हिमालयीन पर्वत रांगा कधी सुरू होतात कळतंच नाही.

प्रवासाचे रूपच पालटले. पर्वत खोदून काढलेले रस्ते, ओबडधोबड अरुंद. एव्हढी खोल दरी बाजूला तरी कठडे अजिबातच नाहीत. कातळांचे पर्वत आहेत हे. यात रस्ता करणं हे महाकठीण काम असेल. काही ठिकाणी तर कातळ इतका भक्कम आणि अवाढव्य की नैसर्गिक बोगदा असावा तसा पूर्ण रस्त्याच्या माथ्यावर कातळ पसरलेला आहे. मधून वाहतूक सुरू. काय भव्य, देखणे दृश्य आहे ते. अशा एका ठिकाणी गाड्या थांबून प्रवासी चालत चालत याचा अनुभव घेतात. आम्हीही घेतलाच.

या रस्त्यांवर टेम्पो ट्रॅव्हलर भरपूर. प्रवासी भरलेले हे एकमेकांसमोर सारखे येतात. वाट काढायची असते. इथल्या ड्रायव्हर लोकांना साष्टांग नमस्कार. इतक्या प्रवासात दोन ड्रायवर एकमेकांना शिव्या देत आहेत अथवा अडून बसलेत असे कधीच पाहिले नाही. त्या त्या वळणावर कोणाला मागे जायला जागा आहे ते बघून सहज रिव्हर्स घ्यायचे. एकमेकांना सांभाळून घेण्याचे धोरण प्रकर्षाने जाणवले. नाहीतर अशक्यच आहे तिथे ड्रायव्हिंग. बरं रिव्हर्स तरी सोपा असतो? आता पडू की काय दरीत अशी प्रचंड भीती वाटते. खरंतर मला प्रवासात पुढे बसायला खूप आवडतं. ड्रायव्हर शेजारी बसून मी प्रवासाचा आनंद घेते. यावेळी मात्र मी ठरवूनही बसूच शकले नाही. एकदाच तो प्रयत्न केला. पण प्रत्येक वळणावर पोटात खोल खड्डा पडायला लागला. मग उठले तिथून आणि सरळ मागे बसले. मीच ओरडून त्या ड्रायव्हरला दचकवेन ही भीती वाटली. त्यापेक्षा दृष्टीआड सृष्टी. नदीच्या साथीने अखंड प्रवास. मध्ये मध्ये या प्रदेशाचा आनंद घेण्यासाठी थांबत आम्ही रात्री शानगड येथे पोहोचलो. वाटेत लाकडी घरांवर सुंदर कलाकुसर केलेली. आमचा होम स्टे सुद्धा असाच सुंदर. अशा थोड्या घरांचा पुंजका जणू. माझ्या पुतण्याला मी फोटो पाठवले आणि म्हटलं इथे राहिलो आहोत आम्ही. तर म्हणाला, ‘‘अग राजवाडाच वाटतोय काकू.’’ आजुबाजूला प्रसन्न गुलाब.



एकूणच सगळ्या ट्रिपमधील सारखे वेडावून टाकणाऱ्या गुलाबांबद्दल लिहायलाच हवं. हिमाचल मध्ये आठवडाभर प्रवास करताना गाव आले की दारात आणि गावात कुठेही या अमाप फुललेल्या गुलाबांच्या वेली. या इतक्या पसरलेल्या असतात की बास. घरांची, हॉटेलची प्रवेशद्वारे या गुलाबांच्या महिरपीने मढलेली. एका हातात एकच मावेल इतके मोठे फुल. अशा फुलांचे लगडलेले गुच्छ. आणि रंग... अहाहा. गुलाबी रंगाच्या अनेक शेडस. त्याशिवाय लाल, हलका केशरी, पांढरे, बदामी ..... वर्णन करायला शब्द अपुरे. एक माणूस नाही आजूबाजूला सौंदर्य पहायला आणि निसर्ग दोन्ही हातांनी भरभरून उधळतो आहे. आम्ही सगळ्या आपापल्या खिडकीतून पाहताना नुसत्या वेड्या होत होतो. ‘‘ए, लवकर बघा, काय रंग आहे ग, आई ग, गाडी थांबवा न, घेऊया का आपण हे गुलाब?’’

असे चित्कार गाडीतून किती वेळा आले त्याला सुमार नाही. हिमाचल हा गुलाबाच्छादित प्रदेश आहे हे निर्विवाद.

गुलाब सोडून जांभळी, पिवळी अशी रंगीबेरंगी फुलांची वृक्षराजी आम्हाला या प्रवासात अखंड पहायला मिळाली. आम्ही वृक्षवेड्या. चालत्या गाडीतून फोटो काही मनासारखे जमत नव्हते. मग काय सौरभला आम्हाला अशा जागा हेरून थांबायला द्यावेच लागे. असे थांबलो असताना सुलभाने बऱ्याच बिया मोठ्या प्रयासाने मिळवल्या. काही रोपटी सांभाळून आणली आहेत. सुलभा जिवापाड जपून ती वाढवेल हे नक्की. खरेखुरे निसर्गदत्त सौंदर्य म्हणजे हेच. हिमाचलच्या सगळ्या प्रवासात या निसर्गाने खूप आनंद दिला. ‘‘निसर्ग अनुभवायला जाऊ या’’, सौरभच्या वाक्याची परिपूर्णता मी अनुभवली.

तर........ शानगड. त्यारात्री या गावात मुक्काम केला. दमलो होतो, आदल्या रात्रीचे संपूर्ण जागरण असूनही पहाटे ताजातवान्या उठलो. हिमालयात दिवस खूप लवकर उगवतो. मला वाटतं चार वाजल्यापासून उजाडलेले असते. आपापल्या खोलीच्या बाल्कनीतून आजुबाजूला निरखताना एक थोडासा गवताळ भाग आणि त्यावर स्वप्नाळू वाटावी अशी पाऊलवाट दिसली. तेवढ्यात सौरभ आमच्या खोलीत नाश्ता तयार आहे सांगायला आला. मी त्याला ते दृश्य दाखवून म्हटले, ‘‘सौरभ इथे जाऊया का रे?’’

सौरभने तत्काळ होकार देत म्हटले, ‘‘म्हणून तर.... लवकर आटपा, आपण इथून निघुच लवकर. तिथे खूप वेळ देणार आहे मी.’’

नाश्त्याला खाली आलो आणि रात्री आल्यामुळे न दिसलेले, मला मनापासून पाहण्याची इच्छा असलेले सफरचंदाचे झाड सामोरे आले. पिटुकली सफरचंदे असलेले ते अनोळखी झाड. हे कोणते फळ असेल बरं... या चौकशीत असताना एकदम दीपा म्हणाली, ‘‘हे सफरचंदाचे झाड असावे.’’ खात्री नव्हती. तेवढ्यात तिथला मदतनीस दिसला. त्याने ते सफरचंदाचे झाड असल्याचे कन्फर्म केल्यावर काय आनंद झाला. त्या बागेत फक्त गुलाब आणि सफरचंदाची झाडे होती. मधेमधे साधी लाकडाची टेबल्स आणि बाकडी. माझा पायच तिथून निघेना. नाश्त्यासाठी आत डायनिंग रूममध्ये बोलावले होते. मी विनंती केली, ‘‘मी मागच्या बाकड्यावर बसून खाल्ले तर चालेल का?’’

‘‘चालेल की, उन्ह आहे , तेव्हढे बघा.’’

मी सावलीचा कोपरा पकडून चहा, आलू पराठा त्या बागेत बसून खाल्ला. अनेक, अनेक वर्षांची उरात साठवलेली इच्छा पूर्ण केली. तिथून सौरभ आम्हाला त्या गवताळ भागाकडे घेऊन गेला. वळणावळणाचा रस्ता, एक वळण चुकले, परत मागे घेऊन खोल उतारावरून गाडी नेमकी तिथे पोहोचे पर्यंत आपण काय पाहणार आहोत याची सुतराम कल्पना आली नाही. शेवटचे वळण घेऊन गाडी थांबली, उतरलो आणि समोरचे दृश्य पाहून एकदम अत्यानंदाने अंगावर काटा यावा ना तसे काहीसे झाले.

‘‘खजियार’’

डलहौसी नजिकचे हे ठिकाण ज्याला भारतातील स्वित्झर्लंड म्हटले जाते तेच किंवा त्याहीपेक्षा सुंदर रूपात सामोरे आले. ज्या डलहौसीला मुक्काम करायची मनस्वी इच्छा अपुरी होती ते मला भेटत होते की काय!

विस्तीर्ण, नजर पोहोचेल तिथवर पसरलेले हिरवेगार कुरण! उंच सखल , ज्यावर पळावे, लोळावे, चालतच रहावे. मध्यभागी एक लाकडी विशिष्ट बांधणीचे शिव मंदिर. ‘‘शांगचूल महादेव मंदिर’’. पुरातन काळातील हे देऊळ. हे अतिसुंदर मेडो महादेवाने स्वतः साठी निर्माण केले अशी याची आख्यायिका आहे. नुसती आख्यायिका नाही तर या सर्व जागेचा सातबारा सरकार दरबारी प्रत्यक्ष महादेवाच्या नावानेच आहे असे म्हणतात. हिवाळ्यात हे सारे शुभ्र बर्फाच्छादित असते. त्यावेळचे रूप काय असेल? कल्पनाही थिटी पडते अशावेळी. आम्ही आमचे वय विसरून त्या गवतावर चाल चाल चाललो, पाय पसरून बसलो, फोटो काढत सुटलो. या गवताळ कुरणावर एकही खडा सुद्धा नाही. अनवाणी कितीही चाला, मऊसूत गवताचा अनुभव. ती स्वप्नातली असावी वाटणारी पायवाट मुद्दाम अलीकडे निर्माण केली आहे. तिच्यावर मुद्दाम फिरलो. खूपच सुंदर अनुभव. त्यानंतर सौरभ म्हणाला आता थोडे मंदिरात बसूया. गाभारा बंद होता. परंतु समोर दगडी बांधलेले छोटे अंगण, सभोवताली तीनही बाजूंनी दगडी चौथरे. त्यावर बसलो, बांधकाम निरखले. शांत झालो आणि सौरभ म्हणाला, ‘‘एक भजन म्हणू का?’’

नेकी और पुछपुछ ?

लगेचच पहाडी भागातील असावे असे कधीही न ऐकलेले एक छानसे भोलेनाथाचे भजन तो गाऊ लागला. आजूबाजूची अमर्याद हिरवाई, मधोमध ते शिव मंदिर. ती सगळीच शिवाची स्वतः ची निर्मिती. त्याचे , त्या शंकराचे, तिथे असणेच आम्हाला जाणवले जणू. मन अंतर्मुख झाले. फार कमी क्षण असे वाट्याला येतात आयुष्यात. निखळ समाधान साठवून तिथून निघालो.

दुपारी या लोकांचा एक आवडता पदार्थ खाण्यासाठी खास आम्हाला सौरभने नेले. म्हटले तर अगदी टपरी. तिथेच त्या गावात राहणारी तरुण स्त्री ते चालवत होती. तुम्ही कुठे राहता विचारल्यावर तिने आणि बहुधा तिचा नवरा असावा त्यांनी इशाऱ्याने दूरवर असलेले त्यांचे घर दाखवले. ‘‘हमारी तो यही जन्मभूमी, यहीं पले बढे हम.’’ या मंडळींचा एक विशिष्ट पोशाख असतो. स्त्रिया पंजाबी ड्रेस.. जरा वेगळ्या धाटणीचा, त्यावर थंडीसाठी स्वेटर अथवा जाकीट आणि डोक्याला स्कार्फ घालून असतात. पुरुष पतलून, सदरा, जाकीट आणि डोक्यावर ती खास टोपी घालून असतात. त्या टोपीला किती किती प्रकारे सजवतात. गोंडे काय आणि फुले काय... मज्जाच. हसतात, फोटो घेऊ का विचारले की लाजून हो म्हणतात, लगेच पोझ ही देतात. प्रेमाने बोलतात. पहाटे लवकर यांचा दिवस सुरू होतो. अगदी ७ वाजता पाठीवर भलीमोठी टोपली बांधून मळ्यात कामाला आलेल्या बायका आम्हाला दिसल्या. त्यांचे गरम कपडे, शाली, मफलर , भरतकाम केलेली जॅकेट विकणाऱ्या हसतमुख बायका खूप असतात. बिझनेस कसा करावा तेही बघून शिकतोच आपण बरं का! गावाकडची म्हणून अडाणी नाहीत मंडळी. काम करतात तिथेही विणकाम चालूच असते . ज्यांची लोकर काढली जाते ती वेगवेगळ्या विशिष्ट जातीच्या मेंढ्यांचे कळप सुद्धा पाहिले. रस्ता आधीच धन्य, त्यात यांचा कळप घुसला की कापरे भरते.

तर असे ते दांपत्य खूप बोलत होते. आम्ही स्वेटर्स घालून होतो थंडी वाजते म्हणून आणि हा आपला सांगत होता, ‘‘ये पंधरा बीस दिन गरमी रहती है. बादमे तो ठंड ही ठंड.’’ ती ठंड असते तरी कशी ते खरंच अनुभवायचे आहे मला. एकदा तरी बर्फ दाखवायला आम्हाला आण रे. अशी सौरभला विनंती करून ठेवलीच आहे. असो.

तर त्या मुलीने आम्हाला सिद्दू नावाचा पारंपरिक पदार्थ खिलवला. तांदूळ आणि सोयाबीनचे पीठ भिजवून त्यात अक्रोड आणि शेंगदाण्याचे पुरण भरून वाफवलेला हा पदार्थ. ठीक लागला. यात डाळीचे सारण भरूनही करतात असे कळले, पण चव घेऊ शकलो नाही.

इथली एक गंमत तर विसरताच येत नाही. पर्वतावरून ठिकठिकाणी पाण्याच्या धारा येत असतात. सूर्योदयानंतर वितळलेला बर्फ वाहून येतो. बऱ्याच ठिकाणी ते मुद्दाम वळवून पाईप टाकून घेतले आहे. या टपरीसमोरच्या अशा ठिकाणी तिथले लोक पाणी भरत होते. खात्री करून आम्ही ते पिऊन पाहिले. थंडगार पाणी, मस्त चव. आमच्या अलकाने गाडीतील होत्या तेवढ्या सगळ्या बाटल्या स्वतः बसून भरून घेतल्या. पोटभर ते पाणी पिऊन निघालो.

त्याच दिवसापासून गाडीतील सर्वांच्या पाण्याची जबाबदारी अलकाने स्वतःच्या अंगावर घेतली आणि संपूर्ण ट्रिप भर निभावली.

आमचा कारवा पुढील प्रवासाला निघाला. तीर्थन खोऱ्यात आम्ही रात्री मुक्कामी पोहोचलो.

●क्रमशः

---

# विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास : सद्सद्विवेकबुद्धीची खरी गरज



**सुनील गवळी**

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा विचार करताना आपण अनेकदा गुण, करिअर आणि कौशल्ये यांवर भर देतो; परंतु यापेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता आणि सद्सद्विवेकबुद्धी. कारण माहिती मिळवणे आज सहज झाले असले, तरी योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे आणि परिस्थितीनुसार योग्य निर्णय घेणे हेच खरे शिक्षण आहे.

मानवाला नेहमीच सोपी आणि तयार उत्तरे आकर्षित करत आलेली आहेत. आजचा विद्यार्थीही त्याला अपवाद नाही. अभ्यास, प्रकल्प किंवा कोणतेही काम करताना अनेकदा तो तयार माहितीवर अवलंबून राहतो. उदाहरणार्थ, एखादा प्रकल्प दिला असता विद्यार्थी इंटरनेटवरून थेट माहिती कॉपी करतो, पण त्या विषयामागील अर्थ, संदर्भ किंवा उपयोग समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही. यामुळे त्याची माहिती वाढते, पण समज आणि विचारशक्ती विकसित होत नाही.

याचाच परिणाम पुढे जीवनात दिसून येतो. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना काही विद्यार्थी शॉर्टकट नोट्स, तयार प्रश्नोत्तरे यांवर अवलंबून राहतात. ते पाठांतर करतात, पण संकल्पना समजून घेत नाहीत. परिणामी प्रश्न थोडा बदलला, तर ते गोंधळतात. याउलट जे विद्यार्थी मूळ संकल्पना समजून घेतात, ते कोणत्याही परिस्थितीत योग्य मार्ग शोधू शकतात. यावरून स्पष्ट होते की, ज्ञानापेक्षा विचार करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची आहे.आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा प्रभाव विद्यार्थ्यांवर मोठ्या प्रमाणावर पडत आहे. एखादी माहिती, व्हिडिओ किंवा संदेश पाहून अनेक विद्यार्थी त्यावर विचार न करता लगेच विश्वास ठेवतात. उदाहरणार्थ, एखादी अफवा किंवा चुकीची माहिती व्हायरल झाली, तर ती सत्य मानून पुढे पाठवली जाते. ही सवय केवळ चुकीची माहिती पसरवत नाही, तर विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेलाही बाधा आणते. माहिती मिळवणे सोपे झाले आहे, पण तिची सत्यता तपासण्याची सवय मात्र कमी होत चालली आहे.

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक आळस निर्माण होतो आणि हाच आळस पुढे मानसिक गुलामगिरीचे रूप घेतो. जेव्हा विद्यार्थी स्वतः विचार करणे सोडून इतरांच्या मतांवर अवलंबून राहतो, तेव्हा तो हळूहळू स्वतःची स्वतंत्र ओळख गमावतो. एखादा प्रभावी वक्ता, मित्र किंवा सोशल मीडियावरील व्यक्ती काही सांगते, आणि विद्यार्थी ते प्रश्न न विचारता स्वीकारतो. हीच मानसिक गुलामगिरीची सुरुवात असते, जिथे व्यक्तीला स्वतःच्या विचारांची जाणीव राहत नाही.आपली पारंपरिक शिक्षण पद्धतीही या समस्येस काही प्रमाणात कारणीभूत आहे. कारण ती बहुतेक वेळा माहिती देण्यावर भर देते, पण विचार करण्याची सवय लावण्यावर कमी लक्ष देते. विद्यार्थ्यांना ‘‘का?’’ आणि ‘‘कसे?’’ असे प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन दिले जात नाही. त्यामुळे ते फक्त परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शिकतात, जीवन समजून घेण्यासाठी नाही.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी काही मूलभूत सवयी अत्यंत आवश्यक आहेत. प्रत्येक गोष्टीवर प्रश्न विचारण्याची सवय, स्वतःचे मत तयार करण्याची क्षमता, विविध विषयांचे वाचन आणि त्यावर चिंतन, तसेच मिळालेल्या माहितीची सत्यता तपासण्याची वृत्ती या गोष्टी विद्यार्थ्यांना बौद्धिकदृष्ट्या सक्षम बनवतात. मित्र, शिक्षक आणि पालकांशी चर्चा केल्याने विचार अधिक स्पष्ट होतात आणि समज अधिक व्यापक बनते.

जसे शरीर निरोगी ठेवण्यासाठी प्रतिकारशक्ती आवश्यक असते, तसेच मन निरोगी आणि स्वतंत्र ठेवण्यासाठी सद्सद्विवेकबुद्धीची प्रतिकारशक्ती आवश्यक आहे. आजच्या माहितीच्या महापुरात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ माहिती गोळा करणारे न राहता, विचार करणारे, प्रश्न विचारणारे आणि सत्य शोधणारे बनणे आवश्यक आहे.शेवटी, खरे यश केवळ गुणांमध्ये नसते, तर योग्य विचार करण्याच्या आणि योग्य निर्णय घेण्याच्या क्षमतेत असते. आणि ज्या विद्यार्थ्याने ही क्षमता विकसित केली, तोच खऱ्या अर्थाने यशस्वी आणि स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा धनी ठरतो. **

# सत्ताखेळासाठी गद्दारी नको



**समाजकारण / राजकारण**



डॉ.विलास ज. पवार

महाराष्ट्र देशातले नावाजलेले राज्य! भक्ती, शक्ती, साहस यासाठी आदर्शवत असामान्य कर्तृत्वाचे दिलदार व्यक्तिमत्त्व जन्माला येणारी व्यक्तिमत्त्व या राज्यात जन्माला येत होती. आता येत नाहीत असं अगदीच म्हणता येणार नाही. पण राज्यातले राजकारण आणि राजकीय व्यक्तिमत्त्वांचे इतके अधः पतन चालू आहे की सामान्यांना सुद्धा त्यांच्या अतिसामान्यांची कीव यायला लागली आहे.

लोकांनी लोकांसाठी चालवलेली लोकशाही धापा टाकताना दिसत आहे. लोकशाहीचा उत्सव म्हणजे निवडणुका! या निवडणुकीत विविध पक्षांच्या उमेदवारांची राजकीय अस्मिता मांडली जाते. उमेदवारांची भूमिका त्यांच्या पक्षांची भूमिका आणि न चुकलेले अर्थकारण इत्यादींची रेलचेल असते. उमेदवारांच्या भूमिकेसाठी पक्षाच्या भूमिकेसाठी लाठ्या काठ्या चालविणारी आणि खाणारी सुद्धा कार्यकर्त्यांची फळी असते. दोन जीवलग मित्र सुद्धा पक्षांच्या भूमिकेसाठी विरूद्ध भांडतात. हमरीतुमरीवर येतात. या निवडणुकीत मग एखादा जिंकतो व बाकी हरतात. सच्चा उमेदवार निवडून आला, आणला याचा जल्लोष होतो. त्यात हा उमेदवार सत्तास्थापनेसाठी आहे की नाही विरोधात यावरून त्याचे मूल्यमापन केले जाते. सत्ता स्थापनेसाठी किंवा सत्तेचा उत्कर्ष करण्यासाठी जर असे उमेदवार असतील तर मग मात्र मूल्यमापन चढ्या भावात होते. नैतिकता, मूल्ये वगैरे वगैरेचे अवमूल्यन यांचा अजिबात विषय निघत नाही. त्यांचा विचार सुद्धा केला जात नाही. लोकशाहीची अवकळा येथूनच सुरूवात होते. ज्या मतदारांनी, ज्या कार्यकर्त्यांनी हमरीतुमरीवर स्वतःची डोकी गरम करून प्रसंगी दुसऱ्याची फोडून, आपली आपटून घेतली असतात. त्यांना तोंडावर आपटून लोकप्रतिनिधी दुसऱ्या पक्षात सामील होतात. नाहीतर पुरस्कृत दुसरा नवा गट काढतात. स्वतःच्या उत्कर्षासाठी, आर्थिक लाभासाठी व्यावसायिक उलाढाली करायला काहीच हरकत नाही पण राजकारणाला व्यवसाय समजून त्यांचा कोणी बाजार मांडून बाजारभाव स्पष्ट करत असेल तर तो मतदारांशी स्वपक्षाशी द्रोह आहे अगदीच म्हणायचे तर निव्वळ गद्दारी आहे.

वैचारिक संकल्पनेचे अधःपतन नेमके कोणाचे म्हणायचे याचा सुद्धा विचार पडतोच. एखादा पक्ष बहुसंख्येने निवडून येतो. बहूसंख्य असताना सुद्धा स्थिर सरकार यावे म्हणून एखादा पक्ष फोडतो, दुसरा सुद्धा फोडतो. या फोडाफोडीत घसरलेले, लटकलेले, चिकटलेले जे कोणी गट आहेत, पक्ष आहेत त्यांच्या उमेदवारांना चाड असायला हवी. ज्या मतदारांच्या पुढ्यात मला निवडून द्या, असे सांगत समोरच्या पक्षाची भलामण करणाऱ्या उमेदवारांनी निवडून आल्यावर ज्या पक्षातून निवडून आलो आहे त्या पक्षाला पर्यायाने त्यांच्या मतदारांना सत्ताप्रहार करणे एका प्रकारची विकृतीजन्य अधः पतन म्हणायला हवे.

पक्ष सोडून जाणारे नानाविविध कारणे देतात. आमची चौकशी होते, इडीच्या घोटाळ्यात अडकणार, मतदारसंघात काम करण्यास अडचणी येतात वगैरे वगैरे. यात जर घोटाळे केले असतील तर इडी उघडे करेल नसतील तर त्यात अडकण्याचे कारण लाभार्थी असल्याशिवाय संक्रमणाची तयारी कोणीही करत नाही हे सत्य सामान्य जनता सुद्धा सहजपणे समजू शकलेली आहे.

सत्ताकारणाचा बिंदू संख्याबळावर येऊन जेव्हा थांबतो तेव्हा येनकेन प्रकारे संख्या गाठणे महत्वाचे होऊन जाते. या संख्याबळाचे राजकारण राज्याच्या विधानसभेत तरंगले. आता देशाच्या सत्ताकारणात या संख्याबळाचे राजकारण सुरू झाले आहे. प्रत्यक्षात यामुळे राज्याच्या समाजकारणात किती फरक पडतो आहे. मतदारांच्या संवेदना, सर्वसामान्यांच्या भावना फुटून बाहेर पडणाऱ्यांना कुटून कुटून पोहचवल्या पाहिजेत. या संख्याबळाचे सूत्र लक्षात घेतले तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला २४० खासदार निवडून आणता आले. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सहकारी आणि तेलगू देशात, जनता दल यांनी ५१ जागांचा आधार भाजपाला सत्तेत येण्यासाठी दिला. भाजपा तेलगू देसम आणि जनता दल यांच्यावर पूर्ण विसंबून नाही.थोडक्यात त्यांच्या आधाराबाबत शंका आहे. कदाचित त्यांच्या वाढत असलेल्या मागण्या भाजपाला पुरवता येत नसतील आणि मग कधीतरी सत्ता चालवण्यास अडचण येऊ शकते. हे जाणून उमजून भाजपाने आपल्या समर्थनासाठी खासदार संख्या वाढवण्यास घेतली आहे. याचे कारण सुद्धा प्रत्यक्षात घडले आहे. भाजपाने गाजावाजा केलेल्या महिला आरक्षण विधेयकात ३५२ मतांची आवश्यकता असताना, राजकीय लोकशाही आघाडी आणि भाजपाकडे फक्त २९८ मते होती. पण त्याचबरोबर इंडिया आघाडीने २३० मते नोंदवली आणि यामुळे भाजपाच्या या महत्व दिलेल्या विधेयकाला लोकसभेत मंजूर करता आले नाही. त्यानंतर मात्र भाजपाने आपल्याकडे विरोधातले खासदार होण्याचा सपाटा लावला आहे. तृणमूलचे २० खासदार, रालोआमध्ये आले तर ताकदवान भाजपा स्वतःची मनमानी करू शकेल त्यात महाराष्ट्रातील शरद पवार यांचे ८ खासदार आणि उद्धव ठाकरे यांचे ९ खासदार घेतले तर भाजपाची मतांची पोतडी पुरेपूर भरली जाईल आणि येत्या अधिवेशनात जे जे इच्छिले आहे ते ते विधेयक भाजपा लोकसभेत मंजूर करू शकेल. भाजपाच्या राजकारणाचा सत्ताखेळ किती बरोबर की चूक याबाबत जनतेची मतमतांतरे असतील पण आपण निवडून दिलेल्या आमदारांनी खासदारांनी आपले प्रतिनिधी म्हणूनच राजकारण करावे. त्यांनी गद्दारी करू नये एवढी माफक अपेक्षा प्रामाणिक मतदार, पक्ष कार्यकर्ता नक्कीच ठेवून आहेत. त्यांचा मान राखून लोकप्रतिनिधींनी राजकारण जरूर करावे पण समाजकारणाला विचारात घेण्यास विसरू नये. **

## सर्वंकष जीवनविषयक दृष्टिकोनासाठी

# ५१ नामवंतांची भाषणे

पुस्तक परीक्षण

**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

५१ नामावंतांची भाषणे, हे अशोक बेंडखळे यांनी संपादन केलेले पुस्तक, संधिकाल प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ विचारवंत आणि लेखक, कुमार केतकर यांची सविस्तर प्रस्तावना आहे. त्यांच्या मते, अशोक बेंडखळे यांनी त्यांच्या अनंत व्यापातून वेळ काढून हे सर्व विचारविश्व मराठी वाचकांपर्यंत आणले ही बाब अतिशय महत्त्वाची आहे. या ग्रंथमाध्यमाद्वारे संस्कृतीकरणाचा एक लक्षणीय टप्पा साधला गेला आहे. संपादक अशोक बेंडखळे यांनी आपले मनोगत सविस्तरपणे मांडले आहे. यापूर्वी त्यांचे ५१ गाजलेली भाषणे, हे पुस्तक नऊ वर्षांपूर्वी प्रकाशित झाले होते. त्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रांतील, दिग्गज व्यक्तींची भाषणे या पुस्तकात समाविष्ट केल्याने, त्याद्वारे वाचकांना प्रेरणा प्राप्त होईल, अशी आशा अशोक बेंडखळे यांनी व्यक्त केली आहे. या पुस्तकाचे वेधक मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांचे आहे.

विश्वगुरू जे. कृष्णमूर्ती, यांच्या ३० मार्च १९५३ रोजीच्या, अमेरिकेतील भाषणाचा वेधक भाग, पहिल्या लेखामध्ये वाचावयास मिळतो. त्यांच्या मते, सत्याचा साक्षात्कार आत्मसाक्षात्कारावाचून होऊच शकत नाही. श्रवणकलेचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले आहे. श्रवणातून आपल्यामध्ये अस्तित्वाची जाणीव निर्माण होते. दादाभाई नवरोजी यांनी ब्रिटिश संसदेच्या कनिष्ठ सभागृहात, ब्रिटन भारताची कशी लूट करत आहे, हे आपल्या व्याख्यानातून स्पष्ट केले होते. महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकाद्वारे शेतकऱ्यांच्या भयावह स्थितीचे दर्शन घडविले. लो. टिळक, बिपिनचंद्र पाल यांनी आपल्या व्याख्यानातून, तत्कालीन भारताच्या स्थितीचे वर्णन करून, ती बदलण्याचे उपाय सुचविले. रवींद्रनाथ टागोर यांनी 'विद्येचे विक्रीकरण' या विषयावर कलकत्ता विद्यापीठात फेब्रुवारी, १९३३ मध्ये केलेल्या भाषणात, शिक्षणाची अभिव्यक्ती होण्यासाठी ते संपूर्ण देशाच्या भूमीवर पसरलेले असले पाहिजे, हे आग्रहाने मांडले होते. वेदांत आणि जीवन, या विषयावर लंडनमध्ये, १०.११.१८९६ रोजी, स्वामी विवेकानंद यांनी केलेल्या व्याख्यानातील निवडक भाग या पुस्तकात समाविष्ट केला आहे. वेदांताच्या मते, स्वतःला दुबळे, पापी, हीन-दीन मानणे ही सर्वात मोठी चूक आहे. २७.२.१९३६ रोजी बडोदे येथे 'आपणाला हवा असलेला धर्म' या विषयावर सयाजीराव गायकवाड यांनी केलेले भाषण, या पुस्तकात समाविष्ट आहे. आधुनिक मानव धर्माची प्रमुख तत्त्वे म्हणजे माणुसकी, सारखेपणा, समतोलपणा, सेवा आणि नीती ही होत. तसेच मानवी जीवनात त्यांनी उत्तम आरोग्याला महत्त्व दिले होते. लाला लजपतराय, गोपाळ कृष्ण गोखले यांनी आपल्या व्याख्यानातून ब्रिटिशांच्या राजवटीत सर्वसामान्य भारतीय कसा अधिकाधिक गरीब होत गेला, त्याचे वास्तववादी चित्र रंगविले आहे. बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटनप्रसंगी महात्मा गांधींनी केलेले भाषणही विचार प्रवर्तक आहे. ''हिंदुस्थानच्या मुक्ततेकरिता इंग्रजांनी येथून निघून जावे, त्यांना येथून हाकलून लावावे, हे जर मला आवश्यक वाटले तर त्यांना येथून जावे लागेल असे जाहीर करण्याला मी मुळीच कचरणार नाही. आणि मला वाटते. त्या म ताकरिता मला मरावे लागले तरी मी त्यासाठी तयार असेन. माझ्या मते ते आदरणीय मरण ठरेल.'' असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. १५.८.१९४७ रोजी आकाशवाणीवरून केलेले योगी अरविंद यांचे भाषण या पुस्तकात समाविष्ट आहे. त्यामध्ये त्यांनी स्वतंत्र भारतासमोरील विविध आव्हानांची आणि समस्यांची चर्चा केली होती.




५ जानेवारी १९४८ रोजी लखनौ येथील जाहीर सभेतील भाषणात, सरदार वल्लभभाई पटेल यांनी ''मी मुसलमानांचा मोठा शत्रू आहे असे सांगण्यात येत असले तरी मी मुसलमानांचा सच्चा मित्र आहे'' हे कसे, ते स्पष्ट केले आहे. डिसेंबर,१९१७ मध्ये सरोजिनी नायडू यांनी केलेल्या भाषणामध्ये त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाविषयी आपले विचार मांडले. त्यांनी समाजातील सर्व पुरुषांना आवाहन केले की, तुमच्या स्त्रियांना सर्व समान हक्क द्या. मे १९५२ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पुण्यातील अभिनव भारत सांगता समारंभातील व्याख्यानात आपले जीवन तत्त्वज्ञान सांगितले. स्वतंत्र देशांमध्ये तरुणांचे कोणते कर्तव्य आहे याची जाणीव त्यांनी करून दिली. १२.५.१९५१ रोजी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारप्रसंगी केलेले डॉ.राजेंद्र प्रसाद यांचे भाषण विचारप्रवर्तक आहे. आज या गोष्टीला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यावेळचे त्यांचे विचार आजही मननीय आहेत. एम.एन.रॉय यांच्या एका लेखावर आधारित, त्यांचे मनोगत असे सांगते की, वास्तविक सत्ता ही ज्या प्रमाणात लोकांमध्ये वाटली जाईल त्या प्रमाणात लोकशाही खरी ठरते. खऱ्या लोकशाहीमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावयाला हवे. सत्तेचा व्यापक रीतीने फैलाव होऊन राज्य यंत्रणाही समाजाशी एकरूप व्हावयास हवी. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यादिवशी, जवाहरलाल नेहरू यांनी केलेल्या, भाषणातील, निवडक भाग या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामध्ये भविष्यातील विविध आव्हानांची चर्चा सविस्तरपणे केली होती. ऑक्टोबर १९५४मध्ये, कोलंबिया विद्यापीठातील द्विशताब्दी समारंभात, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी केलेले भाषण या पुस्तकात समाविष्ट केले आहे. ते नितांत वाचनीय आणि प्रेरक आहे. बौद्ध धर्म हा वास्तववादी धर्म आहे. नुसत्या काल्पनिक गोष्टींवर बुद्धाने आपल्या धर्माची उभारणी केली नाही. त्यामुळे ईश्वर आणि आत्मा किंवा अशाच भलत्यासलत्या गोष्टी बुद्धाला मान्य नव्हत्या. जे मानवाला अनुभवता येत नाही किंवा ज्याचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही, अशा कोणत्याही गोष्टीवर बुद्धाचा विश्वास नव्हता, असे ठामपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २३.६.१९५६ रोजी नवी दिल्ली येथील व्याख्यानात सांगितले होते. हिंदू धर्मातील विविध अवास्तव आणि निरर्थक प्रथांवरही त्यांनी कठोर टीका केली होती. राजकीय नेत्यांप्रमाणेच, या पुस्तकात अन्य क्षेत्रांतील विविध मान्यवरांच्या भाषणांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये आचार्य विनोबा भावे, न्या.तारकुंडे, जे.आर.डी. टाटा, दादा धर्माधिकारी, प्रा.धनंजयराव गाडगीळ, मदर टेरेसा, बाबा आमटे, सत्यजित रे, डॉ. स्वामीनाथन, रतन टाटा, नारायण मूर्ती यांचाही समावेश आहे.

शहीद भगतसिंग यांनी त्यांच्या फाशीपूर्वी ६ जून १९२९रोजी, न्यायालयाला दिलेले बाणेदार उत्तर या पुस्तकात समाविष्ट आहे. अवघ्या २३ व्या वर्षी, फाशीवर बेधडकपणे जाणाऱ्या, शहीद भगतसिंग यांचे त्यावेळचे विचार आजही प्रेरणा देणारे ठरतात. बाबा आमटे यांनी युवकांना दिलेला अप्रतिम संदेश, प्रेरणादायक ठरणारा आहे. या पुस्तकातील समाविष्ट मान्यवरांची भाषणे, फक्त एकदाच न वाचता, त्यावर वेळोवेळी वाचून चिंतन करण्याची गरज आहे. तरच या पुस्तकाचा हेतू साध्य होईल. पुस्तकात राहून गेलेले, विविध, ठळक मुद्रणदोष टाळणे आवश्यक होते. हे पुस्तक आबालवृद्धांना उपयुक्त आणि प्रेरक ठरणारे आहे. **

**पुस्तकाचे नावः ५१ नामवंतांची भाषणे संपादन : अशोक बेंडखळे**
**९८६९२५८५८५**
**प्रकाशक : संधिकाल प्रकाशन,**
**भाईंदर (पूर्व) ९८२०५९५२८२**
**प्रथमावृत्ती : डिसेंबर २०२४**
**पृष्ठे : २५२, किंमत : रू. ३००/-**

# योग ते लोकयोग : स्वतःच्या परिवर्तनातून समाजपरिवर्तन



**विजयकुमार कट्टी**

एक सामान्य नागरिक तीन दशकांहून अधिक सामाजिक जीवनाचा अनुभव गेल्या काही दिवसांत आपण योगाच्या प्रवासात अनेक महत्त्वाच्या टप्प्यांवर थांबलो. स्वतःला जाणून घेण्यापासून सुरुवात केली. अपरिग्रह, संतोष, श्वास, संतुलन, करुणा आणि परस्परावलंबी जीवनव्यवस्था यांवर चिंतन केले.

या मालिकेतील प्रत्येक लेख लिहिताना मी कोणताही योगतज्ज्ञ किंवा तत्त्वज्ञ म्हणून लिहिले नाही. मी फक्त एक सामान्य नागरिक म्हणून माझे अनुभव, प्रश्न आणि निरीक्षणे मांडण्याचा प्रयत्न केला.

आज या मालिकेच्या शेवटच्या लेखात मला एक प्रश्न पुन्हा विचारायचा आहे. योगाचा अंतिम उद्देश काय आहे? फक्त निरोगी शरीर? मानसिक शांतता? की त्यापेक्षा काही अधिक?

माझ्या मते योगाचा प्रवास जेव्हा फक्त ''मी'' पासून ''आपण'' पर्यंत पोहोचतो, तेव्हाच तो पूर्ण होतो. कारण योग हा जोडण्याचा प्रवास आहे. आणि जोडण्याची प्रक्रिया स्वतःपासून सुरू होऊन समाजापर्यंत पोहोचली नाही, तर ती अपूर्ण राहते. गेली तीस वर्षे सामाजिक जीवनात काम करताना मी अनेक मोहिमा, चळवळी, अभियान आणि उपक्रम पाहिले. काही यशस्वी झाले, काही अयशस्वी झाले. काहींना मोठी प्रसिद्धी मिळवली, काही शांतपणे विरून गेले. पण एक गोष्ट मात्र मला वारंवार जाणवली. समाज बदलण्याचा प्रयत्न करणारे अनेक लोक समाजापासून सुरुवात करतात. पण खरा बदल स्वतःपासून सुरू होतो.

एकदा एका कार्यक्रमात एका ज्येष्ठ व्यक्तीने मला विचारले, ''समाज इतका असंवेदनशील का होत चालला आहे?'' मी त्यांना प्रतिप्रश्न केला, ''समाज म्हणजे नेमके कोण?'' काही क्षण ते शांत राहिले. कारण समाज ही काही वेगळी संस्था नाही. समाज म्हणजे आपण सर्व. म्हणून समाजातील प्रत्येक समस्या कुठेतरी आपल्या वैयक्तिक वर्तनाशी जोडलेली असते. रस्त्यावरचा कचरा कोणीतरी टाकलेला असतो. पाण्याचा अपव्यय कोणीतरी केलेला असतो. असहिष्णु शब्द कोणीतरी उच्चारलेले असतात. अन्यायाकडे दुर्लक्ष कोणीतरी केलेले असते. आणि त्याचप्रमाणे सकारात्मक बदलही कोणीतरी सुरू केलेला असतो. योगातील सर्वांत मोठी शिकवण मला इथेच दिसते. योग इतरांना बदलण्याचा प्रयत्न करत नाही. तो स्वतःमध्ये बदल घडवण्याचे आमंत्रण देतो. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या श्वासाबद्दल सजग होते, तेव्हा ती आपल्या शब्दांबद्दलही सजग होते.

जेव्हा ती आपल्या शरीराची काळजी घेते, तेव्हा ती इतरांच्या आरोग्याचाही विचार करू लागते. जेव्हा ती संतोष शिकते, तेव्हा स्पर्धेपेक्षा सहकार्याला महत्त्व देऊ लागते. जेव्हा ती करुणा शिकते, तेव्हा स्वतःच्या पलिकडे पाहू लागते. आणि हाच क्षण योगाचा लोकयोग होण्याचा असतो. माझ्या मते लोकयोग म्हणजे काय? लोकयोग म्हणजे योग चटईपुरता मर्यादित न राहता जीवनात उतरलेला असणे. योगासनातील संतुलन कुटुंबातील नात्यांमध्ये दिसणे. प्राणायामातील सजगता दैनंदिन निर्णयांमध्ये दिसणे. ध्यानातील शांतता संवादामध्ये दिसणे. करुणा समाजातील वर्तनामध्ये दिसणे. आणि अपरिग्रह उपभोगाच्या सवयींमध्ये दिसणे. आपल्या शरीराकडून आपण एक महत्त्वाचा धडा शिकू शकतो. शरीरातील एक पेशी जर फक्त स्वतःचाच विचार करू लागली, तर ती कर्करोगाची पेशी बनते. ती वाढत राहते, साठवत राहते आणि अखेरीस संपूर्ण शरीराला धोका निर्माण करते. परंतु निरोगी पेशी संपूर्ण शरीराच्या हितासाठी काम करते. कदाचित समाजालाही हाच नियम लागू होतो. जेव्हा प्रत्येक व्यक्ती फक्त स्वतःच्या फायद्याचा विचार करते, तेव्हा समाज असंतुलित होतो. पण जेव्हा व्यक्ती स्वतःच्या विकासासोबत सामूहिक हिताचाही विचार करते, तेव्हा समाज निरोगी बनतो.

आज जगाला अधिक धोरणांची गरज आहे का? कदाचित आहे. अधिक तंत्रज्ञानाची गरज आहे का? निश्चितच आहे. पण त्याहून अधिक गरज आहे ती सजग नागरिकांची. कारण कोणतीही व्यवस्था तिच्या लोकांपेक्षा अधिक सजग असू शकत नाही. आज आपण अनेकदा विचारतो देश कसा बदलेल? शहर कसे बदलेल? समाज कसा बदलेल? परंतु योग आपल्याला प्रश्न उलटा विचारायला शिकवतो. मी कसा बदलेन? माझ्या सवयी कशा बदलतील? माझ्या कृतींमधून कोणता संदेश जाईल? कारण समाज परिवर्तनाची सुरुवात घोषणांमधून होत नाही. ती सवयींमधून होते. ती जाणीवेतून होते. ती उदाहरणातून होते.

माझ्या सामाजिक जीवनातील अनुभवातून मला एक गोष्ट स्पष्टपणे समजली आहे. लोक भाषणांमुळे कमी बदलतात. लोक उदाहरणांमुळे अधिक बदलतात. आपण जे बोलतो त्यापेक्षा आपण जे जगतो त्याचा प्रभाव अधिक असतो. म्हणूनच योगाचा खरा प्रचार शब्दांनी होत नाही. तो आचरणातून होतो. एक सजग नागरिक शंभर घोषणांपेक्षा अधिक प्रभावी असतो. एक संवेदनशील कुटुंब अनेक मोहिमांपेक्षा अधिक प्रभावी असते. एक जबाबदार समुदाय अनेक योजनांपेक्षा अधिक प्रभावी असतो. आज आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने या मालिकेचा समारोप करताना मला एक साधा पण महत्त्वाचा विचार मांडायचा आहे. योग हा वर्षातून एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नाही. तो दररोज जगण्याचा सराव आहे. तो शरीरापासून सुरू होतो, मनातून प्रवास करतो आणि समाजापर्यंत पोहोचतो. तो ''मी'' पासून सुरू होतो आणि ''आपण'' पर्यंत पोहोचतो. आणि कदाचित याच प्रवासात व्यक्तीचे कल्याण, समाजाचे स्वास्थ्य आणि भविष्याची आशा दडलेली आहे. जर योगाने मला काही शिकवले असेल, तर ते हे स्वतःमध्ये बदल घडवा.

उदाहरण बना. जोडत राहा. कारण प्रत्येक मोठ्या परिवर्तनाची सुरुवात एका सजग व्यक्तीपासूनच होते. आणि जेव्हा अशा सजग व्यक्तींची संख्या वाढते, तेव्हा योग लोकयोग बनतो आणि लोकयोग समाजपरिवर्तनाची शक्ती बनतो.

**समारोप**

या सात लेखांच्या मालिकेतून मी कोणतेही अंतिम सत्य मांडलेले नाही. उलट, काही प्रश्न तुमच्यासमोर ठेवले आहेत. स्वतःला जाणण्याचा प्रयत्न करूया. किती पुरेसे आहे हे समजून घेऊया. जे आहे त्यात समाधान शोधूया. प्रत्येक श्वासाबद्दल कृतज्ञ राहूया. जीवनात संतुलन निर्माण करूया. करुणा आणि परस्परावलंबन समजून घेऊया. आणि मग त्या जाणिवेला आपल्या दैनंदिन जीवनात उतरवूया. कदाचित तेव्हाच योग दिन साजरा करण्याची गरज उरणार नाही. कारण योग आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला असेल. आणि तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने म्हणू शकू ''योग हा माझा सराव नाही; योग ही माझी जीवनपद्धती आहे.'' **

# योगः निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाची गुरुकिल्ली

**डॉ. हेमंत पयेर**

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत 'आरोग्य' हीच खरी संपत्ती ठरली आहे. बदलत्या जीवनपद्धतीमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत, मानसिक ताण वाढला आहे आणि जीवनशैलीशी संबंधित आजारांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या शारीरिक अथवा मानसिक समस्येचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण जगाला निरोगी जीवनाचा मार्ग दाखवणारी भारताची प्राचीन परंपरा म्हणजे योग होय. म्हणूनच दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून उत्साहात साजरा केला जातो.

योग ही भारताच्या प्राचीन संस्कृतीची आणि ज्ञानपरंपरेची अनमोल देणगी आहे. हजारो वर्षांपूर्वी भारतीय ऋषी-मुनींनी मानवाच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी योगविद्येची निर्मिती केली. योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून संपूर्ण जीवनाला दिशा देणारे शास्त्र आहे.

आजचे जीवन तंत्रज्ञानकेंद्री झाले आहे. संगणक, मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल साधनांमुळे जीवन अधिक सोयीस्कर झाले असले तरी शारीरिक हालचालींचे प्रमाण कमी झाले आहे. दिवसभर स्क्रीनसमोर बसून काम करणे, अनियमित आहार, अपुरी झोप, व्यायामाचा अभाव आणि वाढता मानसिक ताण यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, लठ्ठपणा, नैराश्य आणि चिंता यांसारख्या समस्या झपाट्याने वाढत आहेत. अशा परिस्थितीत योग हा एक प्रभावी, नैसर्गिक आणि सर्वसमावेशक उपाय ठरतो. योग केवळ शरीराला तंदुरुस्त ठेवत नाही, तर मनाला शांतता, स्थैर्य आणि सकारात्मक ऊर्जा प्रदान करतो. योगाच्या नियमित सरावामुळे शरीर, मन आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. योगासनांमुळे शरीराची लवचिकता वाढते, स्नायू बळकट होतात आणि सांध्यांची हालचाल सुधारते. पाठीचे दुखणे, मानदुखी आणि स्नायूंच्या अनेक समस्या कमी होण्यास मदत होते. रक्ताभिसरण सुधारते आणि शरीराची कार्यक्षमता वाढते. प्राणायाम आणि ध्यानामुळे मन शांत राहते. ताणतणाव, चिंता आणि नैराश्य कमी होण्यास मदत होते. मानसिक संतुलन राखण्यास योग अत्यंत उपयुक्त ठरतो. योगामुळे शरीरातील विविध अवयवांचे कार्य अधिक कार्यक्षम होते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि शरीराला आजारांशी लढण्याची क्षमता प्राप्त होते. नियमित योगाभ्यासामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढतो.

अनेकांना वाटते की योग म्हणजे काही आसने किंवा शारीरिक हालचाली. प्रत्यक्षात योग ही एक व्यापक जीवनशैली आहे. पतंजलींच्या अष्टांग योगामध्ये यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी या आठ अंगांचा समावेश आहे. शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणे हा योगाचा मूलभूत उद्देश आहे. 'योग' या शब्दाचा अर्थच 'जोडणे' किंवा 'जुळणे' असा आहे. व्यक्तीला स्वतःशी, समाजाशी आणि निसर्गाशी जोडण्याचे सामर्थ्य योगामध्ये आहे. म्हणूनच योग हा केवळ व्यायाम नसून जगण्याची एक कला आहे. आजच्या युवा पिढीसमोर शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक आरोग्याचे मोठे आव्हान उभे आहे. शैक्षणिक स्पर्धा, करिअरची चिंता, सोशल मीडियाचा प्रभाव आणि वाढता मानसिक ताण यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. योगामुळे आत्मविश्वास, भावनिक स्थैर्य, सकारात्मक दृष्टिकोन आणि निर्णयक्षमता विकसित होते. खेळाडूंसाठीही योग अत्यंत उपयुक्त आहे. शरीराची लवचिकता, संतुलन, एकाग्रता आणि पुनर्प्राप्ती क्षमता वाढविण्यासाठी योग महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. त्यामुळे आज अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा संघ योगाचा सराव नियमितपणे करतात.

योगाचे जागतिक महत्त्व ओळखून भारताने त्याचा प्रसार करण्याचा महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला. सन २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला १७७ देशांनी विक्रमी पाठिंबा दिला. त्यानंतर २०१५ पासून संपूर्ण जगात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जात आहे. वर्षातील सर्वात मोठा दिवस असलेल्या २१ जूनला विशेष खगोलशास्त्रीय आणि सांस्कृतिक महत्त्व असल्याने या दिवसाची निवड करण्यात आली. आज भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून तसेच विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, क्रीडा संघटना आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून योगाचा व्यापक प्रचार-प्रसार केला जात आहे. योग हा कोणत्याही धर्म, जात, भाषा किंवा देशापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आहे.योगासाठी महागडी साधने किंवा विशेष सुविधा आवश्यक नाहीत. दररोज केवळ २० ते ३० मिनिटांचा नियमित योगाभ्यास आपल्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवू शकतो.

''योग करा, निरोगी राहा आणि आनंदी जीवन जगा.''

सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! **

# अफगाणिस्तानला व्हाईट वॉश देण्याची संधी

## ।। विजयासाठी २१९ धावांचे आव्हान ।। प्रसिद्ध कृष्णाच्या ५ विकेट्स

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारत आणि अफगाणिस्तान संघात वनडे मालिकेतील अखेरचा आण तिसरा वनडे सामना चेन्नईला खेळवला जात आहे. या सामन्यात अफगाणिस्तानला भारताच्या वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने मोठे धक्के दिले होते, पण नंतर कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने तारले. त्याने शतक केल्याने भारतासमोर २१९ धावांचे समाधानकारक लक्ष्य अफगाणिस्तानला उभे करता आले आहे. या मालिकेत भारताने यापूर्वीच दोन्ही सामने जिंकून मालिका विजय निश्चित केला आहे. त्यामुळे आता तिसऱ्या सामन्यात विजय मिळवून व्हाईटवॉश देण्याचा प्रयत्न भारताचा आहे, तर अफगाणिस्तान प्रतिष्ठा राखण्यासाठी तिसऱ्या सामन्यात विजय मिळवण्याचा प्रयत्न करतील.




या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, प्रसिद्ध कृष्णा आणि रोहित शर्माने मिळून अफगाणिस्तानला ८ षटकातच मोठे धक्के दिले. दुसऱ्याच षटकात प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर रोहितने फॉर्ममध्ये असलेल्या रेहमनुल्लाह गुरबाजचा झेल घेतला. त्यानंतर रेहमत शाह आणि इब्राहिम झाद्रान यांनाही अनुक्रमे ६ व्या आणि ८ व्या षटकात प्रसिद्ध कृष्णानेच ५ आणि ११ धावांवर बाद केले. या दोघांचे झेलही रोहित शर्मानेच घेतले.

भारताच्या वनडे इतिहासात असे पहिल्यांदाच झाले की पहिल्या तिन्ही विकेट्समध्ये एकच गोलंदाज आणि एकच क्षेत्ररक्षक सामील होते.दरम्यान, १० व्या षटकात प्रसिद्ध कृष्णाने आणखी एक विकेट घेतली. त्याने डार्विश रसुलीला श्रेयस अय्यरच्या हातून १ धावेवर झेलबाद केले. त्यामुळे अफगाणिस्तानने १० षटकातच ३६ धावांवर ४ विकेट्स गमावल्या होत्या. पण नंतर कर्णधार हशमतुल्ला शाहिदीला अझमतुल्ला ओमरझाईची साथ मिळाली. या दोघांनी मिळून १०५ धावांची भागीदारी केली. यादरम्यान दोघांनीही अर्धशतके केली होती. त्यामुळे अफगाणिस्तानने १४० धावांचा टप्पा ओलांडण्यात यश मिळवले. परंतु, अर्धशतकानंतर ओमरझाईला ५६ चेंडूत ५० धावावंर प्रिन्स यादवने माघारी धाडले. त्याचा झेल प्रसिद्ध कृष्णाने घेतला. तरी नंतर काहीवेळ मोहम्मद नबीने शाहिदीची साख देताना ५७ धावांची भागीदारी केली. पण नबीलाही ३८ व्या षटकात गुरनूर ब्रारने २१ धावांवर त्रिफळाचीत केले. यानंतर राशिद खान (५), अल्लाह गझनफर (१), फरीद अहमद मलिक (०) हे स्वस्तात बाद झाले. गझनफर आणि मलिकला शुबमन गिल आणि यष्टीरक्षक किशनने मिळून लागोपाठच्या चेंडूवर धावबाद केले.

पण या विकेट्स जात असताना शाहिदीने त्याने शतक पूर्ण केले. हे त्याचे पहिलेच वनडे शतक ठरले. त्यालाच ४५ व्या षटकात कृष्णाने बाद करत अफगाणिस्तानचा डाव संपवला. भारताकडून कृष्णाने ५ विकेट्स घेतल्या, तर ब्रार, यादव, दुबे यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# आयपीएलचा पुढील हंगाम लवकर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयपीएलचा यंदाचा हंगाम काही दिवसांपूर्वीच संपला. पुढच्या वर्षीची आयपीएल अजून दूर आहे, पण बीसीसीआयने आधीच तयारी सुरु केली आहे. वेळापत्रक नंतर जाहीर केलं जाईल, पण तात्पुरत्या तारखा जाहीर झाल्या आहेत. अशी अपेक्षा आहे की पुढची आयपीएल थोडी लवकर सुरु होऊन मे महिन्याच्या मध्यापर्यंत चालेल. शिवाय, बीसीसीआय सध्या सामन्यांची संख्या वाढवण्याचा विचार करत नाही आहे.

पुढच्या वर्षीची आयपीएल १० मार्च रोजी सुरु होऊन अंतिम सामना १५ मे रोजी नियोजित आहे. वास्तविक पाहता, उत्तर भारतात मे महिन्याच्या अखेरीस प्रचंड उष्णता असते, ज्यामुळे खेळाडूंना दिवसा खेळणे कठीण होते. हे टाळण्यासाठी, बीसीसीआय स्पर्धा थोडी लवकर सुरु करण्याची योजना आखत आहे.



बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी ही माहिती दिली.

सैकिया यांनी असेही स्पष्ट केले की, आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे वेळापत्रक खूप व्यस्त आहे, त्यामुळे सध्या सामन्यांची संख्या वाढवण्याचा विचार केला जात नाही. याचा अर्थ असा की पुढच्या वर्षीच्या आयपीएलमध्येही एकूण ७४ सामने खेळवले जातील. त्यानंतरच ९४ सामने अपेक्षित आहेत.

या वर्षीची आयपीएल २९ मार्च रोजी सुरु झाली आणि स्पर्धेचा अंतिम सामना ३१ मे रोजी खेळला गेला. सैकिया म्हणाले की, १५ मे नंतर मान्सूनपूर्व हंगाम सुरु होतो, त्यामुळे हे टाळण्यासाठी स्पर्धा लवकर संपण्याचा बीसीसीआय विचार असे त्यांनी सांगितले आहे.

# फॅफ ड्यूप्लेसिसचे वादळी शतक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

४२ वर्षीय फॅफ ड्यू प्लेसिसने वय हा केवळ आकडा आहे, हे सिद्ध केले. त्याने वादळी शतकी खेळी करताना टेक्सास सुपर किंग्सला २२१ धावांचे लक्ष्य १८.३ षटकांत सहज पार करून दिले. सुपर किंग्सने मेजर लीग क्रिकेटमध्ये सिटल ऑर्कसवर ६ विकेट्स व ९ चेंडू राखून विजय मिळवला. ड्यु प्लेसिसच्या फॅफच्या शतकामुळे ऑर्कसच्या टीम सेइफर्टची शतकी खेळी व्यर्थ गेली. फॅफने शतकासह टी-२० क्रिकेटमध्ये एकाही फलंदाजाला न जमलेला विक्रमही नावावर केला. ऑर्कसने प्रथम फलंदाजी करताना २ बाद २२० धावा केल्या. टीम सेइफर्ट व शयन जहांगिर यांनी पहिल्या विकेटसाठी १७.२ षटकांत १९१ धावांची भागीदारी केली. पहिल्या विकेटसाठीची या संघासाठी झालेली ही सर्वोत्तम भागीदारी ठरली. यापूर्वी जयसुरिया व रिकल्टन यांच्या ७६ धावांच्या भागीदारीचा विक्रम होता. कोणत्याही विकेटसाठीही ची संघाकडून झालेली सर्वोत्तम भागीदारी ठरली. यापूर्वी रिकल्टन व डी कॉक यांनी १५२ धावा जोडल्या होत्या. सेइफर्टने ६६ चेंडूत ८ चौकार व ६ षटकारांसह १०४ धावा केल्या. ऑर्कसकडून ही सर्वोत्तम वैयक्तिक खेळी ठरली, यापूर्वी



रिकल्टनच्या १०३ धावांचा विक्रम होता. जहांगिरनेही ४७ चेंडूंत ३ चौकार व ७ षटकारांसह ७८ धावा कुटल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना साईतेजा मुक्कामल्ला भोपळ्यावर माघारी परतला, परंतु फॅफ व रिली रोसोवू यांनी दुसऱ्या विकेटसाठी ९६ धावा जोडल्या. रोसोवू २१ चेंडूंत ७ चौकार व २ षटकारांसह ४९ धावांवर बाद झाला. त्यानंतर थोड्या थोड्या अंतराने सुपर किंग्सला धक्के बसले होते. पण फॅफने ५२ चेंडूंत ९ चौकार व ७ षटकारांसह नाबाद ११३ धावा केल्या. एमएलसीच्या इतिहासात चार शतकं करणारा तो पहिलाच फलंदाज ठरला, शिवाय टी-२० क्रिकेटमध्ये वयाच्या चाळीशीनंतर तीन शतक करणारा जगातील पहिलाच फलंदाज आहे.

## नव्या पाठ्यपुस्तकात व्यायाम, योगाला प्राधान्य

। पुणे । प्रतिनिधी ।

बालभारतीच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या पाठ्यपुस्तकांची नव्याने निर्मिती करण्यात आली असून, इयत्त चौथी मधील शारीरिक शिक्षण व निरामयता या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासावर भर देण्यात आला आहे. खेळ, व्यायाम, योग, सूर्यनमस्कार, स्वसंरक्षण, निरामयता आणि क्रीडांगण विषयक सवयी यांचा समावेश करून विद्यार्थ्यांना निरोगी जीवनशैलीची ओळख करून देण्यात आली आहे.

# गतविजेत्या कीवींचा निसटता विजय

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत, न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट संघाने एका महत्त्वाच्या सामन्यात आयर्लंडला ४ धावांनी पराभूत केले. या विजयामुळे गतविजेत्या न्यूझीलंडने चालू स्पर्धेत आपले खाते उघडले, तर आयर्लंडला सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले. या विजयामुळे न्यूझीलंड गट-२ मध्ये चौथ्या स्थानावर पोहोचला आहे, तर आयर्लंड सलग तीन पराभवांसह शेवटच्या स्थानावर आहे.

सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर न्यूझीलंडची सुरुवात



खराब झाली. संघाने अवघ्या १० धावांत तीन महत्त्वाच्या विकेट गमावल्या. आयर्लंडच्या एमी मॅग्वायर आणि ऑर्ला प्रेंडरगॅस्ट यांनी कीवी संघाला सुरुवातीलाच धक्के दिले. त्यानंतर कर्णधार अमेलिया केरनं ३० धावांची खेळी करुन परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला. न्यूझीलंडसाठी इझी शार्पने सर्वाधिक ३६ धावा केल्या. शेवटच्या षटकांमध्ये, अनुभवी सुझी बेट्सने नाबाद १९ धावा केल्या आणि शेवटच्या चेंडूवर षटकार मारुन संघाला २० षटकांत ६ गडी बाद १४० धावांपर्यंत पोहोचवले. १४१ धावांचे लक्ष्य गाठताना आयर्लंडची सुरुवात खराब झाली, सलामीवीर एमी हंटर लवकर बाद झाली. कर्णधार लुईस आणि प्रेंडरगॅस्ट यांनी शानदार फलंदाजी करत दुसऱ्या विकेटसाठी ११० धावांची भागीदारी रचली. प्रेंडरगॅस्टनं ५९ धावा केल्या तर लुईसनंही अर्धशतक झळकावून आयर्लंडचा विजय जवळपास निश्चित केला.

# ऑस्ट्रेलियाकडून बांग्लादेशचा सुपडसाफ

। ढाका । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलियाचा संघ बांग्लादेशच्या दौऱ्यावर आहे. ऑस्ट्रेलिया अन् बांग्लादेशमध्ये आधी तीन सामन्यांची वनडे सिरिज पार पडली आहे. या सिरिजमध्ये बांग्लादेशने ऑस्ट्रेलियाचा दारुण पराभव स्वीकारावा लागला आहे. मात्र आटा त्यानंतर सुरू असलेल्या टी २० सिरिजवर ऑस्ट्रेलियाने विजय मिळवला आहे.

ऑस्ट्रेलियाच्या संघाने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाने १९६ रन्स केल्या. बांग्लादेशला १९७ रन्सचे टार्गेट ऑस्ट्रेलियाने दिले होते. दरम्यान बांग्लादेशच्या संघाने देखील एक चांगली सुरुवात केली. बांग्लादेशने १३४ वर असताना आपली विकेट गमावली. तिथूनच बांग्लादेशचा संघ अडचणीत आला. शेवटच्या ओव्हरपर्यन्त हा सामना गेला. एक ओव्हरमध्ये बांग्लादेशला २३ रन्सची गरज होती. मात्र बांग्लादेशचा संघ केवळ १५ रन्स करून शकला. बांग्लादेश आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतील दूसरा सामना पार पडला.

# ब्राझील ग्रुप 'सी' मध्ये अव्वलस्थानी

। डॅलस । वृत्तसंस्था ।

पाच वेळचा फुटबॉल विश्वविजेता संघ असे बिरुद मिरवणाऱ्या ब्राझीलने हैतीचा ३-० असा पराभव करत २०२६ फिफा विश्वचषकातील आपल्या पहिल्या विजयाची नोंद केली. मॅथियस कुन्हाने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर संघाने 'ग्रुप सी' मध्ये अव्वल स्थान गाठले आहे.

पहिला सामना सुटला होता बरोबरीतब्राझील संघाला पहिल्या सामन्यात मोरोक्कोविरुद्ध १-१ अशा बरोबरीत समाधान मानावे लागले होते. त्यामुळे चाहत्यांच्या नजरा हैतीविरुद्धच्या सामन्याकडे लागल्या



होत्या. ब्राझीलला या सामन्यात पुनरागमन करणे गरजेचे होते.

हैतीविरुद्ध पूर्वार्धातच ब्राझीलचे वर्चस्वसामन्याच्या २३ व्या मिनिटाला ब्राझीलने खेळावर नियंत्रण मिळवले, मात्र, या पहिल्या गोलमध्ये नशिबाचीही थोडी साथ लाभली. विनिसियसने हैतीचा गोलरक्षक जॉनी प्लेसाइडच्या दिशेने शॉट मारला. गोलरक्षकाने तो शॉट अडवला.

कुन्हाने डागले दोन गोलया पहिल्या गोलमुळे ब्राझीलचा आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी खेळावर पूर्ण वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली.

३६ व्या मिनिटाला कुन्हाने सामन्यातील सर्वात प्रेक्षणीय गोल करत संघाला २-० अशी आघाडी मिळवून दिली. विनिसियसने दिलेल्या अचूक थ्रू बॉलवर या स्ट्रायकरने रिकाम्या जागेचा अचूक फायदा घेतला आणि डाव्या पायाने एक उत्कृष्ट आणि वेगवान शॉट मारत बॉल थेट टॉप कॉर्नरमध्ये धाडला. पूर्वार्धाच्या भरपाई वेळेत ब्राझीलने आपला तिसरा गोल नोंदवत विजय संपादन केला.

राज्यातील पहिलाच क्लब | छत्रपती शाहू महाराजांनी दिला राजाश्रय

# कोल्हापूर फुटबॉल क्लबची शतकीय वाटचाल

। कोल्हापूर । प्रतिनिधी ।

देशभरात आयपीएलसह विविध क्रिकेट स्पर्धांदरम्यान क्रिकेटप्रेमींचा नेहमीच उत्साह दिसून येतो. फुटबॉलचा सामना म्हणजे जीव की प्राण, त्यात सामना जिंकल्यानंतर व्यवस्थापनाकडून मिळणारी लिंबाची फोड म्हणजे जणू विश्वचषक जिंकल्याचा आनंद असतो. सामना खेळण्यासाठी मिळेल त्या वाहनानं तर कधी पायी चालत मैदान गाठणाऱ्या आणि प्रतिकूल परिस्थितीतही फुटबॉलप्रेमासाठी सर्वस्व बहाल केलेल्या पिढीने हा खेळ जिवंत ठेवला. आता याच फुटबॉल संघाची वाटचाल शतकाकडे होत आहे. कोल्हापूरच्या 'प्रॅक्टिस फुटबॉल क्लब'ची स्थापना १९२७ मध्ये झाली. सध्या फुटबॉल विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर शतक महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्रातील पहिल्या फुटबॉल क्लबची कहाणी चर्चेत आली आहे.

करवीर संस्थांनचे अधिपती छत्रपती शाहू महाराजांनी राजाश्रय दिलेल्या खेळांमध्ये फुटबॉलचाही समावेश होता. संस्थान काळापासूनच कोल्हापुरात फुटबॉलला चालना मिळाली. कोल्हापुरातील मंगळवार




पेठेत १९२७ साली त्या काळातील नावाजलेल्या खेळाडूंनी एकत्र येऊन 'प्रॅक्टिस फुटबॉल क्लब'ची स्थापना केली. या घटनेला आता जवळपास शंभर वर्षे पूर्ण होत आहे. कोणत्याही औपचारिक प्रशिक्षणाशिवाय राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारलेले माजी खेळाडू प्रकाश रेडेकर यांनी सांगितले, १९६९ ते १९९० या काळात प्रॅक्टिस फुटबॉल क्लबकडून खेळताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला होता. नव्या पिढीतील खेळाडूंनी समर्पण भावनेतून खेळावे आणि कोल्हापूरचे नाव उंचवावे असे रेडेकर यांनी सांगितले.

### एसटीचा प्रवास

१९६७ ते १९७१ या काळात या संघाकडून खेळलेले बाळासाहेब पवार यांनी त्या काळातील परिस्थिती सांगितली. संघासाठी ऊर्जा म्हणून व्यवस्थापनाकडून फक्त सहा लिंबू मिळायचे. तो अर्धा कापून १२ खेळाडूंमध्ये वाटला जात होता. कोल्हापूरबाहेर सामना असल्यास एसटी चालकाला विनंती करून प्रवासाची व्यवस्था करावी लागायची. मंगळवार पेठेतील शेळके नामक उद्योगपती सामना जिंकल्यानंतर मदत करायचे. मात्र, सुविधांच्या अभावामुळं अनेकदा जीवघेणा प्रवास करावा लागायचा.

## निवडक

### युवराज दिसणार नव्या भूमिकेत

**नवी दिल्ली :** युवराज सिंग भारतीय क्रिकेटमधील एक मोठे नाव आहे. भारतीय क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू युवराज सिंग आता एका नव्या भूमिकेत दिसणार आहे. युवराज सिंह पुन्हा एकदा आयपीएलमध्ये चाहत्यांना पाहायला मिळणार आहे. मात्र, यावेळेस तो मैदानात खेळताना दिसणार नाहीये. तर मैदानाबाहेरून



खेळाडूना मार्गदर्शन करताना दिसणार आहे. दिल्ली कॅपिटल्स किंवा युवराज सिंहअडून याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. समोर आलेल्या माहितीनुसार, युवराज सिंग लवकरच आयपीएलमध्ये दिसण्याची शक्यता आहे. दिल्ली कॅपिटल्स संघाचा कोच म्हणून युवराज सिंग म्हणून दिसण्याची शक्यता आहे. २०२७ च्या आयपीएलमध्ये युवराज सिंग सपोर्ट स्टाफमध्ये काम करताना दिसण्याची शक्यता आहे. ही माहिती खरी असल्यास युवराज सिंग कोच म्हणून कार्य करताना दिसून शकतो.

### हार्दिक पंड्या इंग्लंड दौऱ्यातून बाहेर

**नवी दिल्ली :** संघ इंडिया सध्या अफगाणिस्तानविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळून इंग्लंडचा दौऱ्यावर जाणार आहे. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघ अद्याप जाहीर झालेला नाही. परंतु, या दौऱ्यादरम्यान हार्दिक पांड्या अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर



झाल्यानंतर, हार्दिक इंग्लंड दौऱ्यातूनही बाहेर झाला आहे.दुखापतीमुळे हार्दिक पांड्या इंग्लंड दौऱ्यातून बाहेर पडला आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याची निवड झाली होती, परंतु मालिका सुरू होण्यापूर्वीच दुखापतीमुळे त्याला बाहेर व्हावे लागले. वृत्तानुसार, इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठीही हार्दिकची निवड होणार नाही. आयपीएल २०२६ दरम्यान तो काही सामन्यांमध्ये दिसला नव्हता. पांड्याच्या सततच्या दुखापतींमुळे भारताच्या २०२७ विश्वचषकाच्या तयारीला अडथळा येत आहे, कारण तो संघाला संतुलन देतो.

### नीरज मैदानात उतरण्यासाठी सज्ज

**नवी दिल्ली :** भारताचा गोल्डन बॉय आणि दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता ठरलेला नीरज चोप्रा गेल्या वर्षभरापासून मैदानापासून दूर होता. आता २०२६ च्या ॲथलेटिक्स पर्वाला सुरुवात करण्यास सज्ज झाला आहे. पाठिच्या दुखापतीमुळे काही आठवडे खेळापासून दूर होता. स्वित्झर्लंडमधील ऑलिम्पिक सेंटरमध्ये पुनर्वसन केल्यानंतर नीरज आता डायमंड लीग स्पर्धेत खेळण्यास सज्ज झाला आहे.



भारताचा गोल्डन बॉय आणि दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता ठरलेला नीरज चोप्रा गेल्या वर्षभरापासून मैदानापासून दूर होता. आता २०२६ च्या ॲथलेटिक्स पर्वाला सुरुवात करण्यास सज्ज झाला आहे. पाठिच्या दुखापतीमुळे काही आठवडे खेळापासून दूर होता. स्वित्झर्लंडमधील ऑलिम्पिक सेंटरमध्ये पुनर्वसन केल्यानंतर नीरज आता डायमंड लीग स्पर्धेत खेळण्यास सज्ज झाला आहे. या स्पर्धेच्या सुरुवातीच्या प्रवेश यादीत नीरजचे नाव नसल्याने त्याच्या तब्येतीबाबत संभ्रम होता. पण आता स्पर्धेत खेळणार असल्याचं निश्चित झाले आहे. दोहा येथील कतार स्पोर्ट्स क्लब मैदानात नीरज चोप्रा आपली कसब दाखवणार आहे. दोहा डायमंड लीग स्पर्धेत नीरज चौथ्यांदा भाग घेणार आहे.

### मल्लखांब दिनानिमित्त विविध उपक्रम

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिनाचे औचित्य साधत आगळ्यावेगळ्या मराठी कलावंत मल्लखांब कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला मराठी कलावंतांसह क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मल्लखांबाच्या माध्यमातून भारतीय परंपरा, शारीरिक क्षमता आणि कलात्मकतांचा सुंदर संगम अनुभवत सहभाग नोंदवला. बोरीवली पश्चिम येथे आशिष देवल आणि संचिता देवल यांच्या संकल्पनेतून मल्लखांब लव संघ आणि बीमानगर एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मल्लखांब खेळाचा प्रचार, प्रसार आणि लोकप्रियता वाढवण्याच्या उद्देशाने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमादरम्यान राष्ट्रीय स्तरावरील मल्लखांब खेळाडूंनी सादर केलेल्या नेत्रदीपक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. संतुलन, लवचिकता, ताकद आणि कौशल्याचा अप्रतिम आविष्कार पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात खेळाडूंचे कौतुक केले. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व कलाकारांनी भविष्यातही मल्लखांबाच्या प्रचार, प्रसार आणि प्रसिद्धीसाठी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मल्लखांबाला लोकप्रिय संस्कृतीच्या माध्यमातून नवे व्यासपीठ मिळण्याचा मार्ग अधिक मजबूत झाला आहे.

### इंग्लंडचा क्रोएशियावर रोमांचक विजय

**डॅलस :** कर्णधार हॅरी केनचे दोन गोल आणि उत्तरार्धातील ज्युड बेलिंगहॅम व मार्कस रॅशफोर्डच्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर इंग्लंडने फिफा विश्वचषक मोहिमेची धडाकेबाज सुरुवात केली आहे. डॅलस येथे झालेल्या अटीतटीच्या सामन्यात इंग्लंडने क्रोएशियाचा ४-२ असा पराभव केला. क्रोएशियाने दोनदा बरोबरी साधून दिलेल्या धक्क्यांमधून सावरत इंग्लंडने दुसऱ्या सत्रात सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले. या शानदार विजयासह थ्री लायन्सने ग्रुप 'एल' मध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. मुख्य प्रशिक्षक थॉमस ट्युचेल यांच्या मार्गदर्शनाखालील



इंग्लंडचा बचाव पूर्वार्धात कमालीचा डळमळीत आणि चिंताजनक वाटला. त्यांच्या आक्रमक फळीने मात्र क्रोएशियाच्या संरक्षणाची दाणादाण उडवली. हा सामना इंग्लंडच्या चाहत्यांना आनंद देणारा असला, तरी बचावातील चुका ट्युचेल यांच्यासाठी नक्कीच चिंतेचा विषय ठरतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)